# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सातवी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सातवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

शेजारचा 'क्यू आर कोड' तसेच या पुस्तकात इतर ठिकाणी दिलेले 'क्यू आर कोड' स्मार्टफोनचा वापर करून स्कॅन करता येतात. स्कॅन केल्यावर आपल्याला या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त लिंक/लिंक्स (URL) मिळतील.

प्रथमावृत्ती : २०१७

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
डॉ. अभिराम दीक्षित, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट**

श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
प्रा. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
श्री. विक्रम अडसूळ
सौ. रूपाली गिरकर
डॉ. मिनाक्षी उपाध्याय
सौ. कांचन केतकर
सौ. शिवकन्या पटवे
डॉ. अनिल सिंगारे
डॉ. रावसाहेब शेळके
श्री. मरीबा चंदनशिवे
श्री. संतोष शिंदे
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
श्री. शेखर पाटील
श्री. संजय मेहता
श्री. रामदास ठाकर
डॉ. अजित आपटे
डॉ. मोहन खडसे
सौ. शिवकन्या कदेरकर
श्री. गौतम डांगे
डॉ. व्यंकटेश खरात
श्री. रविंद्र जिंदे
डॉ. प्रभाकर लोंढे

**निमंत्रित**

डॉ.सोमनाथ रोडे
डॉ.गणेश राऊत

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.देवदत्त प्रकाश बलकवडे

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**संयोजक**

श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
सौ. वर्षा सरोदे
विषय साहाय्यक, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहाय्यक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचे अध्ययन तुम्ही 'परिसर अभ्यास भाग-१' व 'परिसर अभ्यास भाग-२' मध्ये केले आहे. इयत्ता सहावीपासून अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. इयत्ता सहावीपासून या दोन्ही विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता सातवीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

हा विषय नीट समजावा, मनोरंजक वाटावा, आपल्या पूर्वजांनी केलेल्या कार्यातून प्रेरणा मिळावी, या हेतूने पाठ्यपुस्तकाची रचना केलेली आहे. या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासाने ज्ञानाबरोबरच तुम्हांला आनंद मिळावा असे आम्हांला वाटते. त्यासाठी पाठ्यपुस्तकात रंगीत चित्रे, नकाशे दिलेले आहेत. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ लक्षपूर्वक अभ्यासावा. त्यातील जो भाग तुम्हांला समजणार नाही तो भाग शिक्षक, पालक यांच्याकडून समजावून घ्यावा. दिलेल्या चौकटींतील मजकूर तुमच्या ज्ञानात भरच घालेल ! इतिहास हा विषय रंजक असून तो आपला मित्र आहे, असे समजून हे पुस्तक अभ्यासले तर तुम्हांला त्याची गोडी निश्चितपणे लागेल.

इतिहासाच्या भागात 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' दिलेला आहे. मध्ययुगीन भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे स्थान व भूमिका केंद्रस्थानी ठेवून पाठ्यपुस्तकाची मांडणी करण्यात आलेली आहे. त्यातून तुम्हांला आपण भारताचे नागरिक असण्याच्या जाणिवेबरोबरच आपल्या कर्तव्याची जाणीव होणेही अपेक्षित आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात भारतीय संविधानाची ओळख करून देण्यात आली आहे. भारताच्या संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, संविधानाची उद्देशिका, संविधानातील मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे हा आशय मांडण्यात आला आहे. आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांच्यानुसार चालतो हे सोप्या भाषेत सांगितले आहे. तुमचे अध्ययन जास्तीत जास्त कृतिप्रधान व्हावे, यासाठी उपक्रम देण्यात आले आहेत. आपण देशाचे भावी नागरिक असून देशाचे भवितव्य घडवणार आहोत, ही जाणीव घेऊनच तुम्ही पुढच्या वर्गात प्रवेश कराल.

इतिहासाच्या अभ्यासातून आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीचे ज्ञान होते. त्याला नागरिकशास्त्राच्या अभ्यासाची जोड मिळाली म्हणजे राष्ट्राचे व समाजाचे भविष्य घडवण्याच्या दिशेने आपली कर्तव्ये काय आहेत हेही समजते. त्यासाठीच हा संयुक्त अभ्यासाचा उपक्रम आहे.



**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ मार्च २०१७

# – शिक्षकांसाठी –

इयत्ता सहावीसाठी इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचे पाठ्यपुस्तक आपण शिकवलेले आहेच. प्रस्तुतच्या इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकात मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची मांडणी केलेली आहे.

इतिहासाच्या या मांडणीचे वैशिष्ट्य म्हणजे ती महाराष्ट्रकेंद्री आहे. आपला प्रांत भारतीय संघराज्याचा घटक असला तरी इतिहास समजून घेताना महाराष्ट्राच्या दृष्टीने म्हणजेच भारताच्या इतिहासात महाराष्ट्राचे स्थान, भूमिका आणि योगदान समोर ठेवून समजून घेतला तर विद्यार्थ्यांची राष्ट्रभावना अधिक परिपक्व होईल. त्यात आपल्या पूर्वजांनी राष्ट्रासाठी नेमके काय केले हे समजेल व त्यातूनच आपल्या आजच्या राष्ट्रीय जबाबदारीचे व कर्तव्याचे भानही विकसित होईल.

या संदर्भात साहजिकच सतराव्या शतकात शिवछत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य महत्त्वाचे ठरते. स्वराज्यनिर्मितीचे आकलन होण्यासाठी शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी भारतातील आणि महाराष्ट्रातील परिस्थिती समजली पाहिजे, म्हणजेच भारताचा इतिहास समजला पाहिजे. या धोरणाने त्याची मांडणी केली आहे. शिवाजी महाराजांनी स्थापना केलेल्या स्वराज्यावर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर उत्तरेकडून आलेल्या आक्रमणास महाराष्ट्राने कसे तोंड दिले व स्वराज्याचे कसे रक्षण केले याची चर्चा करण्यात आली आहे. या आक्रमणाला परतून लावल्यानंतर मराठ्यांनी महाराष्ट्राच्या सीमांचा विस्तार करून बहुतांश भारत व्यापला. स्वराज्याच्या साम्राज्यातील रूपांतराचे विवेचन हा त्यापुढचा भाग. ब्रिटिशांनी भारत जिंकला व त्याच्यावर राज्य केले हे सर्वांनाच ठाऊक आहे; परंतु या प्रक्रियेत ब्रिटिशांना रोखण्यात महाराष्ट्र कसा आघाडीवर होता हे समजणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ब्रिटिशांची स्पर्धा मराठ्यांशी होती व त्यांनी भारत जिंकून घेतला तो मराठ्यांशी मुकाबला करूनच. ही जाणीव आपल्या सामर्थ्याची व कर्तव्याची आहे. अध्ययन–अध्यापन करताना ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामागील ही भूमिका चित्ररूपाने व्यक्त करणाऱ्या मुखपृष्ठावर मराठी सत्तेचा विस्तार दर्शवण्यासाठी भारताच्या स्थूल नकाशाचा उपयोग केला आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात भारताच्या संविधानाची ओळख करून देण्यात आली आहे. हा विषय एकाच शैक्षणिक वर्षात शिकवणे शक्य नसल्याने दोन इयत्तांमध्ये त्याची विभागणी केली आहे. या इयत्तेत संविधानाची आवश्यकता, संविधानातील मूल्ये, उद्देशिका, मूलभूत हक्क व कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वे यांसंबंधीच्या आशयावर भर आहे. संविधानातील शासन यंत्रणेचे स्वरूप आणि त्यावर आधारलेल्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास इयत्ता आठवीत करायचा आहे. त्या अनुषंगाने इयत्ता सातवी व इयत्ता आठवीतील नागरिकशास्त्र विषयाचा आशय परस्परपूरक आहे. विद्यार्थ्यांना त्याचे अधिक चांगले आकलन होईल, या दृष्टीने त्याची मांडणी केली आहे. आशयाची मांडणी नावीन्यपूर्ण रितीने करण्यात आली आहे. ती ज्ञानरचनावादावर आधारित आहे, परंतु त्याही पलीकडे जाऊन राजकीय व्यवस्थेबाबतची उदासीनता दूर करून, विद्यार्थ्यांना समाजाचे घटक बनवण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. आशयाची मांडणी अगदी सोप्या भाषेत करण्यात आली आहे. पाठ्यपुस्तकाची वाचनीयता वाढण्यास त्याची मदत होईल.

शिक्षकांनी प्रस्तुत पाठ्यपुस्तक शिकवताना वृत्तपत्रे, दूरदर्शनवरील बातम्या, अभ्यासकांनी केलेल्या चिकित्सा यांचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये समग्र दृष्टिकोन विकसित होण्यास मदत करावी. इतिहास व नागरिकशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन चालू घडामोडींच्या संदर्भात केल्यास ते अधिक अर्थपूर्ण तर होतेच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मूल्ये आत्मसात करण्यास त्याची मदत होते.

# अनुक्रमणिका

## मध्ययुगीन भारताचा इतिहास


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने | १ |
| २. | शिवपूर्वकालीन भारत | ५ |
| ३. | धार्मिक समन्वय | ११ |
| ४. | शिवपूर्वकालीन महाराष्ट्र | १४ |
| ५. | स्वराज्यस्थापना | १९ |
| ६. | मुघलांशी संघर्ष | २४ |
| ७. | स्वराज्याचा कारभार | २९ |
| ८. | आदर्श राज्यकर्ता | ३३ |
| ९. | मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम | ३७ |
| १०. | मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार | ४४ |
| ११. | राष्ट्ररक्षक मराठे | ४७ |
| १२. | साम्राज्याची वाटचाल | ५३ |
| १३. | महाराष्ट्रातील समाजजीवन | ५७ |



**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2017. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

# क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने | – मध्ययुगीन भारतीय इतिहासाची साधने ओळखता येणे.<br>– ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करता येणे.<br>– ऐतिहासिक साधनांचे इतिहासलेखनातील महत्त्व ओळखता येणे.<br>– ऐतिहासिक साधनांच्या जतनाचे प्रयत्न करणे. |
| २. | शिवपूर्वकालीन भारत | – शिवपूर्वकाळातील भारतातील विविध सत्तांचे महाराष्ट्राच्या समाजजीवनावर झालेले परिणाम सांगता येणे.<br>– मुघलकालीन घटनांचे महाराष्ट्रावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करता येणे. |
| ३. | शिवपूर्वकालीन महाराष्ट्र | – शिवपूर्वकालीन समाजजीवन स्पष्ट करता येणे.<br>– आदिलशाही व निजामशाही काळांतील विविध ऐतिहासिक घटना स्पष्ट करता येणे.<br>– शिवपूर्वकालीन सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीची कारणमीमांसा करता येणे. |
| ४. | स्वराज्यस्थापना | – संतांच्या शिकवणुकींतील साम्य शोधता येणे.<br>– स्वराज्यस्थापनेस कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली याची चिकित्सा करता येणे.<br>– किल्ले/ऐतिहासिक वास्तू यांना भेट देऊन माहिती गोळा करता येणे.<br>– किल्ल्यांची माहिती इंटरनेटच्या मदतीने मिळवणे.<br>– ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी प्रयत्न करणे.<br>– जावळीच्या विजयाचे ऐतिहासिक महत्त्व समजून घेता येणे.<br>– शिवाजी महाराजांचे सहकारी जीवाला जीव देणारे होते, याची जाणीव निर्माण होणे. |
| ५. | मुघलांशी संघर्ष | – शिवरायांच्या युद्धनीतीचा अभ्यास करणे.<br>– मराठे व मुघल संघर्ष चिकित्सकपणे अभ्यासणे.<br>– कठीण व अडचणीच्या प्रसंगी शिवरायांची निर्णयक्षमता व धैर्य यांचे अभ्यासपूर्ण विवेचन करणे. |
| ६. | शिवराज्याभिषेक | – शिवराज्याभिषेकामागील कारणे स्पष्ट करता येणे.<br>– दक्षिण दिग्विजयानंतरचा स्वराज्याचा विस्तार नकाशाच्या मदतीने स्पष्ट करता येणे. |
| ७. | आदर्श राज्यकर्ता | – स्वराज्याच्या लोककल्याणकारी प्रशासन व्यवस्थेची माहिती सांगता येणे.<br>– छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन व लष्करी व्यवस्था स्पष्ट करता येणे.<br>– छत्रपती शिवाजी महाराजांना समकालीन इतर राजांची माहिती घेऊन महाराजांचे वेगळेपण ओळखणे.<br>– शिवचरित्रातून प्रेरणा घेणे.<br>– किल्ल्यांच्या प्रमाणबद्ध प्रतिकृती तयार करता येते. |
| ८. | स्वातंत्र्यसंग्राम | – छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांची राज्यकारभाराची धोरणे बदलत गेली हे स्पष्ट करता येणे.<br>– मराठ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही राज्य टिकवून ठेवले याची जाणीव असणे.<br>– छत्रपती राजाराम महाराजांना राजधानी जिंजीस हलवावी लागली, याची चिकित्सा करता येणे.<br>– महाराणी ताराबाईंच्या कार्याचा विश्लेषणात्मक आढावा घेता येणे. |
| ९. | पेशवेकाळ व मराठी सत्तेचा विस्तार | – मराठी सत्ता अखिल भारतीय पातळीवर प्रबळ सत्ता म्हणून उदयाला आली हे तत्कालीन ऐतिहासिक घटनांच्या मदतीने स्पष्ट करता येणे.<br>– पानिपतच्या लढाईची कारणमीमांसा करता येणे.<br>– पेशव्यांनी केलेल्या कार्याची माहिती करून घेणे.<br>– मराठा सरदारांच्या कार्याचे महत्त्व सांगता येणे. |

# १. इतिहासाची साधने

भारताच्या प्राचीन कालखंडाचा अभ्यास आपण मागील वर्षी केला आहे. यावर्षी आपण मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास करणार आहोत. भारतीय इतिहासातील मध्ययुगाचा कालावधी हा ढोबळमानाने इसवी सनाच्या नवव्या शतकापासून ते अठराव्या शतकाअखेरपर्यंतचा मानला जातो. या पाठात आपण मध्ययुगीन इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करणार आहोत.

भूतकाळात घडलेल्या घटनांची कालक्रमानुसार, शास्त्रशुद्ध आणि पद्धतशीर दिलेली माहिती म्हणजे इतिहास होय.

**माहीत आहे का तुम्हांला?**


इतिहास हा शब्द 'इति+ह+आस्' असा तयार झालेला आहे. या शब्दाचा अर्थ 'असे घडले' असा आहे.

व्यक्ती, समाज, स्थळ आणि काळ हे चार घटक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. इतिहास हा विश्वसनीय पुराव्यांवर आधारित असावा लागतो. या पुराव्यांनाच इतिहासाची साधने असे म्हणतात.

या साधनांचे भौतिक साधने, लिखित साधने आणि मौखिक साधने असे वर्गीकरण करून आपण त्यांची माहिती घेऊ. तसेच, इतिहासाच्या साधनांचे मूल्यमापनही करू.

ज्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करायचा असतो तिच्याशी संबंधित अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा आधार घ्यावा लागतो. ही साधने तपासून घेणे गरजेचे असते. त्यांचा अस्सलपणा तपासावा लागतो. या साधनांचा तारतम्याने व चिकित्सकपणे वापर करणे आवश्यक असते.

**भौतिक साधने :**




वरील वस्तू आणि वास्तू किंवा त्यांचे अवशेष यांना इतिहासाची 'भौतिक साधने' असे म्हणतात.

भौतिक साधनांमध्ये किल्ल्यांचे महत्त्वपूर्ण स्थान असते. किल्ल्यांचे काही महत्त्वाचे प्रकार म्हणजे गिरिदुर्ग, वनदुर्ग, जलदुर्ग, भुईकोट हे होत. तसेच स्मारकांमध्ये समाधी, कबर, वीरगळ तर इमारतींमध्ये राजवाडे, मंत्रिनिवास, राणीवसा, सामान्य जनतेची घरे यांचा समावेश होतो. यावरून आपल्याला त्या कालखंडाचा बोध होतो. वास्तुकलेची प्रगती समजते. त्या काळातील आर्थिक स्थिती, कलेचा दर्जा, बांधकामाची शैली, लोकांचे राहणीमान इत्यादींची माहिती मिळते.

**सांगा पाहू!**

नाणी इतिहास कसा सांगतात?

**जाणून घेऊया.**

प्राचीन काळापासून कवडी, दमडी, धेला, पै, पैसा, आणा, रुपया ही नाणी प्रचलित होती. नाण्यांवरून काही म्हणी, वाक्प्रचार प्रचलित झाले आहेत. उदा.,

* एक फुटकी कवडी देणार नाही.
* चमडी जाए पर दमडी न जाए!
* पै-पै चा हिशोब ठेवणे.
* सोलह आणे सच।



वीरगळ

विविध राज्यकर्त्यांनी सोने, चांदी, तांबे या धातूंचा उपयोग करून तयार केलेली नाणी इतिहासाची साधने म्हणून महत्त्वाची आहेत. नाण्यांवरून राज्यकर्ते कोण होते, त्यांचा काळ, राज्यकारभार, धार्मिक संकल्पना, व्यक्तिगत तपशील इत्यादींची माहिती मिळते. तसेच आर्थिक व्यवहार आणि आर्थिक स्थिती यांची माहिती मिळते. त्या काळातील धातूशास्त्राची प्रगती समजते. सम्राट अकबराच्या नाण्यांवरील रामसीतेचे चित्र किंवा हैदरअलीच्या नाण्यांवरील शिवपार्वतीच्या प्रतिमा यावरून त्या काळातील धार्मिक समन्वयाची जाणीव होते. पेशव्यांच्या नाण्यांवर अरेबिक किंवा पर्शियन भाषेचा वापर होत असे. यावरून त्या काळातील भाषाव्यवहार समजतो.



पेशवेकालीन नाणे



हैदरअलीचे नाणे

शिलालेख म्हणजे दगडावर किंवा भिंतीवर कोरलेले लेख. उदा., तंजावर येथील बृहदीश्वर मंदिराच्या परिसरातील लेख. चालुक्य, राष्ट्रकूट, चोळ, यादव या राजांच्या काळात कोरलेले अनेक शिलालेख मिळालेले आहेत. शिलालेख हा इतिहासलेखनाचा फार महत्त्वाचा आणि विश्वसनीय पुरावा मानला जातो. त्यातून भाषा, लिपी, समाजजीवन यांसारख्या बाबी समजायला मदत होते. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या लेखांना 'ताम्रपट' म्हणतात. ताम्रपटांवर राजाज्ञा, निवाडे इत्यादी प्रकारची माहिती कोरलेली असे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

चैत्य, विहार, मंदिरे, चर्च, मशिदी, अग्यारी, दर्गे, मकबरे, गुरुद्वारा, छत्री, शिल्प, विहिरी, बारवा, मिनार, गावकूस, वेशी, शस्त्रे, भांडी, दागिने, कपडे, कलाकुसरीच्या वस्तू, खेळणी, अवजारे, वाद्ये ही सर्व भौतिक साधने आहेत.

**लिखित साधने :** त्या काळातील देवनागरी, अरेबियन, पर्शियन, मोडी आदी लिपींची वळणे, विविध भाषांची रूपे, भूर्जपत्रे, पोथ्या, ग्रंथ, फर्माने, चरित्रे, चित्रे यांच्यावरून आपल्याला मध्ययुगातील महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची माहिती मिळते. तसेच खाण्यापिण्याचे पदार्थ, लोकजीवन, वेशभूषा, आचारविचार, सण-समारंभ यांचीही माहिती मिळते.

या सर्व साहित्याला इतिहासाची 'लिखित साधने' असे म्हणतात.

**लिखित साधने**

- राजदरबारातील कामकाजाची कागदपत्रे
- वंशावळी, शकावली
- पत्रव्यवहार, खलिते
- न्यायनिवाडे, आज्ञापत्रे
- ग्रंथ, चरित्र
- परदेशी प्रवाशांची प्रवासवर्णने
- बखरी, तवारिख

या काळात परकीय प्रवासी भारतात आले. त्यांनी आपली प्रवासवर्णने लिहिली आहेत. त्यांत अल्बेरूनी, इब्न बतुता, निकोलस मनुची यांचा समावेश होतो. बाबराचे चरित्र, कवी परमानंद यांनी संस्कृत भाषेत लिहिलेले 'श्रीशिवभारत' हे शिवचरित्र तसेच विविध राज्यकर्त्यांची चरित्रे व पत्रव्यवहार यांवरून आपल्याला त्यांची धोरणे, प्रशासकीय व्यवस्था, राजकीय संबंध यांची उकल करता येते.

तवारिख किंवा तारीख म्हणजे घटनाक्रम. अल्बेरूनी, झियाउद्दीन बर्नी, मौलाना अहमद, याह्या बिन अहमद, मिर्झा हैदर, भीमसेन सक्सेना आदींनी लिहिलेल्या तवारिखा उपलब्ध आहेत.


बखर हा शब्द खबर या शब्दावरून आला. खबर म्हणजे बातमी. बखर हा महाराष्ट्रात निर्माण झालेला इतिहासलेखनाचा एक प्रकार आहे. बखरीतून तत्कालीन राजकीय घडामोडी, भाषाव्यवहार, सांस्कृतिक जीवन, सामाजिक परिस्थिती इत्यादी बाबी कळायला मदत होते. मराठीतील अनेक बखरी घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी लिहिलेल्या असल्याने त्यात अनेकदा ऐकीव माहितीवर भर दिल्याचेही आढळते. महिकावतीची बखर, सभासद बखर, एक्याण्णव कलमी बखर, चिटणिसाची बखर, भाऊसाहेबाची बखर, खर्ड्याच्या लढाईची बखर या काही बखरी होत. रॉबर्ट आर्म, एम.सी.स्प्रेंगल आणि ग्रँट डफ या समकालीन पाश्चात्त्य इतिहासकारांचे ग्रंथही महत्त्वाचे आहेत.



**करून पहा.**

- पोवाडे, आदिवासी गीते यांचा संग्रह करा.
- शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांचे सादरीकरण करा.

**मौखिक साधने :** लोकपरंपरेत पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होत राहिलेल्या जात्यावरील ओव्या, लोकगीते, पोवाडे, कहाण्या, दंतकथा, मिथके यांतून आपल्याला लोकजीवनाचे विविध पैलू समजतात. अशा प्रकारच्या साधनांना इतिहासाची 'मौखिक साधने' असे म्हणतात.




वरील तिन्ही प्रकारच्या साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन केले जाते. इतिहासाचे एकदा लेखन केले तरी त्याविषयीचे संशोधन अखंडपणे चालू राहतेच. या संशोधनातून नवी साधने, नवी माहिती समोर येते. त्यानुसार इतिहासाचे पुनर्लेखन करावे लागते. उदा., आपल्या आजी-आजोबांच्या काळातील, आई-वडिलांच्या काळातील आणि आपल्या काळातील इतिहासाच्या पुस्तकांमध्ये काही प्रमाणात फरक पडल्याचे दिसते.



**माहीत आहे का तुम्हांला?**

**तानाजीचा - पोवाडा :** या पोवाड्याचा कर्ता तुळशीदास शाहीर आहे. या पोवाड्यात सिंहगडच्या मोहिमेचे वर्णन आहे. पोवाड्यात तानाजी, शेलारमामा, शिवाजी महाराज, वीरमाता जिजाबाई यांची सुंदर स्वभावचित्रे दिली आहेत.

सदर पोवाड्यातील काही भाग येथे दिला आहे.

*मामा बोलाया तो लागला । ऐंशी वर्षांचा म्हातारा ।।*
*"लगिन राहिले रायबाचे तो मजला सांगावी ।।*
*माझ्या तानाजी सुभेदारा । जे गेले सिंहगडाला ।।*
*त्याचे पाठिरे पाहिले । नाही पुढारे पाहिले ।।*
*ज्याने आंबारे खाईला । बाठा बुजरा लाविला ।।*
*त्याचे झाड होउनि आंबे बांधले ।*
*किल्ला हाती नाही आला ।।*
*सिंहगड किल्ल्याची वार्ता ।*
*काढू नको तानाजी सुभेदारा ।।*
*जे गेले सिंहगडाला । ते मरूनशानी गेले ।।*
*तुमचा सपाटा होईल । असे बोलू नको रे मामा ।।*
*आम्ही सूरमर्द क्षत्री । नाही भिणार मरणाला ।।"*

**बोलते व्हा.**

ऐतिहासिक साधनांच्या जतनाचे उपाय सुचवा.

**ऐतिहासिक साधनांचे मूल्यमापन :** ही सर्व साधने वापरण्यापूर्वी काही काळजी घेणे आवश्यक असते. त्यांची विश्वसनीयता तपासावी लागते. यांतील अस्सल साधने कोणती आणि बनावट कोणती ते शोधावे लागते. अंतर्गत प्रमाणके पाहून त्यांचा दर्जा ठरवता येतो. लेखकांचा खरेखोटेपणा, त्यांचे व्यक्तिगत हितसंबंध, काळ, राजकीय दबाव यांचाही अभ्यास करावा लागतो. ही माहिती ऐकीव आहे की त्यांनी स्वतः पाहिलेली आहे, यालाही महत्त्व असते. लेखनातील अतिशयोक्ती, प्रतिमा, प्रतीके, अलंकार यांचाही विचार करावा लागतो. इतर समकालीन साधनांशी ती माहिती पडताळून पाहावी लागते. आपल्याला मिळालेली माहिती एकांगी, विसंगत किंवा अतिरंजित असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे त्यांचा वापर करताना तारतम्य ठेवावे लागते. सदैव चिकित्सा करूनच या साधनांचा वापर करण्याची दक्षता घेणे गरजेचे असते. इतिहासलेखनात लेखकाचा निःपक्षपातीपणा आणि तटस्थता फार महत्त्वाची असते.

## स्वाध्याय

१. **खालील चौकोनात दडलेली ऐतिहासिक साधनांची नावे शोधून लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ता | दं | त | क | था | र्च |
| री | म्र | चि | त्रे | रि | च |
| ख | क | प | डे | लो | ख |
| ब | ज्ञा | श्लो | ट | क | लि |
| आ | पो | वा | डे | गी | ते |
| शि | ला | ले | ख | ते | र |

२. **लिहिते व्हा.**

(१) स्मारकांमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो ?

(२) तवारिख म्हणजे काय ?

(३) इतिहासलेखनात लेखकांचे कोणते पैलू महत्त्वाचे असतात ?

३. **गटातील वेगळा शब्द शोधून लिहा.**

(१) भौतिक साधने, लिखित साधने, अलिखित साधने, मौखिक साधने

(२) स्मारके, नाणी, लेणी, कथा

(३) भूर्जपत्रे, मंदिरे, ग्रंथ, चित्रे

(४) ओव्या, तवारिखा, कहाण्या, मिथके

४. **संकल्पना स्पष्ट करा.**

(१) भौतिक साधने

(२) लिखित साधने

(३) मौखिक साधने

५. ऐतिहासिक साधनांचे मूल्यमापन करणे आवश्यक असते का ? तुमचे मत सांगा.

६. **तुमचे मत लिहा.**

(१) शिलालेख हा इतिहासलेखनाचा विश्वसनीय पुरावा मानला जातो.

(२) मौखिक साधनांच्या आधारे लोकजीवनाचे विविध पैलू समजतात.

**उपक्रम**

कोणत्याही जवळच्या वस्तुसंग्रहालयास भेट द्या. तुम्ही अभ्यासत असलेल्या कालखंडातील इतिहासाच्या साधनांची माहिती मिळवा व त्यांची नोंद उपक्रमवहीत करा.

# २. शिवपूर्वकालीन भारत

या पाठात आपण शिवपूर्वकाळातील भारतातील विविध राजसत्तांचा अभ्यास करणार आहोत. या काळात भारतामध्ये विविध राजसत्ता अस्तित्वात होत्या.

आठव्या शतकातील 'पाल' हे बंगालमधील एक प्रसिद्ध राजघराणे होय. मध्य भारतात गुर्जर-प्रतिहार सत्तेने आंध्र, कलिंग, विदर्भ, पश्चिम काठेवाड, कनोज, गुजरातपर्यंत सत्तेचा विस्तार केला.

उत्तर भारतातील राजपूत घराण्यांमध्ये गाहडवाल घराणे, परमार घराणे ही घराणी महत्त्वाची होत. राजपुतांपैकी चौहान घराण्यातील पृथ्वीराज चौहान हा पराक्रमी राजा होता. तराई येथील पहिल्या युद्धात पृथ्वीराज चौहान याने मुहम्मद घोरीचा पराभव केला. मात्र तराईच्या दुसऱ्या युद्धात मुहम्मद घोरीने पृथ्वीराज चौहान याचा पराभव केला.

तमिळनाडूतील चोळ घराण्यातील राजराज पहिला आणि राजेंद्र पहिला हे राजे महत्त्वाचे होते. चोळांनी आरमाराच्या जोरावर मालदीव बेटे, श्रीलंका जिंकून घेतले. कर्नाटकातील होयसळ घराण्यातील विष्णुवर्धन या राजाने संपूर्ण कर्नाटक जिंकला.

महाराष्ट्रातील राष्ट्रकूट घराण्यातील गोविंद तिसरा याच्या कारकिर्दीत राष्ट्रकूट सत्ता कनोजपासून रामेश्वरपर्यंत पसरली. पुढे कृष्ण तिसरा याने अलाहाबादपर्यंतचा प्रदेश जिंकून घेतला.

शिलाहारांची तीन घराणी पश्चिम महाराष्ट्रात उदयास आली. पहिले घराणे उत्तर कोकणात ठाणे व रायगड, दुसरे घराणे दक्षिण कोकणात तर तिसरे घराणे कोल्हापूर, सातारा, सांगली व बेळगाव जिल्ह्यांच्या काही भागांवर राज्य करत होते.

शिवपूर्वकाळातील शेवटची वैभवशाली राजवट म्हणजे महाराष्ट्रातील यादवांची राजवट. यादव घराण्यातील भिल्लम पाचवा याची राजधानी औरंगाबादजवळील देवगिरी येथे होती. त्याने कृष्णा नदीच्या पलीकडे सत्ताविस्तार केला.

यादवांचा काळ हा मराठी भाषा आणि साहित्य यांचा सुवर्णकाळच मानावा लागतो. याच काळात महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी या संप्रदायांचा उदय झाला.

## वायव्येकडील आक्रमणे

महाराष्ट्रात राष्ट्रकूट, यादव अशा स्थानिक घराण्यांची सत्ता असली तरी उत्तरेत मात्र वायव्येकडून आलेल्या आक्रमकांनी तेथील स्थानिक सत्तांना जिंकून आपला अंमल बसवला.

दरम्यानच्या काळात मध्यपूर्वेत अरब सत्तेचा उदय झाला होता. साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अरब सत्ताधीश भारताकडे वळले. आठव्या शतकामध्ये मुहम्मद बिन कासिम या अरबी सेनानीने सिंध प्रांतावर स्वारी केली. तेथील दाहीर राजाचा प्रतिकार मोडून काढून त्याने सिंध प्रांत जिंकला. या स्वारीमुळे अरबांचा भारताशी राजकीय संबंध प्रथमच आला. यापुढील काळात मध्य आशियातील तुर्क, अफगाण, मुघल हे लोक भारतात आले आणि त्यांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली.

इसवी सनाच्या अकराव्या शतकात भारतावर तुर्कांची आक्रमणे होऊ लागली. ते आपल्या सत्तेचा विस्तार करत भारताच्या वायव्य सरहद्दीपर्यंत आले. गझनीचा सुलतान महमूद याने भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांत त्याने मथुरा, वृंदावन, कनोज, सोमनाथ येथील संपन्न मंदिरे लुटून तेथील प्रचंड संपत्ती आपल्याबरोबर नेली.

## उत्तरेतील सुलतानशाही

इसवी सन ११७५ आणि ११७८ मध्ये अफगाणिस्तानातील घूर येथील सुलतान मुहम्मद घोरी याने भारतावर आक्रमणे केली. भारतातील जिंकून घेतलेल्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी त्याने कुतुबुद्दीन ऐबक याची नेमणूक केली. पुढे

इ.स.१२०६ मध्ये मुहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर ऐबकाने आपल्या प्रभुत्वाखाली भारतातील प्रदेशाचा कारभार स्वतंत्रपणे पाहण्यास सुरुवात केली. ऐबक हा मूळचा गुलाम असून तो दिल्लीचा सत्ताधीश बनला. इ.स.१२१० मध्ये त्याचा मृत्यू झाला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

कुतुबुद्दीन ऐबकानंतर अल्तमश, रझिया, बल्बन, अल्लाउद्दीन खल्जी, मुहम्मद तुघलक, फिरोज तुघलक, इब्राहीम लोदी इत्यादी सुलतानांनी भारतावर राज्य केले.

इब्राहीम लोदी हा शेवटचा सुलतान होय. त्याच्या स्वभावदोषामुळे त्याला अनेक शत्रू निर्माण झाले. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी याने काबूल येथील मुघल सत्ताधीश बाबर यास इब्राहीम लोदीविरुद्ध पाचारण केले. या लढाईत बाबराने इब्राहीम लोदीचा पराभव केला आणि त्याबरोबरच सुलतानशाहीचा शेवट झाला.

## विजयनगरचे राज्य

दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलक याच्या कारकिर्दीत दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेविरुद्ध दक्षिणेमध्ये उठाव झाले. त्यातूनच विजयनगर व बहमनी ही दोन प्रबळ राज्ये उदयास आली.

हरिहर व बुक्क हे दक्षिण भारतातील दोघे भाऊ दिल्लीच्या सुलतानशाहीच्या सेवेत सरदार म्हणून होते. त्यांनी मुहम्मद तुघलकाच्या काळात दक्षिणेत राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन इ.स.१३३६ मध्ये दक्षिणेत विजयनगरचे राज्य स्थापन केले. आजच्या कर्नाटकातील 'हंपी' ही या राज्याची राजधानी होती. हरिहर हा विजयनगरचा पहिला राजा होय.

हरिहरानंतर त्याचा भाऊ बुक्क सत्तेवर आला. बुक्क याने रामेश्वरपर्यंतचा प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला.

**कृष्णदेवराय :** कृष्णदेवराय इ.स.१५०९ मध्ये विजयनगरच्या गादीवर आला. त्याने विजयवाडा आणि राजमहेंद्री हे प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडले. बहमनी सुलतान महमूदशाह याच्या नेतृत्वाखाली एकत्रित आलेल्या सुलतानांच्या सैन्यसंघाचा त्याने पराभव केला. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरचे राज्य पूर्वेस कटकपासून–पश्चिमेस गोव्यापर्यंत व उत्तरेस रायचूर दोआबापासून–दक्षिणेस हिंदी महासागरापर्यंत पसरलेले होते. इ.स.१५३० मध्ये त्याचा मृत्यू झाला.



कृष्णदेवराय

कृष्णदेवराय हा विद्वान होता. त्याने तेलुगु भाषेमध्ये 'आमुक्तमाल्यदा' हा राजनीतीविषयक ग्रंथ लिहिला. त्याच्या कारकिर्दीत विजयनगरमध्ये हजार राम मंदिर, विठ्ठल मंदिराचे बांधकाम झाले.

कृष्णदेवरायानंतर विजयनगरच्या राज्यास उतरती कळा लागली. आजच्या कर्नाटक राज्यातील तालिकोट येथे एकीकडे आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरीदशाही आणि दुसऱ्या बाजूला विजयनगरचा राजा रामराय यांच्यात इ.स.१५६५ मध्ये लढाई झाली. या लढाईत त्याचा पराभव झाला. यानंतर विजयनगरचे राज्य संपुष्टात आले.

## बहमनी राज्य

मुहम्मद तुघलकाचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी दक्षिणेमध्ये सरदारांनी बंड केले. या सरदारांचा प्रमुख हसन गंगू याने दिल्लीच्या सुलतानाच्या सैन्याचा पराभव केला. इ.स.१३४७ मध्ये नवीन राज्य अस्तित्वात आले. यास बहमनी राज्य असे म्हणतात. हसन गंगू हा बहमनी राज्याचा पहिला सुलतान झाला. त्याने कर्नाटक राज्यातील 'गुलबर्गा' येथे आपली राजधानी स्थापन केली.

**महमूद गावान :** हा बहमनी राज्याचा मुख्य

वजीर व उत्तम प्रशासक होता. त्याने बहमनी राज्यास आर्थिक सामर्थ्य प्राप्त करून दिले. सैनिकांना जहागिरी देण्याऐवजी रोख पगार देण्यास सुरुवात केली. सैन्यामध्ये शिस्त आणली. जमीन महसूल व्यवस्थेत सुधारणा केली. बिदर येथे अरबी व फारसी विद्यांच्या अभ्यासासाठी मदरसा स्थापन केली.

महमूद गावाननंतर बहमनी सरदारांमध्ये गटबाजी वाढीस लागली. विजयनगर व बहमनी यांच्यातील संघर्षाचा बहमनी राज्यावर प्रतिकूल परिणाम झाला. विविध प्रांतांतील अधिकारी अधिक स्वतंत्र वृत्तीने वागू लागले. बहमनी राज्याचे विघटन झाले. त्यातून वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी बहमनी राज्याची पाच शकले झाली.


## मुघल सत्ता

इ.स.१५२६ मध्ये दिल्ली येथील सुलतानशाही संपुष्टात आली. तेथे मुघल सत्तेची स्थापना झाली.

**बाबर :** बाबर हा मुघल सत्तेचा संस्थापक होय. तो मध्य आशियातील सध्याच्या उझबेकिस्तानमध्ये असलेल्या फरघाना राज्याचा राजा होता. भारतातील संपत्ती संबंधीचे वर्णन त्याने ऐकलेले होते, म्हणून त्याने भारतावरील स्वारीची आखणी केली.

दिल्लीमध्ये त्या वेळी इब्राहीम लोदी हा सुलतान राज्यकारभार करत होता. सुलतानशाहीतील पंजाबच्या प्रदेशात दौलतखान लोदी हा प्रमुख अधिकारी होता. इब्राहीम लोदी आणि दौलतखान लोदी यांच्या संबंधामध्ये संघर्ष निर्माण झाला. दौलतखानाने भारतावर आक्रमण करण्यासाठी बाबराला निमंत्रित केले. ही संधी साधून बाबराने भारतावर आक्रमण केले. बाबराच्या आक्रमणास प्रतिकार करण्याकरिता इब्राहीम लोदी सैन्य घेऊन निघाला. २१ एप्रिल १५२६ या दिवशी पानिपत या ठिकाणी त्याची बाबराबरोबर लढाई झाली. या लढाईमध्ये बाबराने भारतात प्रथमच तोफखान्याचा प्रभावी उपयोग केला. त्याने इब्राहीम लोदीच्या सैन्याचा पराभव केला. ही 'पानिपतची पहिली लढाई' होय.

या लढाईनंतर मेवाडच्या राणासंगाने राजपूत राजांना एकत्र आणले. बाबर आणि राणासंग यांच्यामध्ये खानुआ या ठिकाणी लढाई झाली. या लढाईत बाबराचा तोफखाना आणि त्याचे राखीव सैन्य यांनी प्रभावी कामगिरी केली. राणासंगाच्या सैन्याचा पराभव झाला. इ.स.१५३० मध्ये बाबराचा मृत्यू झाला.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

बाबरानंतर हुमायून (इ.स.१५३० ते इ.स.१५३९ व इ.स.१५५५ ते इ.स.१५५६) गादीवर आला. हुमायूनच्या कारकिर्दीत शेरशाहाने त्याचा पराभव केला व दिल्लीच्या गादीवर सूर घराण्याची स्थापना केली. हुमायूननंतर अकबर (इ.स.१५५६ ते इ.स.१६०५) गादीवर आला. अकबर व हेमू यांच्यात इ.स.१५५६ मध्ये पानिपत येथे लढाई झाली. ही पानिपतची दुसरी लढाई होय. संपूर्ण भारत आपल्या एकछत्री अमलाखाली आणण्याची त्याची महत्वाकांक्षा होती. अकबरानंतर जहांगीर (इ.स.१६०५ ते इ.स.१६२८) हा सम्राट झाला. त्याच्या कारकिर्दीत त्याची पत्नी नूरजहान हिने प्रभावी कामगिरी बजावली. जहांगीरानंतर शाहजहान (इ.स.१६२८ ते इ.स.१६५८) सम्राट झाला. शाहजहाननंतर औरंगजेब (इ.स.१६५८ ते इ.स.१७०७) हा दीर्घकाळ सम्राट होता. त्याच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्य खिळखिळे झाले.

अकबर हा मुघल घराण्यातील सर्वांत कर्तबगार राजा होय. अकबराने भारत स्वतःच्या एकछत्री अमलाखाली आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याला विरोध झाला. महाराणा प्रताप, चांदबिबी, राणी दुर्गावती यांनी अकबराविरुद्ध केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे.



राणा प्रताप

**महाराणा प्रताप :** उदयसिंहाच्या मृत्यूनंतर महाराणा प्रताप हा मेवाडच्या गादीवर आला. मेवाडच्या अस्तित्वासाठी त्याने संघर्ष चालू ठेवला. महाराणा प्रतापने अखेरपर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अकबराबरोबर संघर्ष केला. पराक्रम, धैर्य, स्वाभिमान, त्याग इत्यादी गुणांमुळे तो इतिहासात अजरामर झाला आहे.

**चांदबिबी :** इ.स.१५९५ मध्ये मुघलांनी अहमदनगर या निजामशाहीच्या राजधानीवर हल्ला केला. मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला. अहमदनगरच्या हुसेन निजामशाहची कर्तबगार मुलगी चांदबिबी हिने अत्यंत धैर्याने तो किल्ला लढवला. या वेळी निजामशाहीतील सरदारांमध्ये दुही निर्माण झाली. या दुहीतून चांदबिबीस ठार मारले गेले. पुढे मुघलांनी अहमदनगरचा किल्ला जिंकून घेतला. मात्र निजामशाहीचे संपूर्ण राज्य मुघलांच्या ताब्यात आले नाही.



चांदबिबी

**राणी दुर्गावती :** विदर्भाचा पूर्व भाग, त्याच्या उत्तरेचा मध्यप्रदेशाचा भाग, आजच्या छत्तीसगडचा पश्चिम भाग, आंध्र प्रदेशाचा उत्तर भाग आणि ओडिशाचा पश्चिम भाग हा स्थूलमानाने गोंडवनाचा विस्तार होय. चंदेल राजपुतांच्या घराण्यात जन्मलेली दुर्गावती लग्नानंतर गोंडवनची राणी झाली. तिने उत्तम रीतीने राज्यकारभार केला. मध्ययुगीन इतिहासामध्ये गोंडवनची राणी दुर्गावती हिने मुघलांविरुद्ध दिलेला लढा महत्त्वाचा आहे. दुर्गावतीने पतीच्या मृत्यूनंतर अकबराविरुद्ध लढताना प्राणार्पण केले, परंतु शरणागती पत्करली नाही.



राणी दुर्गावती

**औरंगजेब :** औरंगजेब हा इ.स.१६५८ मध्ये बादशाह झाला. त्या वेळी मुघल साम्राज्य हे उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस अहमदनगरपर्यंत आणि पश्चिमेस काबूलपासून पूर्वेला बंगालपर्यंत पसरलेले होते. औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीत पूर्वेकडील आसाम, दक्षिणेतील विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही नष्ट करून त्यांचे प्रदेश साम्राज्याला जोडले.



औरंगजेब

**आहोमांशी संघर्ष :** इसवी सनाच्या तेराव्या शतकात शान जमातीचे लोक ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात स्थायिक झाले. तेथे त्यांनी आपले राज्य स्थापन केले. स्थानिक लोक या लोकांना आहोम असे म्हणत.

औरंगजेबाच्या काळात आहोमांचा मुघलांशी दीर्घकाळ संघर्ष झाला. मुघलांनी आहोमांच्या प्रदेशावर आक्रमण केले. गदाधरसिंह याच्या नेतृत्वाखाली आहोम संघटित झाले. लाच्छित बडफूकन या सेनानीने मुघलांविरुद्ध तीव्र संघर्ष केला. आहोमांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षात गनिमी युद्धतंत्राचा अवलंब केला. मुघलांना आसाममध्ये आपली सत्ता दृढ करणे अशक्य झाले.

**शिखांशी संघर्ष :** शिखांचे नववे गुरू गुरुतेघबहाद्दर यांनी औरंगजेबाच्या असहिष्णू धार्मिक धोरणाविरुद्ध तीव्र नापसंती दर्शवली. औरंगजेबाने त्यांना कैद करून १६७५ मध्ये त्यांचा शिरच्छेद केला. त्यांच्यानंतर गुरुगोविंदसिंग हे शिखांचे गुरू झाले.

गुरुगोविंदसिंगांनी आपल्या अनुयायांना संघटित करून त्यांच्यातील लढाऊ वृत्तीला प्रोत्साहन दिले. लढाऊ शीख तरुणांचे एक दल उभे केले. त्यास 'खालसा दल' असे म्हणतात. आनंदपूर हे त्यांचे प्रमुख केंद्र होते. औरंगजेबाने शिखांविरुद्ध सैन्य पाठवले. त्याच्या फौजांनी आनंदपूरवर हल्ला चढवला. त्या वेळी शिखांनी प्रखर झुंज दिली, परंतु त्यांना यश आले नाही. यानंतर गुरुगोविंदसिंग दक्षिणेत आले. इ.स.१७०८ मध्ये नांदेड मुक्कामी त्यांच्यावर हल्ला झाला. पुढे त्यातच त्यांचे निधन झाले.


गुरुगोविंदसिंग

**राजपुतांशी संघर्ष :** अकबराने आपल्या सलोख्याच्या धोरणाने राजपुतांचे सहकार्य मिळवले होते. मात्र औरंगजेबाला राजपुतांचे सहकार्य मिळवता आले नाही. मारवाडचा राणा जसवंतसिंग याच्या मृत्यूनंतर त्याचे राज्य औरंगजेबाने मुघल साम्राज्यास जोडून घेतले. दुर्गादास राठोड याने जसवंतसिंगाचा अल्पवयीन मुलगा अजितसिंह याला मारवाडच्या गादीवर बसवले. दुर्गादास राठोडने मुघलांविरुद्ध मोठा संघर्ष केला. दुर्गादासाचा हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औरंगजेबाने राजपुत्र अकबर याला मारवाडमध्ये पाठवले. राजपुत्र अकबर हा स्वतः राजपुतांना जाऊन मिळाला आणि त्याने औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारले. या बंडात महाराष्ट्रातील मराठ्यांचीही मदत घेण्याचा प्रयत्न झाला. दुर्गादास राठोड याने मारवाडच्या अस्तित्वासाठी मुघलांविरुद्धचा हा संघर्ष चालू ठेवला.

**मराठ्यांशी संघर्ष :** महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली स्वराज्याची स्थापना झाली. त्यांना स्वराज्य स्थापन करण्याच्या या प्रयत्नामध्ये इतर शत्रूंबरोबरच मुघलांशीही संघर्ष करावा लागला. त्यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण दक्षिण भारत जिंकून घेण्याच्या हेतूने औरंगजेब दख्खनमध्ये आला. परंतु मराठ्यांनी औरंगजेबाशी तीव्र संघर्ष केला. आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. या सर्व संघर्षांची माहिती आपण पुढे घेणार आहोत.

## स्वाध्याय

**१. नावे सांगा.**

(१) गोंडवनची राणी –
(२) उदयसिंहाचा पुत्र –
(३) मुघल सत्तेचा संस्थापक –
(४) बहमनी राज्याचा पहिला सुलतान –
(५) गुरुगोविंदसिंग यांनी स्थापन केलेले दल –

**२. गटात न बसणारा पर्याय निवडा.**

(१) सुलतान मुहम्मद, कुतुबुद्दीन ऐबक, मुहम्मद घोरी, बाबर
(२) आदिलशाही, निजामशाही, सुलतानशाही, बरिदशाही
(३) अकबर, हुमायून, शेरशाह, औरंगजेब

**३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) विजयनगर व बहमनी ही दोन राज्ये का उदयास आली ?
(२) महमूद गावानने कोणत्या सुधारणा केल्या ?
(३) मुघलांना आसाममध्ये आपली सत्ता दृढ करणे का अशक्य झाले ?

**४. तुमच्या शब्दांत थोडक्यात माहिती लिहा.**

(१) कृष्णदेवराय
(२) चांदबिबी
(३) राणी दुर्गावती

**५. सकारण लिहा.**

(१) बहमनी राज्याची पाच शकले झाली.
(२) राणासंगाच्या सैन्याचा पराभव झाला.
(३) राणा प्रताप इतिहासात अजरामर झाला.
(४) औरंगजेबाने गुरू गुरुतेघबहाद्दर यांना कैद केले.
(५) राजपुतांनी मुघलांविरुद्ध संघर्ष केला.

६. **कालरेषा पूर्ण करा.**

| इ.स.१३३६ | इ.स. ........ | इ.स.१५०९ | इ.स. ....... |
|---|---|---|---|
| विजयनगर राज्याची स्थापना | बहमनी राज्याची स्थापना | ................. | मुघल सत्तेची स्थापना |

७. इंटरनेटच्या साहाय्याने तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका व्यक्तीची माहिती मिळवा व खालील चौकटीत लिहा.

मला हे माहीत आहे

______________________

______________________

______________________

______________________

**उपक्रम**

पाठांत आलेल्या व्यक्तींविषयीची अधिक माहिती संदर्भ पुस्तके, इंटरनेट, वृत्तपत्र इत्यादींच्या साहाय्याने मिळवा. उपक्रमवहीत चित्र-माहितीचे कोलाज तयार करा व इतिहास कक्षात त्याचे प्रदर्शन भरवा.



किल्ले देवगिरी

# ३. धार्मिक समन्वय

भाषा आणि धर्म यांची विविधता हे भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्याची दखल घेऊन भारतीय संविधानाने सर्वधर्मसमभावाचे तत्त्व स्वीकारले आहे. मध्ययुगीन भारतातील समाजजीवनामध्येही या तत्त्वाच्या आधारे धार्मिक समन्वयाचे प्रयत्न झाले होते. या प्रयत्नांपैकी भक्ती चळवळ, शीख धर्म आणि सुफी पंथ यांचे आपल्या समाजात एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांमध्ये या विविध विचारधारा निर्माण झाल्या. त्यांनी ईश्वरभक्तीबरोबरच धार्मिक आणि सांप्रदायिक समन्वयावर भर दिला. यासंबंधीची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

भारतीय धर्मजीवनात प्रारंभी कर्मकांड आणि ब्रह्मज्ञान यांच्यावर विशेष भर होता. मध्ययुगात हे दोन्ही मार्ग मागे पडून भक्तिमार्गास महत्त्व आले. या मार्गात अधिकारभेदांचे फाजील महत्त्व नसल्याने धार्मिक समन्वयाला आणखी चालना मिळाली. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांमध्ये स्थानिक परिस्थितीला अनुसरून भक्तिपंथाचे वेगवेगळे आविष्कार आढळून येतात. या पंथाने संस्कृत भाषेऐवजी सर्वसामान्यांच्या भाषांचा अवलंब केला. त्यामुळे अशा प्रादेशिक भाषांच्या विकासासाठी या धार्मिक चळवळींचा हातभार लागला.

**भक्ती चळवळ :** भक्ती चळवळीचा उगम दक्षिण भारतात झाल्याचे मानण्यात येते. या भागात नायनार आणि अळवार या भक्ती चळवळी उदयास आल्या. नायनार हे शिवभक्त तर अळवार हे विष्णुभक्त होते. शिव आणि विष्णू एकच आहेत, असे मानून त्यांच्यामध्ये समन्वय करण्याचे प्रयत्नही झाले. अर्धा भाग विष्णूचा आणि अर्धा भाग शिवाचा दाखवून 'हरिहर' या स्वरूपातील मूर्तीही मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आल्या. या भक्ती चळवळींमध्ये समाजाच्या सर्व स्तरांमधील लोक सहभागी झाले होते. ईश्वरप्रेम, माणुसकी, भूतदया, करुणा इत्यादी मूल्यांची शिकवण त्यांनी दिली. दक्षिण भारतात रामानुज आणि इतर आचार्यांनी भक्ती चळवळीचा पाया भक्कम केला. ईश्वर सर्वांसाठी आहे, ईश्वर भेदभाव करत नाही, असे त्यांनी सांगितले. उत्तर भारतातही रामानुजांच्या शिकवणुकीचा मोठा प्रभाव पडला.


संत कबीर

उत्तर भारतात संत रामानंद यांनी भक्तीचे महत्त्व सांगितले. संत कबीर हे भक्ती चळवळीतील एक विख्यात संत होत. त्यांनी तीर्थक्षेत्रे, व्रते, मूर्तिपूजा यांना महत्त्व दिले नाही. सत्यालाच ईश्वर मानले. सर्व मानव एक आहेत, अशी शिकवण दिली. जातिभेद, पंथभेद, धर्मभेद मानले नाहीत. त्यांना हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य साधायचे होते. त्यांनी हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्मांतील कट्टर लोकांना कडक शब्दांत फटकारले.

बंगालमध्ये चैतन्य महाप्रभू यांनी कृष्णभक्तीचे महत्त्व सांगितले. त्यांच्या उपदेशामुळे लोक जातीची आणि पंथांची बंधने ओलांडून भक्ती चळवळीत सहभागी झाले. चैतन्य महाप्रभूंच्या प्रभावाने शंकरदेव यांनी आसाममध्ये कृष्णभक्तीचा प्रसार केला. गुजरातमध्ये संत नरसी मेहता हे प्रसिद्ध वैष्णव संत होऊन गेले. ते निस्सीम कृष्णभक्त होते. त्यांनी समतेचा संदेश दिला. त्यांना गुजराती भाषेचे आद्य कवी मानतात.

संत मीराबाईंनी कृष्णभक्तीचा महिमा सांगितला. त्या मेवाडच्या राजघराण्यातील होत्या. राजघराण्यातील सुखांचा त्याग करून त्या कृष्णभक्तीत तल्लीन झाल्या. राजस्थानी व गुजराती भाषांमध्ये त्यांनी

भक्तिरचना केल्या. त्यांची भक्तिगीते भक्ती, सहिष्णुता व मानवता यांचा संदेश देणारी आहेत. संत रोहिदास हे एक महान संत होते. त्यांनी समतेचा व मानवतेचा संदेश दिला. संत सेना हे एक प्रभावी संत होऊन गेले. हिंदी साहित्यातील महाकवी सूरदास यांनी 'सूरसागर' हे काव्य लिहिले. कृष्णभक्ती हा त्यांच्या काव्याचा विषय आहे. मुस्लिम संत रसखान यांनी लिहिलेली कृष्णभक्तीची गीते रसाळ आहेत. संत तुलसीदासांच्या 'रामचरितमानस' या ग्रंथात रामभक्तीचा सुंदर आविष्कार झालेला आढळतो.

कर्नाटकात बसवेश्वरांनी लिंगायत विचारधारेचा प्रसार केला. त्यांनी जातिभेदाला विरोध केला. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व सांगितले. त्यांचे 'कायकवे कैलास' हे प्रसिद्ध वचन आहे. त्याचा अर्थ श्रम हाच कैलास होय, असा आहे. आपल्या चळवळीमध्ये स्त्रियांनाही सहभागी करून घेतले. 'अनुभवमंटप' या सभागृहामध्ये होणाऱ्या धर्मचर्चेत सर्व जातींचे स्त्री-पुरुष सहभागी होऊ लागले. त्यांनी आपली शिकवण कन्नड या लोकभाषेमध्ये वचनसाहित्याच्या माध्यमातून दिली. त्यांच्या कार्याचा समाजावर मोठा परिणाम झाला. बसवेश्वरांच्या अनुयायांनी मराठी भाषेतही रचना केल्या आहेत. त्यांपैकी मन्मथ स्वामी यांनी लिहिलेला 'परमरहस्य' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. कर्नाटकमध्ये पंप, पुरंदरदास इत्यादी थोर संत होऊन गेले. त्यांनी कन्नड भाषेत अनेक भक्तिकवने रचली.



श्री बसवेश्वर

**महानुभाव पंथ :** तेराव्या शतकात चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात 'महानुभाव' पंथ प्रवर्तित केला. हा कृष्णभक्तीचा उपदेश करणारा पंथ आहे. श्रीगोविंदप्रभू हे चक्रधर स्वामींचे गुरू होते. चक्रधरांच्या शिष्यांमध्ये सर्व जाती-जमातींमधील स्त्री-पुरुषांचा समावेश होता. ते समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी महाराष्ट्रभर भ्रमंती करत मराठीतून उपदेश केला. संस्कृतऐवजी मराठी भाषेला प्राधान्य दिले. त्यामुळे मराठी भाषेचा विकास झाला. मराठी भाषेमध्ये विपुल ग्रंथनिर्मिती झाली.



चक्रधरस्वामी

या पंथाचा प्रसार महाराष्ट्रात प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाडा या भागांत झाला. विदर्भातील ऋद्धिपूर हे या पंथाचे महत्त्वाचे स्थान होय. तसेच हा पंथ पंजाब, अफगाणिस्तान अशा दूरवरच्या प्रदेशापर्यंत पोहचला होता.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महानुभाव पंथाच्या अनुयायांनी केलेल्या काही प्रमुख रचना पुढीलप्रमाणे: म्हाइंभट यांनी संपादित केलेला चक्रधरांच्या लीळांचे वर्णन करणारा 'लीळाचरित्र' हा ग्रंथ, आद्य मराठी कवयित्री महदंबा यांचे 'धवळे', केशोबास यांनी संपादित केलेले 'सूत्रपाठ आणि दृष्टान्तपाठ', दामोदर पंडितांचे 'वच्छाहरण', भास्करभट्ट बोरीकर यांचा 'शिशुपालवध', नरेंद्रांचे 'रुक्मिणीस्वयंवर'.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराष्ट्रात संत एकनाथांनी लिहिलेला हिंदू व मुसलमान यांच्यातील संवाद धार्मिक समन्वयाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. संत शेख महंमद यांचे '*शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।*' हे प्रसिद्ध वचन या समन्वयाचे एक उदाहरण होय.

**गुरुनानक :** गुरुनानक हे शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू होत. धार्मिक समन्वयाचा एक मोठा प्रयत्न म्हणून त्यांच्या कार्याचा उल्लेख करावा

लागेल. त्यांनी हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांच्या विविध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. ते मक्केलाही गेले होते. भक्तिभावना सगळीकडे सारखीच आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. सर्वांशी सारखेपणाने वागावे, अशी त्यांची शिकवण होती. हिंदू आणि मुस्लिम यांचे ऐक्य साधावे, यासाठी त्यांनी उपदेश केला. शुद्ध आचरणावर भर दिला.


गुरुनानक

गुरुनानकांच्या उपदेशाने अनेक लोक प्रभावित झाले. त्यांच्या शिष्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. गुरुनानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजे 'शीख' असे म्हणतात. 'गुरुग्रंथसाहिब' हा शिखांचा पवित्र ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये स्वतः गुरुनानक, संत नामदेव, संत कबीर इत्यादी संतांच्या रचनांचा समावेश आहे.

गुरुनानकांनंतर शिखांचे नऊ गुरू झाले. गुरुगोविंदसिंग हे शिखांचे दहावे गुरू होत. त्यांच्यानंतर सर्व शीख गुरुगोविंदसिंगांच्या आज्ञेप्रमाणे 'गुरुग्रंथसाहिब' या धर्मग्रंथालाच गुरू मानू लागले.

**सुफी पंथ :** सुफी हा इस्लाममधील एक पंथ होय. परमेश्वर प्रेममय आहे. प्रेम व भक्ती या मार्गांनीच परमेश्वरापर्यंत पोहचता येते. अशी सुफी साधूंची श्रद्धा होती. सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करावे, परमेश्वराचे चिंतन करावे, साधेपणाने राहावे, अशी त्यांची शिकवण होती. ख्वाजा मोइनुद्दीन चिस्ती, शेख निझामुद्दीन अवलिया हे थोर सुफी संत होत. सुफी संतांच्या उपदेशामुळे हिंदू-मुसलमान समाजात ऐक्य निर्माण झाले. भारतीय संगीतात सुफी संगीत परंपरेने मोलाची भर घातली आहे.

संतांनी सांगितलेला भक्तिमार्ग सर्वसामान्यांना आचरण्यास सोपा होता. सर्व स्त्री-पुरुषांना भक्ती चळवळीमध्ये प्रवेश होता. संतांनी आपले विचार लोकभाषेतून मांडले. सर्वसामान्य लोकांना ते अधिक जवळचे वाटले. भारतीय संस्कृतीची जी जडणघडण झाली आहे, तिच्यामध्ये भक्तिमार्गाचा फार मोठा वाटा आहे.



## स्वाध्याय

**१. परस्परसंबंध शोधून लिहा.**

(१) श्री बसवेश्वर : कर्नाटक, मीराबाई : ..........

(२) रामानंद : उत्तर भारत, चैतन्य महाप्रभू : .....

(३) चक्रधर : .......... , शंकरदेव : ............

**२. खालील तक्ता पूर्ण करा.**

| | प्रसारक | ग्रंथ |
|---|---|---|
| (१) भक्ती चळवळ | -------- | -------- |
| (२) महानुभाव पंथ | -------- | -------- |
| (३) शीख धर्म | -------- | -------- |

**३. लिहिते व्हा.**

(१) संत कबीर हे भक्ती चळवळीतील विख्यात संत म्हणून उदयास आले.

(२) संत बसवेश्वरांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम.

**४. खालील चौकटीत लपलेली संतांची नावे शोधा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गु | रु | गो | विं | द | सिं | ग | स | स |
| रू | रा | मा | नं | न | सू | र | दा | स |
| ना | से | त | सं | र | ल | र | ही | पं |
| न | च | स | सा | त | द | बी | रो | प |
| क | म | ग | म | रं | अ | क | स | आ |
| ब | र | स | पु | अ | प्र | थ | म | रू |
| म | न्म | थ | स्वा | मी | रा | बा | ई | स |

**उपक्रम**

सुफी संगीत परंपरेतील एखादे भजन मिळवून सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.


# ४. शिवपूर्वकालीन महाराष्ट्र

सतराव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रातील बहुतांश प्रदेश अहमदनगरचा निजामशाह आणि विजापूरचा आदिलशाह यांच्या ताब्यात होता. मुघलांचा खानदेशामध्ये शिरकाव झालेला होता. दक्षिणेमध्ये आपला सत्ताविस्तार घडवून आणणे हे त्यांचे उद्‌दिष्ट होते. कोकणच्या किनारपट्‌टीवर आफ्रिकेतून आलेल्या सिद्‌दी लोकांच्या वस्त्या होत्या. याच काळात युरोपातून आलेल्या पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच इत्यादी सत्तांमधील सागरी स्पर्धा आणि संघर्ष तीव्र होत होता. त्यांच्यात व्यापारासाठी बाजारपेठा काबीज करण्याची चढाओढ लागली होती. पश्चिम किनारपट्‌टीवरील गोव्यात आणि वसईत पोर्तुगिजांनी अगोदरच राज्य स्थापन केले होते; तर इंग्रज, डच, फ्रेंच यांनी व्यापारी कंपन्यांच्या माध्यमांतून वखारींच्या रूपात चंचुप्रवेश केला होता. या सर्व सत्ता एकमेकांना आजमावत व स्वतःला सुरक्षित ठेवत. तसेच जमेल तेवढे वर्चस्व करण्याच्या बेतात होत्या. या संघर्षामुळे महाराष्ट्रात अस्थिरता व असुरक्षितता निर्माण झाली होती. युरोपातील या वेगवेगळ्या लोकांना त्यांच्या शिरस्त्राणावरून 'टोपकर' म्हणत.

शिवपूर्वकाळातील लोकवस्ती, प्रजा आणि राज्यकर्ते यांच्यामधील दुवा म्हणून कार्य करणारे अधिकारी, बाजारपेठा, कारागीर वगैरेंचे स्वरूप समजण्यासाठी गाव (मौजा), कसबा आणि परगणा या भौगोलिक स्थानांची ओळख होणे आवश्यक आहे. अनेक गावांचा परगणा होत असे. सामान्यतः परगण्याच्या मुख्य ठिकाणाला कसबा म्हणत असत. कसब्यापेक्षा लहान असलेल्या गावाला मौजा म्हणत असत. आपण आता गाव, कसबा आणि परगणा यांची क्रमशः संक्षिप्त ओळख करून घेऊ.

**गाव (मौजा) :** बहुतेक लोक गावामध्येच राहत. गावाला मौजा असेही म्हणत. पाटील हा गावाचा प्रमुख असे. लोकांनी गावातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणावी, यासाठी तो प्रयत्न करी. गावामध्ये तंटाबखेडा होत असे, तेव्हा शांतता निर्माण करण्याचे काम पाटील करत असे. त्याच्या कामात कुलकर्णी मदत करत. जमा झालेल्या महसुलाची नोंद करणे हे काम कुलकर्णी करत असे. गावामध्ये निरनिराळे कारागीर असत. त्यांच्याकडे व्यवसायासंबंधीचे हक्क वंशपरंपरेने चालत आलेले असत. गावात कारागीर जी सेवा देत असत, त्याबद्‌दल शेतकऱ्यांकडून त्यांना शेतीतील उत्पन्नाचा काही वाटा मिळे. त्यास बलुतं असे म्हणत.

**कसबा :** कसबा हे एक मोठे खेडेगावच असे. सामान्यतः ते परगण्याचे मुख्य ठिकाण असे. उदा., इंदापूर परगण्याचे मुख्य ठिकाण इंदापूर कसबा, वाई परगण्याचे मुख्य ठिकाण वाई कसबा. गावाप्रमाणेच कसब्यामध्ये मुख्य व्यवसाय शेतीचा असे. तेथे सुतार, लोहार इत्यादी कुशल कारागीरही असत. कसब्याला जोडूनच बाजारपेठ असे. शेटे व महाजन हे पेठेचे वतनदार कारभारी असत. प्रत्येक गावात पेठ होतीच असे नाही. मात्र गावात पेठ वसवण्याचे काम शेटे-महाजनांचे असे. त्यासाठी त्यांना सरकारातून जमीन आणि गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. पेठेचे हिशोब ठेवण्याचे काम महाजन पाहत असे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

वीरमाता जिजाबाईंच्या आज्ञेनुसार पुण्याजवळील पाषाण येथे एक पेठ वसवली गेली. तिला 'जिजापूर' असे म्हणतात. मालपुरा, खेलपुरा, परसपुरा, विठापुरा या देखील मालोजी, खेलोजी, परसोजी आणि विठोजी यांच्या नावे औरंगाबाद येथे वसवलेल्या नव्या पेठा आहेत. 'खेड'ला जोडून असलेले 'शिवापूर' ही शिवाजी महाराजांच्या नावे वसवलेली पेठ होती.

**जाणून घेऊया.**

दोन खेडी स्वतंत्र आहेत हे दर्शवण्याकरिता 'बुद्रुक' आणि 'खुर्द' या नावांचा उपयोग केला जातो. मूळ गाव 'बुद्रुक' आणि नवीन गाव 'खुर्द'. उदा., वडगाव बुद्रुक आणि वडगाव खुर्द.

**परगणा :** अनेक गावे मिळून परगणा होत असला तरी सर्व परगण्यांतील गावांची संख्या समान नसे. उदा., पुणे परगणा. हा मोठा परगणा होता. त्यात २९० गावे होती. चाकण परगण्यात ६४ गावे होती. शिरवळ परगणा लहान होता. त्यात ४० गावे होती. देशमुख व देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी असत. देशमुख हा परगण्यातील पाटलांचा प्रमुख असे. गावपातळीवर जे काम पाटील करत असे तेच काम परगणा पातळीवर देशमुख करत असे. तसेच परगण्यातील सर्व कुलकर्ण्यांचा प्रमुख देशपांडे असे. गावपातळीवर कुलकर्णी जे काम करत असे, ते काम परगणा पातळीवर देशपांडे करत असे. हे वतनदार अधिकारी रयत आणि सरकार यांच्यामधील दुवा होते.

परगण्यातील गावांवरती कधी परचक्र आले किंवा दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली, तर रयतेचे म्हणणे सरकारकडे मांडण्याचे काम वतनदार करत. काही वेळेला हे अधिकारी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करत. ते कधी रयतेकडून अधिक पैसा जमा करत, तर कधी रयतेकडून गोळा केलेली रक्कम सरकारकडे जमा करण्यास विलंब लावत. अशा वेळी प्रजा त्रासली जात असे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

वतन हा अरेबिक शब्द असून महाराष्ट्रात तो वंशपरंपरेने आणि कायमस्वरूपी उपभोगायची सारामुक्त जमीन अशा अर्थी वापरला जातो.

**दुष्काळाचे संकट :** शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असे. पाऊस पडला नाही तर शेतात पीक येत नसे. मग अन्नधान्याचे भाव वाढत. लोकांना अन्नधान्य मिळणे मुश्कील होई. जनावरांना चारा मिळत नसे. पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होई. लोकांना गावात राहणे कठीण होई. लोक गाव सोडत. लोकांवर परागंदा होण्याची वेळ येई. दुष्काळ हे रयतेला सर्वांत मोठे संकट वाटे.

महाराष्ट्रामध्ये असाच एक मोठा दुष्काळ इ.स.१६३० मध्ये पडलेला होता. या दुष्काळाने लोक हवालदिल झाले. धान्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. भाकरीच्या तुकड्यासाठी लोक स्वतःला विकून घेण्यास तयार होते, पण विकत घेणाराच कोणी नव्हता, असे वर्णन वाचायला मिळते. कुटुंबे उद्‌ध्वस्त झाली, गुरे-ढोरे मेली. शेती व्यवसाय खचला. उद्योगधंदे संपुष्टात आले. आर्थिक व्यवहार खुंटले. लोक देशोधडीला लागले. अशा उद्‌ध्वस्त झालेल्या लोकजीवनाची घडी बसवणे हे एक मोठे आव्हान होते.

**वारकरी पंथाचे कार्य :** अंधश्रद्‌धा व कर्मकांड यांचा समाजावर जबरदस्त पगडा होता. लोक दैववादाच्या आहारी गेले होते. त्यांची प्रयत्नशीलता थंडावली होती. रयतेची स्थिती फारच हलाखीची होती. अशा परिस्थितीत समाजात चैतन्य निर्माण करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रातील वारकरी पंथाने केले.

महाराष्ट्रात संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांच्यापासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या संतांनी पुढे चालवली. या संत परंपरेमध्ये समाजातील सर्व स्तरांतील लोक होते. उदा., संत चोखामेळा, संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत सेना, संत शेख महंमद इत्यादी. त्याचप्रमाणे संत मंडळींत संत चोखोबांची पत्नी संत सोयराबाई आणि बहीण संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई सिऊरकर यांसारख्या स्त्रियाही होत्या. या संत चळवळीचे पंढरपूर हे केंद्र होते. विठ्ठल हे त्यांचे दैवत होते. पंढरपुरात चंद्रभागेच्या काठी ही सर्व संतमंडळी आणि वारकरी भक्तिसागरात न्हाऊन

निघत. तेथे भजन, कीर्तन आणि सहभोजन (काला) या माध्यमातून समतेचा प्रसार होई.



संत नामदेव

**संत नामदेव :** हे वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ संत होते. ते कुशल संघटक होते. ते उत्तम कीर्तनकारही होते. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी सर्व जाती-जमातींमधील स्त्री- पुरुषांना एकत्र करून त्यांच्यात समतेची भावना जागवली. '**नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।**' ही त्यांची प्रतिज्ञा होती. त्यांची अभंगरचना प्रसिद्ध आहे. अनेक संतांवर आणि सर्वसामान्य लोकांवर त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव पडला. ते आपल्या विचारांचा प्रसार करत पंजाबपर्यंत गेले होते. त्यांनी लिहिलेली पदे शिखांच्या 'गुरुग्रंथसाहिब' या ग्रंथात समाविष्ट आहेत. त्यांनी भागवत धर्माचा संदेश गावोगावी पोचवण्याचे कार्य केले. त्यांनी पंढरपूर येथे विठ्ठलाच्या महाद्वारासमोर संत चोखामेळा यांची समाधी बांधली. हे त्यांचे कार्य अविस्मरणीय आहे.

**संत ज्ञानेश्वर :** हे वारकरी संप्रदायातील एक विख्यात संत होत. त्यांनी 'भगवद्‌गीता' या संस्कृत ग्रंथाचा अर्थ मराठीत स्पष्ट करणारा 'भावार्थदीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ रचला. तसेच त्यांनी 'अमृतानुभव' या ग्रंथाची रचना केली. त्यांनी आपल्या ग्रंथांतून व अभंगांतून भक्तिमार्गाचे महत्त्व सांगितले. सामान्यांना आचारता येईल, असा आचारधर्म सांगितला. वारकरी संप्रदायाला धर्माची प्रतिष्ठा मिळवून दिली. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागलेले असूनही त्यांनी आपल्या मनाचे संतुलन ढळू दिले नाही आणि कटुताही बाळगली नाही. ज्ञानेश्वरीतील 'पसायदान' उदात्त संस्कार करणारे आहे. ज्ञानेश्वरांचे बंधू संत निवृत्तिनाथ व संत सोपानदेव आणि भगिनी मुक्ताबाई यांच्याही काव्यरचना प्रसिद्ध आहेत.



संत ज्ञानेश्वर

**संत एकनाथ :** हे महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीतील एक महान संत होत. त्यांचे साहित्य विपुल व विविध प्रकारचे आहे. त्यात अभंग, गौळणी, भारुडे इत्यादींचा समावेश होतो. त्यांनी भागवत धर्माची मांडणी सोपी व सविस्तर केलेली आहे. भावार्थ रामायणात रामकथेच्या निमित्ताने लोकजीवनाचे चित्र रेखाटले आहे. त्यांनी भागवत या संस्कृत ग्रंथाच्या भक्तीविषयक भागाचा अर्थ मराठीत विशद केला. त्यांच्या अभंगात जिव्हाळा आहे. परमार्थप्राप्तीसाठी प्रपंच सोडण्याची आवश्यकता नाही, हे त्यांनी स्वतःच्या आचरणाने दाखवून दिले. ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. आपली मराठी भाषा कोणत्याही भाषेपेक्षा कमी नाही असे ते मानत. '**संस्कृत वाणी देवे केली । तरी प्राकृत काय चोरापासुनि झाली ?**' असे त्यांनी संस्कृत पंडितांना ठणकावून विचारले. त्यांनी इतर धर्मांचा तिरस्कार करणारांवर कडक टीका केली आहे.



संत एकनाथ

**संत तुकाराम :** हे पुण्याजवळील देहू गावचे. त्यांची अभंगरचना प्रसन्न आणि प्रासादिक आहे. त्यांच्या अभंगांना श्रेष्ठ कवित्वाची उंची लाभली आहे. संत तुकारामांची 'गाथा' ही मराठी भाषेचा अमोल ठेवा आहे.



संत तुकाराम

ते रंजल्यागांजल्यांमध्ये देवत्व पाहण्यास सांगताना म्हणतात, **'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा ॥'** आपल्या या दृष्टिकोनामुळेच त्यांनी आपल्याकडे असलेली लोकांना दिलेल्या कर्जांची कागदपत्रे इंद्रायणी नदीच्या डोहात बुडवली आणि कित्येक कुटुंबांना कर्जमुक्त केले. त्यांनी समाजातील दांभिकतेवर व अंधश्रद्धांवर अत्यंत कडक शब्दांत टीका केली. भक्तीला नीतीची जोड देण्यावर त्यांचा भर होता. **'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ॥'** असे त्यांच्या शिकवणुकीचे सार सांगता येईल. समाजातील काही कर्मठ लोकांनी ते करत असलेल्या लोकजागृतीला विरोध केला. त्यांना मुळात अभंग रचण्याचा अधिकारच नाही, असा दावा करून त्यांनी त्यांच्या वह्या इंद्रायणी नदीच्या डोहात बुडवल्या. त्यांनी या सर्व विरोधाला धीरोदात्तपणे तोंड दिले.

संत तुकारामांचे शिष्य आणि सहकारी विविध जाती-जमातींचे होते. नावजी माळी, गवनरशेट वाणी, संताजी जगनाडे, शिवबा कासार, बहिणाबाई सिऊरकर, महादजीपंत कुलकर्णी ही त्यांतली काही नावे. गंगारामपंत मवाळ आणि संताजी जगनाडे यांनी संत तुकारामांचे अभंग लिहून ठेवले ही त्यांची महत्त्वाची कामगिरी होय.

**संतकार्याची फलश्रुती :** संतांनी लोकांना समतेचा संदेश दिला. माणुसकी व मानवताधर्म शिकवला. एकमेकांवर प्रेम करावे, एकत्र यावे व एकजुटीने राहावे, ही त्यांची शिकवण होती. त्यांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. परचक्र, दुष्काळजन्य परिस्थिती किंवा निरनिराळ्या प्रकारची इतर निसर्गसंकटे आली असता, त्यांची पर्वा न करता कसे जगावे, याविषयी त्यांनी केलेला उपदेश हा लोकांचा मोठा आधार ठरला. त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

समाजात धर्माची अवनती झाली होती. अशा वेळी संतांनी पुढे येऊन समाजाचे रक्षण केले. ते धर्माचा खरा अर्थ सांगू लागले. लोकांमध्ये राहून त्यांची सुखदु:खे समजावून घेत भक्तिमार्गाचा पुरस्कार करू लागले. अशा वेळी समाजातील काही कर्मठ लोक त्यांना विरोध करू लागले. हा विरोध सहन करणे म्हणजे आपल्या कर्तव्याचाच एक भाग आहे, असे संत मानत असत. **'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥'** या शब्दांत संत तुकारामांनी खऱ्या संताचे लक्षण सांगितले आहे.

शास्त्री-पंडितांच्या अवघड भाषेतील धर्माला संतांनी सर्वसामान्यांच्या भाषेत आणले. दैनंदिन व्यवहारातील भाषेत त्यांनी परमेश्वराची आळवणी केली. परमेश्वरापुढे सर्व समान आहेत अशी भूमिका घेतली. वर्ण आणि जातीचा अहंकार बाजूला सारून आपण एकमेकांना 'परमेश्वराची लेकरे' या स्वरूपात पहायला हवे, ही शिकवण समाजाला दिली. या सर्व संतांचे वैशिष्ट्य म्हणजे भक्ती करत असताना त्यांनी आपापली कर्तव्यकर्मे सोडली नाहीत. त्यांनी आपापल्या कामात परमेश्वर पाहिला. **'कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ॥'** असे संत सावता महाराज म्हणाले. त्यांचे हे विधान शेतीच्या कामासंदर्भात असले तरी ते संतांच्या दैनंदिन जीवनातल्या अन्य प्रकारच्या कामांनाही लागू आहे. संत आपापले व्यवसाय सांभाळून भक्ती, उपदेश, कवित्व करत राहिले. त्यांनी समाजाच्या नैतिक जाणिवा विकसित केल्या.



**चला, चर्चा करूया.**

पंढरपूरच्या वारीविषयी अधिक माहिती मिळवून पुढील मुद्द्यांविषयी चर्चा करा.

- वारकरी वारीला कोणत्या महिन्यात जातात ?
- वारीचे नियोजन कसे असते ?

**रामदास स्वामी :** रामदास स्वामी मराठवाड्यातील जांब गावचे. त्यांनी बलोपासनेचे महत्त्व स्पष्ट केले.

**'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।'** हा त्यांचा संदेश प्रसिद्ध आहे. त्यांनी दासबोध, करुणाष्टके, मनाचे श्लोक या साहित्याच्या माध्यमातून जनतेला व्यावहारिक शिक्षणाचे धडे दिले. लोकचळवळीचे आणि लोकसंघटनेचे महत्त्व सांगितले. समर्थ संप्रदाय स्थापन केला. चाफळ हे या संप्रदायाचे केंद्र होते. रामाच्या आणि हनुमानाच्या उपासनेचा प्रसार केला.



रामदास स्वामी

आपल्या विचारांच्या प्रसारार्थ त्यांनी भरपूर प्रवास केला.

**पारतंत्र्यातील स्वातंत्र्याच्या प्रेरणा :** शिवपूर्वकालीन महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी प्रकारची स्थिती ही सामान्यतः अशी होती. या काळात महाराष्ट्र आदिलशाही वगैरे सत्तांच्या नियंत्रणाखाली होता. त्यामुळे तो स्वतंत्र नव्हता. असे असले तरी काही व्यक्ती आणि विचारधारा स्वातंत्र्याची स्वप्ने पाहत होत्या. अशा घटकांमध्ये स्वराज्य संकल्पक मानल्या जाणाऱ्या शहाजी राजांचे स्थान अग्रभागी होते.

## स्वाध्याय

**१. खालील तक्ता पूर्ण करा.**

| | गाव/मौजा | कसबा | परगणा |
|---|---|---|---|
| कशास म्हणतात | ------ | ----- | ------ |
| पदाधिकारी | ------ | ----- | ------ |
| उदाहरण | ------ | ----- | ------ |

**२. म्हणजे काय ?**

(१) बुद्रुक –

(२) बलुतं –

(३) वतन –

**३. शोधून लिहा.**

(१) कोकण किनारपट्टीवर आफ्रिकेतून आलेले लोक –

(२) अमृतानुभव ग्रंथाचे रचनाकार –

(३) संत तुकारामांचे गाव –

(४) भारुडाचे रचनाकार –

(५) बलोपासनेचे महत्त्व सांगणारे –

(६) स्त्री संतांची नावे –

**४. तुमच्या शब्दांत माहिती व कार्ये लिहा.**

(१) संत नामदेव (२) संत ज्ञानेश्वर

(३) संत एकनाथ (४) संत तुकाराम

**५. दुष्काळ हे रयतेला मोठे संकट का वाटत होते ?**

**उपक्रम**

(१) वारकऱ्यांच्या दिंडीला आपण कशाप्रकारे मदत कराल, त्याचे नियोजन लिहा.

(२) विविध संतांची वेशभूषा करून त्यांच्या काव्यांचे सादरीकरण करा.



# ५. स्वराज्यस्थापना

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व उदयास आले. त्यांनी येथील अन्यायी राजसत्तांना आव्हान देऊन स्वराज्याची स्थापना केली. त्यांचा जन्म शके १५५१, फाल्गुन वद्य तृतीयेस म्हणजेच १९ फेब्रुवारी, १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांनी केलेल्या स्वराज्यस्थापनेची माहिती आपण या पाठात करून घेणार आहोत.



शहाजीराजे

**शहाजीराजे :** शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे हे दक्षिणेतील एक मातब्बर सरदार होते. मुघलांनी निजामशाही जिंकून घेण्यासाठी मोहीम हाती घेतली. या मोहिमेत विजापूरच्या आदिलशाहाने मुघलांशी सहकार्य केले. मुघलांचा दक्षिणेत प्रवेश होऊ नये, ही शहाजीराजांची भावना होती. म्हणून त्यांनी मुघलांना प्रखर विरोध करून निजामशाही वाचवण्याचा प्रयत्न केला; परंतु मुघल व आदिलशाही यांच्या सामर्थ्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. इ.स.१६३६ मध्ये निजामशाहीचा पाडाव होऊन ती नष्ट झाली.

निजामशाहीचे अस्तित्व संपुष्टात आल्यानंतर शहाजीराजे विजापूरच्या आदिलशाहीचे सरदार झाले. शहाजीराजांकडील भीमा व नीरा या नद्यांमधील पुणे, सुपे, इंदापूर व चाकण हे परगणे हा त्यांच्या मूळ जहागिरीचा मुलूख आदिलशाहाने त्यांच्याकडेच ठेवला. आदिलशाहाकडून त्यांना कर्नाटकात बंगळूरू व त्याच्या आसपासचा प्रदेश जहागीर म्हणून मिळाला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

जहागीर – जहागीर म्हणजे एखाद्या प्रदेशाचा वसूल उपभोगण्याचा हक्क. राज्यकर्त्यांच्या सेवेमध्ये ज्यांना सरदारकी मिळे, त्यांना रोख रकमेच्या स्वरूपात वेतन न देता वेतनाच्या रकमेइतके उत्पन्न महसुलातून मिळेल एवढा प्रदेश नेमून दिला जात असे. त्याला 'जहागीर' म्हणत.

शहाजीराजे पराक्रमी, धैर्यशील, बुद्धिमान आणि श्रेष्ठ राजनीतिज्ञ होते. ते उत्तम धनुर्धर होते. तसेच, तलवार, पट्टा आणि भाला चालवण्यात पटाईत होते. प्रजेवर ते अतिशय प्रेम करत असत. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तमिळनाडू येथील अनेक प्रदेश त्यांनी जिंकून घेतले होते. दक्षिण भारतात त्यांचा मोठा दरारा होता. शिवराय आणि जिजाबाई बंगळूरू येथे असताना त्यांनी शिवरायांना राजा बनण्यासाठी योग्य असे उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. परकीय लोकांच्या सत्ता उलथवून स्वराज्य स्थापन करावे, ही त्यांची स्वतःची तीव्र आकांक्षा होती. म्हणूनच त्यांना स्वराज्य संकल्पक म्हटले जाते. त्यांनी शिवराय आणि जिजाबाई यांना विश्वासू व कर्तबगार सहकाऱ्यांनिशी बंगळूरूहून पुण्याला पाठवले.

**वीरमाता जिजाबाई :** जिजाबाई बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील मातब्बर सरदार लखुजीराजे जाधव यांच्या कन्या होत. त्यांना लहानपणीच विविध विद्यांबरोबर लष्करी शिक्षणही मिळाले होते. शहाजी महाराजांचे स्वराज्य स्थापन करण्याचे स्वप्न साकार व्हावे, म्हणून त्या त्यांना प्रोत्साहन देऊन साहाय्य करत असत. त्या कर्तबगार आणि द्रष्ट्या राजनीतिज्ञ होत्या. स्वराज्यस्थापना करण्याच्या कार्यात त्यांनी शिवरायांना सातत्याने मार्गदर्शन केले. प्रसंगी प्रजेचे प्रश्न सोडवण्यासाठी



वीरमाता जिजाबाई

निवाडे देण्याचे कामही त्या करत असत. त्या शिवरायांना उत्तम शिक्षण देण्याच्या बाबतीत सदैव जागरूक होत्या. त्यांनी त्यांच्यावर शील, सत्यप्रियता, वाक्‌चातुर्य, दक्षता, धैर्य, निर्भयता, शस्त्रप्रयोग, विजयाकांक्षा, स्वराज्यस्वप्न इत्यादींचे संस्कार केले.

**शिवरायांचे सहकारी :** शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. मावळ म्हणजे सध्याच्या पुणे जिल्ह्याचा पश्चिम व नैर्ऋत्य दिशांचा भाग होय. मावळचा प्रदेश डोंगराळ, दऱ्याखोऱ्यांचा व दुर्गम. मावळच्या या भौगोलिक परिस्थितीचा उपयोग महाराजांनी स्वराज्यस्थापनेत मोठ्या कौशल्याने केला. त्यांनी लोकांच्या मनात विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण केली. स्वराज्यस्थापनेच्या या कार्यात त्यांना चांगले सवंगडी व सहकारी मिळाले. येसाजी कंक, बाजी पासलकर, बापूजी मुद्‌गल, नऱ्हेकर देशपांडे बंधू, कावजी कोंढाळकर, जिवा महाला, तानाजी मालुसरे, कान्होजी जेधे, बाजीप्रभू देशपांडे, दादाजी नरसप्रभू देशपांडे ही त्यांतील काही नावे होत. या सहकाऱ्यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेचे कार्य हाती घेतले.

**लक्षात ठेवा.**

बारा मावळ : (१) पवणमावळ (२) हिरडस मावळ (३) गुंजणमावळ (४) पौड खोरे (५) मुठे खोरे (६) मुसे खोरे (७) कानद खोरे (८) वेळवंड खोरे (९) रोहीड खोरे (१०) अंदर मावळ (११) नाणे मावळ (१२) कोरबारसे मावळ.

शिवाजी महाराजांच्या पुणे जहागिरीतील सह्याद्रीच्या कुशीत असलेला प्रदेश म्हणजेच मावळ खोरे होय. यांना 'बारा मावळ' असेही म्हणतात.

**करून पहा.**

जिवा महाला, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे या शिवरायांच्या सहकाऱ्यांविषयी अधिक माहिती मिळवा.



राजमुद्रा

**राजमुद्रा :** स्वराज्यस्थापनेमागील शिवाजी महाराजांचे ध्येय त्यांच्या राजमुद्रेवरून स्पष्ट होते. या राजमुद्रेवर पुढील संस्कृत ओळी कोरलेल्या आहेत.

*प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।।*

*शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।*

**अर्थ :** ''शहाजीचा पुत्र शिवाजी याची (शुक्ल पक्षातील) प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारी आणि जिला सर्व विश्वाने वंदन केले आहे – अशी ही मुद्रा (प्रजेच्या) कल्याणासाठी अधिराज्य गाजवते (शोभून दिसते).''

मुद्रेवरील या वचनाचा अर्थ अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. महाराजांनी या वचनातून वडिलांविषयीची कृतज्ञता, स्वराज्य अखंडपणे विस्तारत जाईल हा विश्वास, मुद्रेला म्हणजे पर्यायाने स्वराज्याला सर्वांचा आदर प्राप्त होत असल्याचा

अनुभव, प्रजेचे कल्याण करण्याची बांधीलकी आणि आपल्या भूमीवर स्वतंत्रपणे अधिराज्य करण्याची खात्री, इतक्या गोष्टी व्यक्त केल्या आहेत. या छोट्याशा वचनात स्वराज्याच्या संकल्पनेचे सर्वांगीण सार आले आहे.

**जाणून घेऊया.**

- आपल्या देशाच्या राजमुद्रेचे निरीक्षण करा.
- त्यात कोणकोणत्या गोष्टी दिसतात ?
- राजमुद्रेचा वापर कोठेकोठे केलेला आढळतो ?

**स्वराज्यस्थापनेच्या हालचाली :** शिवाजी महाराजांच्या जहागिरीतील किल्ले हे त्यांच्या अमलात नव्हते, तर ते आदिलशाहीच्या ताब्यात होते. त्या काळात किल्ल्यांचे विशेष महत्त्व होते. किल्ला ताब्यात असला म्हणजे आजूबाजूच्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवता येत असे. 'ज्याचे किल्ले त्याचे राज्य' अशी परिस्थिती असे. आपल्या जहागिरीतील किल्ले आपल्या ताब्यात घेण्याचे महाराजांनी ठरवले. किल्ले ताब्यात घेण्याचा असा प्रयत्न करणे म्हणजे आदिलशाही सत्तेस आव्हान देण्यासारखे होते. त्यांनी तोरणा, मुरूंबदेव, कोंढाणा, पुरंदर हे किल्ले ताब्यात घेतले आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. मुरूंबदेव किल्ल्याची पुनर्बांधणी करून त्याचे नाव 'राजगड' ठेवले. राजगड ही स्वराज्याची पहिली राजधानी होती.



किल्ले राजगड – पाली दरवाजा

आदिलशाहीमध्ये जावळीचे मोरे, मुधोळचे घोरपडे व सावंतवाडीचे सावंत इत्यादी सरदार होते. स्वराज्यस्थापनेच्या कार्यास त्यांचा विरोध होता. या सरदारांचा बंदोबस्त करणे हे स्वराज्यस्थापनेसाठी आवश्यक होते.

**जावळीचा ताबा :** सातारा जिल्ह्यातील जावळी या ठिकाणी चंद्रराव मोरे हा आदिलशाहीतील मातब्बर सरदार होता. स्वराज्यस्थापनेच्या कार्यास त्याने विरोध दर्शवला. तेव्हा इ.स.१६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी जावळीवर स्वारी करून तो प्रदेश जिंकून घेतला. तेथे आपले ठाणे वसवले. नंतर रायगडही जिंकून घेतला. जावळीची प्रचंड संपत्ती त्यांच्या हाती पडली. या विजयानंतर त्यांच्या कोकणातील हालचाली वाढल्या. त्यांनी जावळीच्या खोऱ्यात प्रतापगड हा किल्ला बांधला. या विजयामुळे त्यांचे सामर्थ्य सर्व प्रकारे वाढले.

शिवाजी महाराजांनी यानंतर कल्याण व भिवंडी ही ठिकाणे जिंकून घेतली. त्यामुळे पश्चिम किनारपट्टीवरील सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या सत्तांशी त्यांचा संबंध आला. या सत्तांशी संघर्ष करायचा असेल, तर आपल्याला प्रबळ असे आरमार उभारले पाहिजे, हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी आरमार उभारणीकडे लक्ष दिले.

**अफजलखानाचे पारिपत्य :** शिवाजी महाराजांनी आपल्या जहागिरीतील व आसपासच्या आदिलशाही प्रदेशातील किल्ले घेण्यास सुरुवात केली. जावळीच्या मोऱ्यांचा विरोध मोडून काढलेला होता. कोकण किनारपट्टीवर स्वराज्यस्थापनेच्या कार्यास गती मिळाली. या सर्व गोष्टी हे आदिलशाहीस आव्हान होते. या वेळी आदिलशाहीचा कारभार बडी साहेबीण पाहत होती. शिवाजी महाराजांचा बंदोबस्त केला पाहिजे, असे तिला वाटत होते. म्हणून तिने आदिलशाहीतील अफजलखान या बलाढ्य व अनुभवी सरदारास शिवाजी महाराजांवर चालून जाण्यास सांगितले.

अफजलखान विजापूरहून वाई येथे आला. त्याला वाई प्रांताची चांगली माहिती होती.

वाईजवळील प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवाजी महाराज आणि अफजलखान यांची १० नोव्हेंबर १६५९ रोजी भेट झाली. या भेटीत अफजलखानाने महाराजांना दगाफटका करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महाराजांनी त्याला ठार मारले आणि आदिलशाही सैन्याचे पारिपत्य केले.

अफजलखानाच्या वधानंतर महाराजांनी लढाईतील जखमी सैनिकांना भरपाई दिली. ज्यांनी या लढाईत चांगली कामगिरी केली, त्यांना बक्षिसे दिली. अफजलखानाच्या सैन्यातील जे सैनिक व अधिकारी त्यांच्या सैन्याच्या हाती लागले, त्यांना त्यांनी चांगली वागणूक दिली.

**सिद्‌दी जौहरची स्वारी :** अफजलखानाच्या पारिपत्यानंतर महाराजांनी आदिलशाहीतील वसंतगड, पन्हाळा व खेळणा हे किल्ले जिंकून घेतले. खेळणा किल्ल्यास त्यांनी 'विशाळगड' असे नाव दिले.

महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाहाने इ.स.१६६० मध्ये सिद्‌दी जौहर या कर्नुल प्रांताच्या सरदारास महाराजांवर चालून जाण्यास सांगितले. त्याला 'सलाबतखान' असा किताब दिला. सिद्‌दी जौहरच्या मदतीस रुस्तुम-इ-जमान, बाजी घोरपडे आणि अफजलखानाचा मुलगा फाजलखान हेही होते. या परिस्थितीत शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्ल्यावर आश्रय घेतला. सुमारे पाच महिने सिद्‌दीच्या सैनिकांचा पन्हाळ्यास वेढा पडला होता. वेढ्यातून बाहेर पडणे महाराजांना कठीण झाले होते. नेतोजी पालकरने बाहेरून सिद्‌दीच्या सैन्यावर हल्ला करून वेढा उठवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचे सैन्य थोडे असल्याने हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. सिद्‌दी वेढा उठवेल, अशी चिन्हे दिसत नव्हती. म्हणून महाराजांनी सिद्‌दीशी बोलणी सुरू केली. त्यामुळे सिद्‌दीने पन्हाळगडास दिलेल्या वेढ्यामध्ये शिथिलता निर्माण झाली. या शिथिलतेचा फायदा महाराजांना झाला.

या प्रसंगी गडावरील शिवा काशिद या बहादूर तरुणाने पुढाकार घेतला. तो दिसायला शिवरायांसारखाच होता. त्याने शिवाजी महाराजांची वेषभूषा करून तो पालखीत बसला. पालखी राजदिंडी दरवाज्यातून बाहेर पडली. सिद्‌दीच्या सैन्याने ती पालखी पकडली. प्रसंग बाका होता. शिवा काशिदने या प्रसंगी स्वराज्यासाठी बलिदान केले. दरम्यान शिवाजी महाराज दुसऱ्या अवघड वाटेने गडाबाहेर पडले. त्यांच्या सोबत बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल देशमुख यांच्यासह निवडक सैनिक होते.

शिवाजी महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यातून बाहेर पडून विशाळगडाकडे निघाले. ही बातमी सिद्‌दीस समजली. त्याच्या सैन्याने त्यांचा पाठलाग केला. शिवरायांनी सिद्‌दीच्या सैन्यास विशाळगडाच्या पायथ्याजवळ थोपवण्याची जबाबदारी बाजीप्रभू देशपांडे याच्याकडे सोपवली. बाजीप्रभूने गजापूरजवळील घोडखिंडीत त्या सैन्यास अडवले. बाजीप्रभूने पराक्रमाची शर्थ केली, परंतु या संघर्षात त्याला वीरमरण आले. त्याच्या सैन्याने सिद्‌दीच्या सैन्याला थोपवून धरल्यामुळे महाराजांना विशाळगडाकडे कूच करणे शक्य झाले. विशाळगडाकडे जाताना त्यांनी पालवनचे दळवी आणि शृंगारपूरचे सुर्वे या आदिलशाही सरदारांचा विरोधही मोडून काढला. त्यानंतर शिवाजी महाराज विशाळगडावर सुखरूप पोचले.

महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकले होते, त्याच वेळी दिल्लीच्या तख्तावर आलेल्या औरंगजेब बादशाहाने मुघल सरदार शायिस्ताखान यास दक्षिणेत पाठवले. त्याने पुणे प्रांतावर स्वारी केलेली होती. त्या वेळी शिवाजी महाराजांचा आदिलशाहीशीही संघर्ष चालू होता. अशा परिस्थितीत, दोन शत्रूंबरोबर एकाच वेळी लढणे, ही गोष्ट बरोबर होणार नाही, हे शिवाजी महाराजांनी लक्षात घेतले. त्यामुळे विशाळगडावर सुखरूप पोचल्यानंतर त्यांनी आदिलशाहाबरोबर तह केला. या तहानुसार त्यांना पन्हाळा किल्ला परत करावा लागला. येथे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेचा एक टप्पा पूर्ण झाला.

## स्वाध्याय

**१. गटात न बसणारा शब्द शोधा.**

(१) पुणे, सुपे, चाकण, बंगळूरू

(२) फलटणचे जाधव, जावळीचे मोरे, मुधोळचे घोरपडे, सावंतवाडीचे सावंत

(३) तोरणा, मुरूंबदेव, सिंहगड, सिंधुदुर्ग

**२. चला, लिहिते होऊया !**

(१) शिवाजी महाराजांवर वीरमाता जिजाबाईंनी केलेले विविध संस्कार लिहा.

(२) शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापनेची सुरुवात मावळ भागातून केली.

**३.** शिवाजी महाराजांचे सवंगडी व सहकारी यांची यादी करा.

**४. शोधा आणि लिहा.**

(१) शहाजीराजांना स्वराज्य संकल्पक का म्हणतात ?

(२) शिवरायांनी आरमार उभारणीकडे लक्ष का दिले ?

(३) शिवरायांनी आदिलशाहाबरोबर तह का केला ?

(४) शिवाजी महाराज पन्हाळगडावरून कसे निसटले ?

**उपक्रम**

(१) तुम्ही पाहिलेल्या एखाद्या किल्ल्याचे वर्णन करा व ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्याबाबत तुम्ही कोणते उपाय सुचवाल ते सांगा.

(२) शेतीचा 'सात/बारा' (७/१२) उतारा मिळवून पाठातील शब्दांचा संबंध समजून घ्या.



किल्ले पन्हाळा - तीन दरवाजा

# ६. मुघलांशी संघर्ष

आतापर्यंत शिवाजी महाराजांनी आदिलशाहीशी यशस्वी संघर्ष केलेला होता; परंतु स्वराज्याचा विस्तार करताना मुघलांशीही संघर्ष अटळ होता. स्वराज्याचा विस्तार होऊ लागताच स्वराज्यावर मुघलांचे संकट आले. महाराजांनी याही संकटावर मात केली. मुघलांकडून आपले किल्ले आणि प्रदेश परत मिळवले. स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. दक्षिणेकडील मोहीम हाती घेतली. या सर्व घटनांची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**शायिस्ताखानाची स्वारी :** फेब्रुवारी १६६० मध्ये शायिस्ताखान अहमदनगरहून निघून पुणे प्रांतात आला. त्याने आसपासच्या प्रदेशात लहान लहान सैन्याच्या तुकड्या पाठवून स्वराज्यातील प्रदेशाची जबर हानी केली. चाकणच्या किल्ल्याला वेढा दिला. चाकणच्या किल्ल्याचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने त्याच्या सैन्याचा तीव्र प्रतिकार केला. परंतु शेवटी त्याने चाकणचा किल्ला जिंकून घेतला.

शिवाजी महाराजांचे बालपण जेथे गेले त्या पुण्यातील लाल महालात शायिस्ताखान तळ ठोकून बसला. तेथून आसपासच्या मुलखाची त्याने लूट चालूच ठेवली. दोन वर्षे झाली, तरी तो पुण्यातील मुक्काम सोडण्याचा विचार करत नव्हता. त्याचा परिणाम प्रजेच्या नीतिधैर्यावर होणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत महाराजांनी एक धाडसी बेत आखला.

शिवाजी महाराजांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली लाल महालावर गुप्तपणे छापा घालण्याची धाडसी योजना आखली. त्यानुसार ५ एप्रिल १६६३ रोजी महाराजांनी रात्रीच्या वेळी निवडक सैन्यासह लाल महालावर छापा घातला. या छाप्यात शायिस्ताखानाची बोटे तुटली. त्याची मानहानी झाली. त्याने पुणे सोडले आणि आपला मुक्काम औरंगाबादला हलवला. या प्रकारामुळे त्याने औरंगजेबाची नाराजी ओढवून घेतली. औरंगजेबाने त्यास बंगालच्या सुभ्यावर पाठवले. शायिस्ताखानवरील या यशस्वी हल्ल्याचा परिणाम लोकांवरही झाला. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वावरील प्रजेचा विश्वास अधिकच वृद्धिंगत झाला.



**सांगा पाहू !**

सुरत या शहराला भेट द्यायची आहे, तर आपण कसे जाल ते नकाशाच्या साहाय्याने दाखवा.

- शिवाजी महाराज सुरतेला कसे पोहचले असतील याची कल्पना करा.

**सुरतेवर स्वारी :** शायिस्ताखानाने तीन वर्षांच्या काळात स्वराज्याचा बराच प्रदेश उद्‌ध्वस्त केला होता. त्याची भरपाई करणे आवश्यक होते. त्यासाठी महाराजांनी मुघलांना धडा शिकवण्याची एक योजना आखली. मुघलांच्या ताब्यातील सुरत हे एक मोठे व्यापारी केंद्र व बंदर होते. तेथे इंग्रज, डच व फ्रेंच यांच्या वखारी होत्या. हे शहर बादशाहाला सर्वांत जास्त महसूल देत होते. तसेच ते आर्थिकदृष्ट्या संपन्न होते म्हणून त्यांनी सुरतेवर स्वारी केली. सुरतेचा सुभेदार इनायतखान महाराजांच्या स्वारीचा प्रतिकार करू शकला नाही. सामान्य प्रजेस त्रास न देता त्यांनी सुरतेमधून विपुल संपत्ती मिळवली. त्यांची ही मोहीम यशस्वी झाली. यामुळे औरंगजेब बादशाहाच्या प्रतिष्ठेस धक्का बसला.

**जयसिंगाची स्वारी :** शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालींचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने मिर्झाराजा जयसिंग हा आपला अनुभवी आणि मातब्बर राजपूत सरदार पाठवला. तो पुण्यामध्ये आला. त्याने महाराजांच्या विरोधात सर्व शक्ती संघटित करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू केले. गोव्याचे व वसईचे पोर्तुगीज, वेंगुर्ल्याचे डच, सुरतेचे

इंग्रज, जंजिऱ्याचे सिद्दी यांनी महाराजांविरुद्‌ध आरमारी मोहीम काढावी, असे जयसिंगाने त्यांना सुचवले.

शिवाजी महाराजांकडील किल्ले जिंकून घेण्याचा बेत आखला. स्वराज्याच्या विविध भागांत मुघल सैनिकांच्या तुकड्या पाठवल्या. त्या सैन्याने स्वराज्यातील भूप्रदेशाची मोठी हानी केली. महाराजांनी मुघलांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखानाने पुरंदर किल्ल्यास वेढा दिला. पुरंदरच्या वेढ्याच्या वेळी मुरारबाजी देशपांडे याने आपल्या पराक्रमाची शर्थ केली, परंतु त्याला वीरमरण आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराजांनी जयसिंगाशी बोलणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी जयसिंगाची भेट घेतली. जयसिंग व महाराज यांच्यात जून १६६५ मध्ये तह झाला. हा तह ‘पुरंदरचा तह’ म्हणून ओळखला जातो. या तहानुसार महाराजांनी मुघलांना तेवीस किल्ले व त्यांच्या भोवतालचा वार्षिक चार लक्ष होन उत्पन्नाचा प्रदेश दिला. आदिलशाहीविरुद्‌ध मुघलांना मदत करण्याचे आश्वासनही दिले. या तहास औरंगजेबाने मान्यता दिली.



**माहिती मिळवा.**

शिवाजी महाराज आग्रा येथे औरंगजेबाच्या नजरकैदेतून कसे निसटले याची माहिती मिळवा.

**आग्रा भेट व सुटका :** पुरंदरच्या तहानंतर जयसिंगाने आदिलशाहीविरुद्‌ध मोहीम हाती घेतली. महाराजांनी जयसिंगास मदत केली, तथापि त्याची ही मोहीम यशस्वी झाली नाही. त्या वेळी, महाराजांना काही काळ तरी दक्षिणेच्या राजकारणापासून दूर ठेवावे, असा विचार जयसिंग व औरंगजेब बादशाह यांनी केला. या विचाराला अनुसरून जयसिंगाने महाराजांनी बादशाहाच्या भेटीस जावे, असा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला. त्यांच्या सुरक्षितेबद्‌दलची हमीदेखील दिली. त्यानुसार शिवाजी महाराज आग्र्याला निघाले. बरोबर राजपुत्र संभाजी होते. तसेच, विश्वासू आणि जीवास जीव देणारे निवडक सहकारीही सोबत होते.

महाराज आग्र्यास पोहचले. तथापि औरंगजेबाने दरबारामध्ये त्यांचा योग्य तो मान ठेवला नाही. त्यामुळे त्यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर बादशाहाने त्यांना नजरकैदेत ठेवले. बादशाहाच्या या कृतीने डगमगून न जाता महाराजांनी नजरकैदेतून आपली सुटका करून घेण्याची योजना आखली. ते आग्र्यातून शिताफीने निसटले आणि काही दिवसांनी महाराष्ट्रात सुरक्षितपणे पोहचले. आग्र्याहून येताना संभाजी राजांना त्यांनी मथुरा येथे ठेवले होते. पुढे त्यांनाही सुखरूपपणे राजगडावर आणण्यात आले. महाराज स्वराज्यापासून दूर असताना स्वराज्याचा कारभार वीरमाता जिजाबाई आणि महाराजांचे सहकारी यांनी सांभाळला.

**मुघलांविरुद्‌ध आक्रमक पवित्रा :** महाराजांना मुघलांबरोबर लगेचच संघर्ष नको असला तरी पुरंदरच्या तहात मुघलांना दिलेले किल्ले आणि प्रदेश परत मिळवणे हे महाराजांचे उद्‌दिष्ट होते. त्यासाठी त्यांनी एक व्यापक व धडाडीची योजना तयार केली. एका बाजूला निरनिराळ्या किल्ल्यांवर जय्यत तयारीनिशी सैन्य पाठवून ते किल्ले घ्यायचे, तर दुसऱ्या बाजूला दख्खनमध्ये मुघलांच्या प्रभुत्वाखाली असलेल्या प्रदेशांवर हल्ले करून त्यांना अस्थिर ठेवायचे, असे हे धोरण होते. यानुसार त्यांनी मुघलांच्या अहमदनगर आणि जुन्नर या प्रदेशांवर हल्ले केले. पुढे एकापाठोपाठ सिंहगड, पुरंदर, लोहगड, माहुली, कर्नाळा आणि रोहिडा हे किल्ले जिंकून घेतले.

यानंतर शिवाजी महाराजांनी दुसऱ्यांदा सुरतेवर स्वारी केली. तेथून परत येताना नाशिक जिल्ह्यातील वणी-दिंडोरी या ठिकाणी त्यांचा मुघलांबरोबर मोठा संघर्ष झाला. या संघर्षात त्यांनी दाऊदखान या मुघल सरदाराचा पराभव केला. त्यानंतर मोरोपंत पिंगळे याने नाशिकजवळील त्र्यंबकगड जिंकून घेतला.

अशारीतीने महाराजांच्या मुघलांविरुद्‌धच्या चढाईच्या धोरणास यश मिळाले. या चढाईच्या मोहिमांमध्ये तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर इत्यादी सरदारांनी मोलाची कामगिरी केली. या मोहिमांचे वर्णन कृष्णाजी अनंत सभासद या बखरकाराने पुढीलप्रमाणे केले आहे – ''चहू महिन्यात सत्तावीस गड घेतले. मोठी ख्याती केली.''



छत्रपती शिवाजी महाराज

**राज्याभिषेक :** सतत तीस वर्षांच्या अविश्रांत परिश्रमातून मराठ्यांचे स्वराज्य साकार झाले होते. तथापि स्वराज्याचे अस्तित्व स्वतंत्र व सार्वभौम आहे, हे स्पष्ट करण्यासाठी या स्वराज्यास अधिकृतता आणि सर्वमान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे, हे महाराजांच्या लक्षात आले. यासाठी विधिवत राज्याभिषेकाची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी ६ जून १६७४ या दिवशी विद्‌वान पंडित गागाभट्ट यांच्या हस्ते रायगडावर आपला राज्याभिषेक करवून घेतला.

या राज्याभिषेकाद्‌वारे महाराज आता स्वराज्याचे छत्रपती झाले. सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून त्यांनी 'राज्याभिषेक शक' ही नवीन कालगणना सुरू केली. ते आता शककर्ते झाले. राज्याभिषेक प्रसंगी त्यांनी सोन्याचा 'होन' व तांब्याची 'शिवराई' ही खास नाणी पाडली. या नाण्यांवर 'श्री राजा शिवछत्रपती' अशी अक्षरे कोरण्यात आली. तेथून पुढे राजपत्रांवर 'क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपती' असा उल्लेख होऊ लागला. राज्याभिषेकानंतर त्यांनी फारसी शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द असणारा एक कोश तयार करवून घेतला. यालाच 'राज्यव्यवहारकोश' असे म्हणतात.



**किल्ले रायगड**

**आठवा बरं...**

नवीन कालगणनेची सुरुवात कोणत्या भारतीय राजाने केली ?

**लक्षात ठेवा.**

राज्यव्यवहार कोशातील काही प्रतिशब्द उल्लेखनीय आहेत –

उदा., किताब – पदवी, फर्मान – राजपत्र,
जामीन – प्रतिभूती, हाली – सांप्रत,
माजी – पूर्व, फिलहाल – तत्काळ,
वाहवा – उत्तम,
वकूब – प्रज्ञा, बेवकूफ – मूढ,
दस्तपोशी – हस्तस्पर्श,
मुलाखत – दर्शन, कदमपोशी – पादस्पर्श,
झूट – मिथ्या, कौलनामा – अभय,
फतेह – विजय, फिर्याद – अन्यायवार्ता,
शिलेदार – स्वतूरगी.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामधील शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही एक क्रांतिकारी घटना होय. या घटनेचे महत्त्व सांगताना सभासद म्हणतो, ‘‘मऱ्हाटा पातशाह येव्हढा छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही.’’

यानंतर महाराजांनी अल्पावधीत २४ सप्टेंबर १६७४ रोजी निश्चलपुरी गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक करवून घेतला. भारतात वैदिक आणि तांत्रिक अशा धर्मकृत्यांच्या दोन परंपरा अस्तित्वात होत्या. त्यांचा आदर करून महाराजांनी या दोन्ही पद्धतींनी राज्याभिषेक करवून घेतला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

युवराज संभाजीराजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी १७ वर्षांचे होते. त्यांनी ‘बुधभूषण’ ग्रंथात राज्याभिषेकाच्या समारंभाचे वर्णन केले आहे. ते त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित आहे.

‘छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक महोत्सवाच्या वेळी निरनिराळ्या प्रांतांतून जे श्रेष्ठ विद्वान आले होते, त्यांना वजनमाप किंवा मोजदाद न करता विपुल धन देऊन तसेच वस्त्रे, हत्ती, घोडे यांचेही दान करून संतुष्ट केले.’

अशा प्रकारे छत्रपती शिवरायांनी आपली कीर्ती निरनिराळ्या दिशांना विस्तारवली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी अत्यंत मौल्यवान व भव्य सिंहासन बनवण्यात आले. सिंहासनाच्या आठ दिशांना आठ रत्नजडित स्तंभ होते. बत्तीस मण सोन्याचे हे सिंहासन मौल्यवान रत्नांनी जडवलेले होते.

- ‘मण’ हे एकक गणिताच्या शिक्षकांकडून समजून घ्या.


**दक्षिणेची मोहीम :** राज्याभिषेकानंतर सुमारे तीन वर्षांनी ऑक्टोबर १६७७ मध्ये महाराजांनी दक्षिणेची मोहीम हाती घेतली. गोवळकोंड्यास त्यांनी कुतुबशाहाची भेट घेतली. त्याच्याबरोबर मैत्रीचा तह

केला. पुढे महाराजांनी कर्नाटकातील बंगळूरू, होसकोटे, तसेच सध्याच्या तमिळनाडूमधील जिंजी, वेल्लोर इत्यादी किल्ले आणि आदिलशाहीचा इतर काही प्रदेश जिंकून घेतला. त्यांच्या फौजेने तेथील प्रजेला कोणताही त्रास दिला नाही. जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी मुख्य कारभारी म्हणून रघुनाथ नारायण हणमंते याची नेमणूक केली.

शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजी हे सध्याच्या तमिळनाडूमध्ये असलेल्या तंजावर येथे राज्य करत होते. त्यांनाही आपल्या स्वराज्यकार्यात सहभागी करून घेण्याचा महाराजांचा प्रयत्न होता. व्यंकोजी राजे यांच्या पश्चात तंजावरच्या राजांनी विद्या आणि कला यांची जोपासना केली. तेथील 'सरस्वती महाल' हे ग्रंथालय जगप्रसिद्ध आहे.

दक्षिणेच्या मोहीमेत तमिळनाडूतील जिंजीचा किल्ला जिंकून तो स्वराज्याला जोडण्याच्या शिवाजी महाराजांच्या कृतीला पुढील काळात निर्णायक महत्त्व आले. मुघल बादशाह औरंगजेब स्वराज्य नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रात ठाण मांडून बसल्यामुळे तेव्हाचे छत्रपती राजाराम महाराज यांना सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सोडावा लागला. त्या वेळी त्यांनी दक्षिणेतील याच जिंजी किल्ल्यावर आश्रय घेऊन तेथून स्वराज्याचा कारभार चालवला.

शिवाजी महाराजांच्या या दक्षिण दिग्विजयानंतर थोड्याच अवधीत ३ एप्रिल १६८० रोजी त्यांचे रायगडावर निधन झाले. वयाच्या पन्नाशीतील त्यांच्या निधनाने स्वराज्याची अपरिमित हानी झाली. एका महान युगाचा अस्त झाला.



शिवाजी महाराजांची समाधी – रायगड

## स्वाध्याय

**१. खालील घटना कालानुक्रमे लिहा.**

(१) शिवाजी महाराजांची दक्षिण मोहीम
(२) लाल महालावर छापा
(३) आग्र्याहून सुटका
(४) राज्याभिषेक
(५) पुरंदरचा तह
(६) शायिस्ताखानाची स्वारी

**२. शोधा म्हणजे सापडेल.**

(१) संस्कृत शब्द असणारा कोश –
(२) त्र्यंबकगड जिंकून घेणारा –
(३) वणी-दिंडोरी येथे पराभूत झालेला सरदार –
(४) इंग्रज, डच, फ्रेंच यांच्या वखारी असलेले ठिकाण –

**३. तुमच्या शब्दांत लिहा.**

(१) शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक
(२) आग्र्याहून सुटका
(३) शिवाजी महाराजांची दक्षिणेची मोहीम
(४) शिवरायांनी राज्याभिषेकासाठी केलेली तयारी

**४. कारणे लिहा.**

(१) शिवरायांनी पुरंदरचा तह केला.
(२) शिवाजी महाराजांनी मुघलांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला.

**उपक्रम**

(१) शाळेत साजरा करण्यात येणाऱ्या स्वातंत्र्यदिन/प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी तुम्ही कोणकोणती तयारी करता ? शिक्षकांच्या मदतीने त्याची यादी तयार करा.
(२) तुमच्या परिसरातील ऐतिहासिक स्थळास भेट देऊन अहवाल लिहा.

# ७. स्वराज्याचा कारभार

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. राज्याभिषेकानंतर त्यांनी दक्षिण दिग्विजय केला. स्वराज्याचा विस्तार झाला. या स्वराज्यात महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे या जिल्ह्यांमधील बराचसा प्रदेश अंतर्भूत होता. तसेच कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू राज्यांतील काही भाग स्वराज्यात समाविष्ट झाला होता. अशा रीतीने विस्तारत गेलेल्या स्वराज्याचा कारभार सुरळीतपणे व्हावा, त्यामध्ये लोकांचे कल्याण साधले जावे, यासाठी महाराजांनी स्वराज्याची घडी बसवली. याविषयीची माहिती आपण घेणार आहोत.

**अष्टप्रधान मंडळ :** महाराजांनी राज्याभिषेकाच्या प्रसंगी अष्टप्रधान मंडळ नियुक्त केले. राज्यकारभाराच्या सोईसाठी त्याची आठ खात्यांमध्ये विभागणी केली. प्रत्येक खात्यासाठी एक प्रमुख नेमला. आठ खात्यांत आठ प्रमुख मिळून 'अष्टप्रधान मंडळ' बनले. या प्रमुखांची नेमणूक करणे किंवा त्यांना त्यांच्या पदावरून दूर करणे, हा महाराजांचा अधिकार होता. आपापल्या खात्याच्या कारभारासाठी हे प्रमुख महाराजांना जबाबदार होते.

शिवाजी महाराजांनी गुण व कर्तृत्व पाहून अष्टप्रधान मंडळाची निवड केली. त्यांना इनामे, वतने किंवा जहागिरी दिल्या नाहीत; रोख पगार मात्र भरपूर दिला.

**शेतीविषयीचे धोरण :** शेती हा खेड्यातील मुख्य व्यवसाय होता. महाराज शेतीचे महत्त्व जाणत होते, त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष दिले. त्यांनी अण्णाजी दत्तो या आपल्या कर्तबगार व अनुभवी अधिकाऱ्यावर जमीन महसुलाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी सोपवली. ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा अधिक महसूल गोळा करू नये, अशी ताकीद त्यांनी अधिकाऱ्यांना दिली. पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी उत्तेजन दिले. अतिवृष्टी वा अवर्षण यामुळे पीक हातचे गेले किंवा शत्रुसैन्याने गावाचा प्रदेश उद्ध्वस्त केला, तर अशा सर्व प्रसंगी गावकऱ्यांना शेतसारा व इतर कर यांमध्ये सूट देण्यात यावी, हा त्यांचा आदेश होता. तसेच अशा प्रसंगी शेतकऱ्यांना बैलजोड्या, नांगर आणि पेरणीसाठी चांगले बी-बियाणे पुरवावे, अशी त्यांची अधिकाऱ्यांना आज्ञा होती.

**शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ**

| | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १. | मोरो त्रिंबक पिंगळे | प्रधान | राज्यकारभार चालवणे आणि जिंकून घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था पाहणे. |
| २. | रामचंद्र नीलकंठ मुजुमदार | अमात्य | राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| ३. | अण्णाजी दत्तो | सचिव | सरकारी आज्ञापत्रे तयार करणे. |
| ४. | दत्ताजी त्रिंबक वाकनीस | मंत्री | पत्रव्यवहार सांभाळणे. |
| ५. | हंबीरराव मोहिते | सेनापती | सैन्याची व्यवस्था ठेवणे व राज्यरक्षण करणे. |
| ६. | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | परराज्यांशी संबंध ठेवणे. |
| ७. | निराजी रावजी | न्यायाधीश | न्यायदान करणे. |
| ८. | मोरेश्वर पंडितराव | पंडितराव | धार्मिक व्यवहार पाहणे. |

**तत्कालीन खेड्यांचे अर्थकारण :** शेती व्यवसाय हा खेड्यातील अर्थकारणाचा कणा होता. खेड्यात शेतीव्यवसायाला पूरक असे व्यवसाय चालत. गावातील कारागीर वस्तूंचे उत्पादन करत. ते स्थानिक लोकांच्या गरजा भागवत. या अर्थाने खेडे स्वयंपूर्ण होते. शेतकरी आपल्या उत्पादनातून आवश्यक तो वाटा कारागिरांना देत. या वाट्यास बलुतं असे म्हणत.

**व्यापार व उद्योग :** व्यापारवृद्धीशिवाय राज्य भरभराटीस येत नाही हे महाराजांनी ओळखले होते. व्यापाऱ्यांमुळे नवीन नवीन व गरजेच्या वस्तू राज्यात येतात. वस्तूंची मुबलकता वाढते. व्यापार वाढतो. संपत्तीत भर पडते. 'साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा' हे आज्ञापत्रातील वर्णन महाराजांचा व्यापाऱ्यांकडे पाहण्याचा नेमका दृष्टिकोन स्पष्ट करणारे आहे. 'साहुकार' या शब्दाचा 'व्यापारी' असा अर्थ आहे.

स्वराज्यातील उद्योगांना संरक्षण देण्याचे महाराजांचे धोरण होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिठाचा उद्योग होय. त्यांनी कोकणातील मीठ उद्योगाला संरक्षण दिले. त्या वेळी पोर्तुगिजांच्या ताब्यातील प्रदेशातून स्वराज्यात मिठाची आयात मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे कोकणातील स्थानिक मिठाच्या विक्रीवर प्रतिकूल परिणाम होतो, हे ध्यानात घेऊन महाराजांनी पोर्तुगिजांच्या प्रदेशातून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली. पोर्तुगिजांकडून येणारे मीठ महाग होऊन त्याच्या आयातीत घट व्हावी आणि स्थानिक मिठाची विक्री वाढावी, हा यामागचा हेतू होता.

**लष्करी व्यवस्था :** महाराजांच्या लष्कराची विभागणी दोन भागांमध्ये होती. एक पायदळ आणि दुसरे घोडदळ. पायदळात हवालदार, जुमलेदार असे अधिकारी असत. पायदळाच्या प्रमुखास 'सरनोबत' म्हणत. तो पायदळातील सर्वोच्च अधिकारी होता.

घोडदळात दोन प्रकारचे घोडेस्वार होते. एक शिलेदार आणि दुसरा बारगीर. शिलेदाराकडे स्वतःचा घोडा व स्वतःची हत्यारे असत, तर बारगिराला सरकारकडून घोडा व हत्यारे दिली जात. घोडदळात बारगिरांची संख्या अधिक होती. घोडदळातही अधिकाऱ्यांच्या श्रेणी पायदळासारख्याच असत. 'सरनोबत' हा घोडदळातील सर्वोच्च अधिकारी होता. नेतोजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते असे काही महाराजांच्या घोडदळाचे सरनोबत प्रसिद्ध होते.



**जाणून घेऊया.**

भारताच्या लष्करी दलांची माहिती मिळवा.
- तिन्ही सेनादलांची नावे सांगा.
- प्रत्येक सेनादलाच्या प्रमुखाला काय म्हणतात ?
- तिन्ही सेनादलांचे प्रमुख कोण असतात ?

**हेर खाते :** स्वराज्याचे शत्रूंपासून रक्षण करणे आवश्यक होते. यासाठी शत्रूच्या हालचालींची नेमकी माहिती वेळेवर मिळवावी लागे. ही माहिती काढून ती महाराजांना देण्याचे काम त्यांच्या हेरखात्याकडे होते. त्यांचे हेर खाते अत्यंत कार्यक्षम होते. बहिर्जी नाईक हा हेर खात्याचा प्रमुख होता. तो निरनिराळ्या ठिकाणची माहिती काढून आणण्यात पटाईत होता. त्याने सुरतेच्या मोहिमेपूर्वी तेथील खडान्‌खडा माहिती आणली होती.

**किल्ले :** मध्ययुगामध्ये किल्ल्याचे महत्त्व अनन्यसाधारण होते. किल्ला ताब्यात असला, की आजूबाजूच्या प्रदेशावर लक्ष व नियंत्रण ठेवता येते. परकीय आक्रमण झाल्यास किल्ल्याच्या आश्रयाने प्रजेचे रक्षण करता येते. किल्ल्यावर अन्नधान्य, युद्धोपयोगी साहित्य, दारूगोळा यांचा साठा करता येतो. स्वराज्यस्थापनेच्या कार्यातील किल्ल्यांचे महत्त्व आज्ञापत्रात सांगितले आहे ते असे, 'हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले.'

स्वराज्यामध्ये सुमारे ३०० किल्ले होते. या किल्ल्यांची बांधणी आणि दुरुस्ती यासाठी महाराजांनी मोठा खर्च केला. राजगड, प्रतापगड, पावनगड यांसारखे डोंगरी किल्ले बांधले. किल्ल्यावर किल्लेदार, सबनीस व कारखानीस असे अधिकारी असत. तेथील धान्याची कोठी आणि युद्धसाहित्याची व्यवस्था पाहण्यासाठी कारखानीस हा अधिकारी असे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

शिवाजी महाराजांच्या दुर्गनिर्मितीसंबंधी छत्रपती संभाजी महाराज यांनी 'बुधभूषण' या ग्रंथात केलेले वर्णन लक्षणीय आहे. ते पुढीलप्रमाणे :

'कर्नाटक देशापासून ते बागलाण देशापर्यंत शत्रूंना अभेद्य दुर्गच, असे अनेक किल्ले छत्रपती शिवरायांनी सह्याद्री पर्वताच्या उत्तुंग अशा शिखर पठारांच्या रांगांवर जागोजागी बांधले. त्यामागचा उद्देश म्हणजे या पृथ्वीचे रक्षण करणे हा होता. त्यांच्या यशस्वी नेतृत्वाने कृष्णा नदीच्या काठापासून ते समुद्राच्या चारही दिशांसभोवती ते किल्ले बांधले. रायरी किल्ल्यात, ते विजयी आणि सर्व राजांमध्ये अग्रेसर असे राजे छत्रपती श्रीशिवाजी महाराज राहिले.'

**सागरी किल्ले :** महाराजांनी सागरी किल्ल्यांचेही महत्त्व ओळखले. त्यांनी बांधलेल्या जलदुर्गांपैकी मालवणचा सिंधुदुर्ग हा उत्कृष्ट सागरी किल्ला आहे. या किल्ल्याच्या बांधणीमध्ये भक्कमपणा यावा म्हणून त्यांनी किल्ल्याच्या पायाभरणीसाठी पाच खंडी शिसे ओतण्याची व्यवस्था केली होती. त्यांनी सिद्दीला शह देण्यासाठी राजापुरीसमोर पद्मदुर्ग नावाचा सागरी किल्ला बांधला. आपल्या एका पत्रात या किल्ल्याविषयी ते म्हणतात, 'पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली.'



किल्ले पद्मदुर्ग

**आरमार :** भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचे सिद्दी तसेच सुरत व राजापूर येथील इंग्रज वखारवाले हे शत्रू स्वराज्यविस्ताराच्या कार्यात अडथळा आणत. या अडथळ्यास पायबंद घालणे आणि पश्चिम किनारपट्टीचे रक्षण करणे याची आवश्यकता होती. यासाठी महाराजांनी आरमार उभे केले. 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' हे त्यांनी ओळखले. महाराज दूरदर्शी होते.

महाराजांच्या आरमारात विविध प्रकारची चारशे जहाजे होती. यांमधील गुराब, गलबत व पाल ही लढाऊ जहाजे होती. कल्याण-भिवंडीची खाडी, विजयदुर्ग आणि मालवण येथे जहाजे बांधली जात. मायनाक भंडारी व दौलतखान हे त्यांच्या आरमाराचे प्रमुख अधिकारी होते.



गुराब



गलबत

**करून पहा.**

भारतीय नौसेनेतील लढाऊ जहाजांची माहिती मिळवा व जहाजांच्या चित्रांचा संग्रह करा.

**प्रजेच्या हिताची काळजी :** इतर राजांप्रमाणे शत्रूच्या ताब्यातील प्रदेश जिंकावेत आणि तेथे आपले वर्चस्व निर्माण करावे, एवढी मर्यादित आकांक्षा बाळगून महाराजांनी कार्य केले नाही. प्रजेला स्वतंत्र बनवणे, हा त्यांचा मुख्य उद्देश होता. प्रजेला स्वातंत्र्याचा खराखुरा आनंद मिळवायचा असेल, तर राज्यकारभार शिस्तबद्ध असला पाहिजे, प्रजेच्या हिताची सर्वांगीण काळजी घेतली पाहिजे आणि जिंकलेल्या प्रदेशांचे रक्षण केले पाहिजे, याचे भान त्यांना होते. महाराज केवळ सत्ताधीश नव्हते, तर प्रजाहितदक्ष राज्यकर्ता होते, हे त्यांच्या राज्यकारभारावरून स्पष्ट होते.

## स्वाध्याय

**१. ओळखा पाहू.**

(१) आठ खात्यांचे मंडळ –

(२) बहिर्जी नाईक या खात्याचे प्रमुख होते –

(३) महाराजांनी बांधलेला मालवणजवळील जलदुर्ग –

(४) किल्ल्यावर युद्धसाहित्याची व्यवस्था पाहणारा –

**२. तुमच्या शब्दांत लिहा.**

(१) शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण


(२) शिवराय एक प्रजाहितदक्ष राज्यकर्ते

**३. का ते सांगा.**

(१) शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळ स्थापले.

(२) शिवाजी महाराजांनी आरमार उभे केले.

**४. ओघतक्ता पूर्ण करा.**




**उपक्रम**

(१) तुमच्या परिसरात राहणाऱ्या भारतीय सेनादलात काम केलेल्या व्यक्तीची मुलाखत घ्या.


(२) तुमच्या गावातील बाजारपेठेला भेट देऊन परिसरात तयार होणाऱ्या वस्तू आणि बाहेरगावावरून विक्रीसाठी आलेल्या वस्तू यांची यादी करा.



किल्ले सिंधुदुर्ग

# ८. आदर्श राज्यकर्ता

स्वराज्यस्थापनेपूर्वी महाराष्ट्रावर आदिलशाही, सिद्दी, पोर्तुगीज आणि मुघल या सत्तांचे वर्चस्व होते. या सत्तांविरुद्ध शिवाजी महाराजांनी संघर्ष केला. ते सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीस सामोरे गेले. त्यांनी स्वतंत्र व सार्वभौम असे स्वराज्य स्थापन केले. या स्वराज्याच्या कारभाराची व्यवस्था लावून दिली. स्वराज्याचे सुराज्य केले. महाराजांनी आपल्या कर्तृत्वाने नूतन सृष्टीच निर्माण केली. स्वराज्यस्थापनेसाठीचा संघर्ष करताना महाराज स्वतः अनेक मोठ्या धोक्यांना सामोरे गेले. अफलजखान भेटीचा प्रसंग, पन्हाळ्याचा वेढा, शायिस्ताखानावरील छापा, आग्र्यातून करून घेतलेली सुटका हे सर्व प्रसंग मोठ्या जोखमीचे होते. त्यांनी या सर्व प्रसंगांवर यशस्वी मात केली. त्यांतून ते सुखरूपपणे बाहेर पडले.



**विचार करा.**

जीवाला जीव देणारे सहकारी असल्याने शिवाजी महाराज स्वराज्य उभे करू शकले.

मैत्रीचे महत्त्व सांगणाऱ्या विविध भाषांतील म्हणी, वाक्प्रचार शोधा. उदा., A friend in need is a friend indeed.

**संघटन चातुर्य :** स्वराज्यकार्यासाठी महाराजांनी आपल्या सभोवतालच्या लोकांना प्रेरित केले. त्यांच्याकडे विलक्षण संघटनचातुर्य होते. त्या चातुर्याच्या जोरावर त्यांनी आपल्याभोवती शूर व जीवास जीव देणारे लोक गोळा केले. स्वराज्याच्या कार्यात त्यांच्या या सहकाऱ्यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता आपले कर्तव्य पार पाडले. अफजलखान भेटीच्या प्रसंगी अत्यंत धोक्याच्या क्षणी बडा सय्यद यास ठार करणारा जिवा महाला, पन्हाळगडचा वेढा ओलांडून जाताना शिवाजी महाराजांच्या भूमिकेत वावरणारा शिवा काशिद, महाराज विशाळगडाकडे जात असताना त्यांचा पाठलाग करणाऱ्या शत्रूची वाट रोखून धरणारा बाजीप्रभू देशपांडे, पुरंदरचा किल्ला लढवणारा मुरारबाजी देशपांडे, सिंहगड जिंकण्यासाठी धारातीर्थी पडलेला तानाजी मालुसरे, महाराजांच्या आग्र्याहून सुटकेप्रसंगी मोठी जोखीम पत्करणारे हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहेतर अशी अनेक उदाहरणे स्वराज्य उभारणीच्या कार्यात आढळतात. महाराज आपल्या सहकाऱ्यांची काळजी घेत असत. उदाहरणार्थ, स्वराज्यस्थापनेच्या कार्यात कान्होजी जेधे हे त्यांच्याबरोबर आरंभापासून होते. उतारवयी ते आजारी पडले. त्या वेळी महाराजांनी त्यांना 'औषधोपचारात कोणत्याही प्रकारची हयगय करू नये' असे सांगितले.

**रयतेची काळजी :** स्वराज्यस्थापनेच्या कार्यात महाराजांचा शत्रूंशी संघर्ष चाललेला होता. शत्रूंच्या स्वाऱ्यांमुळे प्रजा त्रस्त होत असे. अशा वेळी रयतेची जास्तीत जास्त काळजी घेण्याचा महाराजांचा प्रयत्न असे. शायिस्ताखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी रोहिडखोऱ्याच्या देशमुखास रयतेसंबंधी आपले कर्तव्य पार पाडण्याविषयी ताकीद दिली. त्यांनी त्या देशमुखास गावोगाव हिंडून घाटाखाली जेथे सुरक्षित जागा असेल तेथे लोकांना नेण्यास सांगितले. या कार्यास 'एका घडीचा दिरंग न करणे' असे त्यास बजावले. पुढे महाराजांनी त्याला पुढीलप्रमाणे सक्त ताकीद दिली, 'जर रयतेची अशी काळजी घेतली नाही तर मुघल सैन्य येईल, लोकांना कैद करेल आणि त्याचे पाप तुमच्या माथी बसेल.' आपल्या सैनिकांकडून रयतेला त्रास होऊ नये, अशी काळजी महाराज घेत असत.

**लष्करविषयक धोरण :** महाराजांच्या लष्कराची शिस्त कडक होती. सैन्यास वेळच्या वेळी वेतन दिले जावे, याबाबत त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी सैनिकांना वेतन रोख रकमेत देण्याची व्यवस्था

केली. मध्ययुगीन भारतात ठिकठिकाणच्या राजवटींमध्ये आणि इतरत्र सैनिकांना रोख वेतनाऐवजी जहागीर देण्याची पद्धत होती. महाराजांनी ही पद्धत रद्द केली. त्यांच्या मोहिमा जेव्हा शत्रूच्या प्रदेशात जात, तेव्हा सैनिकांस जे काही मिळेल ते सर्व सरकारात जमा करण्यासंबंधी लष्करास ताकीद होती. मोहिमेमध्ये पराक्रम केल्याबद्दल सैनिकांचा मानसन्मान केला जात असे. लढाईत जे सैनिक मृत्यू पावत, त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाची काळजी घेत असत. जखमी सैनिकांचीही काळजी घेत असत. लढाईत शरण आलेल्या किंवा कैद झालेल्या शत्रू सैनिकांना ते चांगली वागणूक देत असत.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

पीक लावणी-संचनी-उगवणीच्या काळात युद्धाला तोंड फुटले तर शेतकऱ्यांच्या दैन्याला काही पारावार राहत नसे. सैन्याच्या हालचाली पेरणीच्या कामात आड तर येतच पण सैनिक उभी पिकेही काही वेळा कापून नेत अथवा नष्ट करत. शेतकऱ्यांची घरे लुटत. आपल्या सैनिकांना अशा कृत्यापासून परावृत्त करावे असे आदेश महाराजांनी अधिकाऱ्यांना दिले होते. या संदर्भात इ.स.१६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र फार मोलाचे आहे. महाराजांनी लष्कराच्या शिस्तीसंबंधी किती बारकाईने विचार केला होता, त्याची यावरून कल्पना येते.

''विलातीस तसवीस देऊ लागाल; ऐशास, लोका जाती, कोण्ही कुणब्याचे दाने आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसें करू लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कितेक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसे होईल की, मोगल मुलकांत आले त्याहूनही अधिक तुम्ही ! ऐसा तळतळाट होईल.''

**सहिष्णू वर्तन :** महाराजांना ज्या सत्तांबरोबर संघर्ष करावा लागला, त्यांच्यापैकी आदिलशाह, मुघल आणि सिद्दी या सत्ता इस्लामी होत्या. मात्र त्यांच्याशी संघर्ष करताना महाराजांनी स्वराज्यातील मुसलमानांना आपले प्रजाजन मानले. अफजलखानाच्या भेटीच्या वेळी महाराजांच्या सैन्यात सिद्दी इब्राहीम हा विश्वासू सेवक होता. सिद्दी हिलाल हा महाराजांच्या सैन्यातील सरदार होता. स्वराज्याच्या आरमारात दौलतखान हा महत्त्वाचा अधिकारी होता.

महाराजांचे धार्मिक धोरण सहिष्णू होते. शत्रूकडून एखादा प्रदेश जिंकून घेतला असता, तेथील मुस्लिम धर्मस्थळांना आधीपासून प्राप्त असलेल्या सोई-सवलती ते तशाच चालू ठेवत. त्यांच्या सहिष्णू धार्मिक धोरणाबद्दल समकालीन इतिहासकार खाफिखान लिहितो, 'शिवाजीने आपल्या सैनिकांसाठी असा सक्त नियम केला होता, की मोहिमेवर असताना मशिदीला धक्का लावू नये. कुरआनची एखादी प्रत हाती पडल्यास तिला पूज्यभाव दाखवून ती मुसलमान व्यक्तीच्या स्वाधीन करावी.'

**स्वातंत्र्याची प्रेरणा :** शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांना एक वेगळे मूल्य आहे. ते मूल्य स्वातंत्र्याचे आहे. दुसऱ्या कोणत्याही सत्तेचे वर्चस्व न मानता आपले स्वतंत्र व सार्वभौम अस्तित्व ठेवणे, हा हेतू त्यामागे आहे. परकीय आणि अन्यायी सत्तांच्या विरोधात संघर्ष करताना महाराजांनी इतरांनाही स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. मुघलांच्या सेवेत असलेला छत्रसाल जेव्हा महाराजांना भेटला, तेव्हा त्यांनी त्यास बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची प्रेरणा दिली.

**महाराजांच्या कार्याची थोरवी :** महाराजांनी अनेक शत्रूंशी संघर्ष करत करत स्वराज्याची स्थापना केली, ही कृतीच त्यांचे युगप्रवर्तकत्व सिद्ध करते. परंतु या कृतीखेरीज त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये इतरही अनेक सद्गुणांचा समुच्चय आढळतो.

महाराज अत्यंत बुद्धिमान होते. त्यांनी अनेक विद्या आत्मसात केल्या होत्या. त्यांना अनेक भाषा

आणि लिपी अवगत होत्या. आई-वडिलांनी केलेले स्वराज्यस्थापनेचे आणि नैतिकतेचे संस्कार त्यांच्या मनात खोलवर रुजलेले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात चारित्र्य आणि सामर्थ्य, शील आणि पराक्रम यांचा समन्वय झाला होता. त्यांच्याकडे नेतृत्व, व्यवस्थापन, द्रष्टेपणा, राजकीय मुत्सद्देगिरी, मुलकी आणि लष्करी प्रशासनाविषयीचे प्रभावी धोरण, सत्य आणि न्याय यांवरील निष्ठा, सर्वांना समान वागणूक देण्याची वृत्ती, भावी गोष्टींचा आराखडा तयार ठेवण्याचे नियोजन, नियोजित प्रकल्प तडीला नेण्याचे कौशल्य, संकटात खचून न जाता उफाळून येण्याचा निर्धार, सदैव जागृत राहण्याचा सावधपणा इत्यादी प्रकारचे असंख्य गुण होते.

स्त्रियांच्या बाबतीत कोणी अनुचित वर्तन केले तर तसे करणाऱ्यास ते कठोर शिक्षा करत. प्रजेतील शेतकरी, कारागीर, सैनिक, व्यापारी अशा सर्व घटकांची ते काळजी घेत. स्वधर्मातील व्यक्तींप्रमाणेच परधर्मातील व्यक्तींविषयी भेदभाव न करता आदर बाळगत. परधर्मात गेलेल्या व्यक्तींना परत स्वधर्मात घेण्याला ज्या काळात विरोध होता, त्या काळात त्यांनी अशा व्यक्तींना परत स्वधर्मात घेतले. प्रसंगी त्यांच्याशी स्वतःचे नाते जोडले. समुद्र पर्यटनास धार्मिक कारणावरून विरोध होता, त्या काळात त्यांनी सिंधुदुर्गासारखे जलदुर्ग बांधले आणि आरमाराची निर्मिती केली. समुद्रावरून होणाऱ्या बाह्य आक्रमणांची दखल घेऊन त्यावरचा उपाय त्यांनी तयार ठेवला होता, असा याचा अर्थ होतो. ते राज्याभिषेकाद्वारे स्वराज्याचे अधिकृत राजे बनले. त्यांनी एका राज्याभिषेकानंतर धार्मिकदृष्ट्या वेगळ्या प्रकारचा दुसरा राज्याभिषेक करून घेतला. त्यांच्या या सर्व कृती त्यांचे धार्मिक क्षेत्रातील क्रांतिकारकत्व दर्शवणाऱ्या आहेत.

स्वराज्यावर जेव्हा जीवघेणी संकटे येत, तेव्हा सहकाऱ्यांऐवजी वा त्यांच्यासह ते स्वतः त्या संकटांना भिडत. त्यामुळे त्यांचे सहकारीही स्वराज्यासाठी प्राण अर्पण करायला सिद्ध असत. अर्थात केवळ अशा मोठ्या संकटांना धैर्याने आणि निर्भयपणाने सामोरे जाणे, एवढेच त्यांचे मोठेपण नव्हते. त्यांना आपल्या स्वराज्याला नैतिकतेचा आणि गुणवत्तेचा आधार द्यायचा होता. म्हणूनच महत्त्वाच्या गोष्टींप्रमाणेच छोट्या छोट्या गोष्टींच्या बाबतीतही त्यांनी संबंधितांना योग्य ते आदेश दिल्याचे आढळते. सैनिकांनी शेतकऱ्यांच्या शेतातील भाजीदेखील जबरदस्तीने घेता कामा नये, या अर्थाचा आदेश त्या दृष्टीने आदर्श आहे. त्यांनी झाडे तोडण्यावर घातलेली बंधनेही महत्त्वाची आहेत.



**विचार करा.**

वृक्षसंवर्धन करणे का गरजेचे आहे ?

किल्ल्यावरील कचरा इकडे-तिकडे कुठेही न टाकता परसात जाळावा आणि त्याच्या राखेवर भाजीपाला पिकवावा, असा त्यांचा आदेश होता. ते स्वराज्याची उभारणी करताना बारीक-सारीक बाबींकडे किती लक्ष देत होते, हे यावरून स्पष्ट होते. ते केवळ योद्धे नव्हते तर ते एका नव्या, स्वतंत्र, नीतिमान आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करणारे शिल्पकार होते. त्यांची थोरवी सर्वांगीण आहे.



**सांगा पाहू !**

- तुमच्या परिसरातील कचऱ्याचे व्यवस्थापन कसे होते ?
- कचऱ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणेची नावे सांगा.

आपल्या राष्ट्रीय चळवळीमध्ये महाराज हे एक मोठे प्रेरणास्थान होते. महात्मा जोतीराव फुले यांनी समतेच्या संघर्षामध्ये पोवाड्याद्वारे महाराजांची महती सांगितली.

### माहीत आहे का तुम्हांला ?

महात्मा जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर सन १८६९ मध्ये एक पोवाडा केला. त्याचा काही भाग येथे दिला आहे.

*।। शिवाचा गजर जयनामाचा झेंडा रोविला ।।*
*।। क्षेत्र्याचा मेळा मावळ्याचा शिकार खेळला ।।*
*माते पायीं ठेवी डोई गर्व नाहीं काडीचा ।*
*आशिर्वाद घेई आईचा ।।*
*आलाबला घेई आवडता होतो जिजीचा ।*
*पवाडा गातो शिवाजीचा ।।*
*कुळवाडी - भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।*
*छत्रपती शिवाजीचा ।।३।।*

लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय जागृती केली. शिवचरित्राची महती सांगणारे पुस्तक लाला लजपतराय यांनी लिहिलेले आहे. तमीळ काव्याचे पितामह सुब्रमण्यम् भारती यांनी शिवाजी महाराज हे आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून बोलत आहेत, असा प्रसंग कल्पून काव्यरचना केली आहे. विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांनी महाराजांवर एक दीर्घ कविता लिहिली आहे. महाराजांच्या राज्यसाधनेच्या प्रयत्नांकडे ते 'थोर ध्येयसाधनेचे प्रयत्न' म्हणून पाहतात. सर जदुनाथ सरकार यांनी 'शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स' या ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला आहे. पं.जवाहरलाल नेहरू यांनी महाराजांबद्दल असे म्हटले आहे की, 'महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हते, तर ते साऱ्या राष्ट्राचे होते... त्यांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्‌गुणांचे ते साक्षात प्रतीक होते.' भारतातील सर्व भाषांमध्ये महाराजांची प्रेरणा आणि आदर्श सांगणारे साहित्य निर्माण झालेले आहे.

शिवाजी महाराजांची ही स्वराज्यकार्याची आणि त्याचे सुराज्यात रूपांतर करण्याची प्रेरणा भावी पिढ्यांनाही आदर्श राहील. शिवाजी महाराज एक थोर राष्ट्रपुरुष होते.

## स्वाध्याय

**१. पाठात शोधून लिहा.**

(१) शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील जोखमीचे प्रसंग कोणते होते ?

(२) शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेप्रसंगी जोखीम पत्करणारे कोण ?

(३) रोहिडखोऱ्याच्या देशमुखास शिवाजी महाराजांनी कोणती ताकीद दिली ?

(४) शिवाजी महाराजांची कोणती प्रेरणा भावी पिढ्यांना आदर्श राहील ?

**२. लिहिते व्हा.**

(१) रयतेचे नुकसान होऊ नये म्हणून शिवरायांनी सैनिकांना कोणती ताकीद दिली ?

(२) शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण सहिष्णू होते, हे कोणत्या बाबीवरून दिसून येते ?

(३) शिवाजी महाराजांचे लष्करविषयक धोरण स्पष्ट करा.

**३. एका शब्दात लिहा.**

(१) स्वराज्याच्या आरमारातील महत्वाचा अधिकारी -

(२) शिवाजी महाराजांवर काव्य रचणारा तमीळ कवी -

(३) बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य निर्माण करणारा -

(४) पोवाड्याद्वारे शिवाजी महाराजांची महती सांगणारे -

**उपक्रम**

(१) अडचणीच्या वेळी मित्राला केलेल्या मदतीचे वर्गात कथन करा.

(२) व्यक्तीच्या नावावरून असलेली गावे, शहरे यांची यादी तयार करा.

# ९. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यरक्षणासाठी मुघलांशी प्रखर लढा दिला. या सत्तावीस वर्षांच्या प्रदीर्घ लढ्याला 'मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम' असे म्हणतात. इ.स.१६८२ मध्ये तर खुद्द औरंगजेब बादशाह दक्षिणेत चालून आला. तरी देखील मुघलांबरोबरच्या या संग्रामात अनेक अडचणींवर मात करून मराठे विजयी झाले. हा स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे भारताच्या इतिहासातील एक रोमहर्षक व तेजस्वी कालखंड आहे. आपण या पाठात या स्वातंत्र्यसंग्रामाचा अभ्यास करणार आहोत.

*येथील 'मराठा' हा शब्द 'मराठी भाषा बोलणारे' वा 'महाराष्ट्रीय लोक' या अर्थाचा आहे.*

**करून पहा.**

मी संभाजीराजे बोलतो.... भूमिकाभिनय करा.



छत्रपती संभाजी महाराज

**छत्रपती संभाजी महाराज :** संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र होत. त्यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांनंतर ते छत्रपती झाले. त्या वेळी मराठ्यांचा मुघलांशी संघर्ष चालू होता. अशा स्थितीत औरंगजेब बादशाहाचा मुलगा शाहजादा अकबर याने पित्याविरुद्ध बंड केले. हे बंड बादशाहाने मोडून काढले. मग अकबर दक्षिणेत संभाजी महाराजांच्या आश्रयाला आला. त्याचे पारिपत्य करण्यासाठी बादशाह स्वतः इ.स.१६८२ मध्ये दक्षिणेत आला. त्याच्याबरोबर अफाट सैन्य आणि प्रभावी तोफखाना होता. त्याने जंजिऱ्याच्या सिद्दीला मराठ्यांच्या विरुद्ध मोहीम हाती घेण्यास सांगितले. पोर्तुगिजांनाही आपल्या बाजूला वळवून घेतले. यामुळे संभाजी महाराजांवर एकाच वेळी अनेक शत्रूंना तोंड देण्याचा प्रसंग आला.

संभाजी महाराजांची कारकीर्द ही शिवाजी महाराजांच्या नंतर झालेल्या मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे पहिले पर्व होय. महाराजांनी आपल्या कारकिर्दीतच त्यांना मुलकी राज्यकारभाराचे व लष्करी मोहिमांचे उत्कृष्ट शिक्षण दिले होते. वयाच्या चौदाव्या वर्षापासून ते राज्याचा कारभार व सैन्याचे आधिपत्य यात लक्ष घालू लागले होते. युवराज असतानाच त्यांनी मुघलांच्या व आदिलशाहाच्या अनेक प्रदेशांवर स्वाऱ्या केल्या होत्या. त्यांच्या युद्धकौशल्याचे वर्णन करताना त्या वेळचा फ्रेंच प्रवासी ॲबे कॅरे म्हणतो, ''हा युवराज लहान असला तरी धैर्यशील आणि आपल्या पित्याच्या कीर्तीस साजेल असाच शूरवीर आहे....''

संभाजी महाराज छत्रपती झाल्यावर मराठ्यांचा मुघलांशी संघर्ष अधिकच तीव्र झाला. काबूलपासून कन्याकुमारीपर्यंत मुघलांचा एकछत्री अंमल निर्माण करण्याचा औरंगजेबाचा उद्‌देश होता. आपल्या प्रचंड लष्करी व आर्थिक शक्तीने मराठ्यांचे राज्य साफ बुडवून टाकायचे, असे त्याचे स्वप्न होते. पण

संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने व युद्धकौशल्याने त्याचे हे स्वप्न धुळीस मिळवले. त्यांच्या फौजेच्या तुकड्या अनेक मुघली प्रदेशांत स्वाऱ्या करत होत्या. मराठ्यांचा नाशिकजवळचा रामसेजचा किल्ला तर बादशाहच्या सेनानींना दीर्घकाळ प्रयत्न करूनही घेता आला नाही. अशा प्रकारे संभाजी महाराजांच्या पराक्रमाने औरंगजेब जेरीस आला होता. त्यामुळे एकदा अत्यंत संतापाने त्याने आपल्या डोक्यावरचे पागोटे जमिनीवर आपटले व प्रतिज्ञा केली की, ''या संभाजीचा पाडाव करीपर्यंत मी पुन्हा पागोटे घालणार नाही.'' संभाजी महाराजांनी औरंगजेबाला इतके हतबल करून टाकले होते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

मराठ्यांचे किल्ले जिंकले की त्यांचे राज्य संपेल या विचाराने सुरुवातीस औरंगजेबाने नाशिकजवळील रामसेज किल्ल्याला वेढा घातला. औरंगजेबाची सैन्यसंख्या मोठी होती. मराठ्यांची सैन्यसंख्या अतिशय कमी होती. पण त्यांनी चिवट प्रतिकार केला. हा वेढा पुढे पाच वर्षे चालला. मूठभर मराठी सैनिकांनी केलेला हा पराक्रम अद्‌वितीय होता. मराठ्यांच्या चिवट प्रतिकारामुळे मराठ्यांशी संघर्ष करणे अवघड असल्याची जाणीव औरंगजेबाला झाली.

**सिद्‌दीविरुद्‌धची मोहीम :** जंजिऱ्याचा सिद्‌दी मराठी मुलखाला उपद्रव देत असे. मराठ्यांच्या मुलखावर धाडी टाकून तो जाळपोळ, लुटालूट व अत्याचार करत असे. 'घरात जैसा उंदीर, तैसा राज्यास सिद्‌दी' असे त्याचे वर्णन सभासदाने केले आहे. संभाजी महाराजांनी इ.स.१६८२ मध्ये त्याच्याविरुद्‌ध मोहीम उघडली. त्यांच्या सैन्याने त्याच्या ताब्यातील दंडाराजपुरी या किल्ल्याला वेढा घातला आणि जंजिऱ्यावरही तोफांचा भडिमार केला. परंतु त्याच वेळी मुघलांचे सैन्य स्वराज्यावर चालून आले. त्यामुळे जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडून संभाजी महाराजांना माघारी फिरावे लागले.

**पोर्तुगिजांविरुद्‌ध मोहीम :** गोव्याच्या पोर्तुगिजांनी संभाजी महाराजांच्या विरुद्‌ध बादशाहाशी हातमिळवणी केली होती. त्यामुळे त्यांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे ठरवले. त्यांनी इ.स.१६८३ मध्ये पोर्तुगिजांच्या रेवदंडा बंदरावर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगिजांनी गोव्याच्या सीमेवरील मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला. मराठ्यांनी वेढा मोडून काढला आणि गोव्यावर चढाई केली. या लढाईत येसाजी कंक याने पराक्रमाची शर्थ केली. यात पोर्तुगीज गव्हर्नर घायाळ झाला. त्याला माघार घ्यावी लागली. संभाजी महाराजांनी त्याचा पाठलाग केला. पोर्तुगीज मोठ्या संकटात सापडले. त्याच वेळी मुघलांनी दक्षिण कोकणवर आक्रमण केल्याची बातमी संभाजी महाराजांना मिळाली. त्यामुळे हाताशी आलेला गोव्याचा विजय सोडून त्यांना मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी परतावे लागले.

**आदिलशाही व कुतुबशाहीचा शेवट :** औरंगजेबाला मराठ्यांविरुद्‌धच्या मोहिमेत यश येत नव्हते. त्यामुळे त्याने ती मोहीम स्थगित केली. त्यानंतर त्याने आपला मोर्चा आदिलशाही व कुतुबशाही या राज्यांकडे वळवला. औरंगजेबाने ती राज्ये जिंकून घेतली.

या दोन्ही राज्यांची संपत्ती व लष्कर मुघलांच्या हाती आल्यामुळे औरंगजेबाची स्थिती मजबूत झाली. त्यानंतर मराठ्यांचा पाडाव करण्यावर आपली सर्व शक्ती केंद्रित केली. त्यांच्या प्रदेशावर चोहोबाजूंनी हल्ले चढवले. मुघल सेनेचा प्रतिकार करताना मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते मारला गेला. त्यामुळे संभाजी महाराजांची लष्करी बाजू कमकुवत झाली.

**संभाजी महाराजांचा मुलकी कारभार :** संभाजी महाराजांनी युद्‌धाच्या या धामधुमीत आपल्या मुलकी राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनी

शिवरायांच्या काळातील चोख न्याय व महसूल व्यवस्था तशीच पुढे चालू ठेवली. स्वराज्याविरुद्ध बंडखोरी करणाऱ्यांना तसेच सामान्य प्रजेला त्रास देणाऱ्या वतनदारांना त्यांनी कठोर शासन केले. महाराणी येसूबाईंना राज्यकाराभाचे अधिकार दिले. त्यांचा स्वतःचा शिक्का करून दिला. शिवरायांचे प्रजाहिताचे धोरण त्यांनी आपल्या कारकिर्दीत पुढे चालवले.

संभाजी महाराजांना संस्कृतसह अनेक भाषा अवगत होत्या. त्यांनी ग्रंथलेखनही केले आहे. राजनीतीवरील प्राचीन भारतीय ग्रंथांचे अवलोकन करून त्याचे सार 'बुधभूषण' या ग्रंथात मांडले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

संभाजी महाराजांनी 'बुधभूषणम्' या ग्रंथाची रचना संस्कृत भाषेत केली. त्यातील दुसऱ्या अध्यायात राजनीतीची चर्चा आलेली आहे. त्यात राजाची लक्षणे, प्रधान, राजपुत्र त्यांचे शिक्षण व कार्य, राजाचे सल्लागार, गड व गडावरील साहित्य, लष्कर, राजाची कर्तव्ये, हेर व्यवस्था इत्यादींविषयी माहिती दिलेली आहे.

**संभाजी महाराजांचा मृत्यू :** औरंगजेब संभाजी महाराजांना नमवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होता. त्याने मुकर्रबखान याची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली होती. महाराज कोकणातील संगमेश्वर येथे असल्याची बातमी मुकर्रबखानास कळली. तेव्हा त्याने छापा घालून संभाजी महाराजांना पकडले. बादशाहापुढे नेण्यात आल्यानंतर त्याच्यापुढे ते अतिशय बाणेदारपणे वागले. मग बादशाहाच्या हुकमाने ११ मार्च १६८९ रोजी अत्यंत अमानुषपणे त्यांना ठार करण्यात आले. मराठ्यांचा हा छत्रपती स्वाभिमान न सोडता अत्यंत धीरोदात्तपणे मृत्यूला सामोरा गेला. त्यांच्या बलिदानापासून प्रेरणा घेऊन मराठ्यांनी मुघलांविरुद्धचा संघर्ष अधिकच तीव्र केला.



छत्रपती राजाराम महाराज

**छत्रपती राजाराम महाराज :** राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे द्वितीय पुत्र होत. त्यांचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० रोजी रायगडावर झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ते छत्रपती झाले. आता मराठ्यांचे राज्य जिंकून घेण्याचे आपले स्वप्न साकार होणार, असे औरंगजेबला वाटू लागले. म्हणून त्याने रायगडला वेढा घालण्यासाठी झुल्फिकारखानला पाठवले. त्या वेळी राजाराम महाराज व त्यांच्या पत्नी महाराणी ताराबाई तसेच संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई व पुत्र शाहू हे रायगडावरच होते. या सर्वांनी एकाच ठिकाणी राहणे धोक्याचे होते. या प्रसंगी येसूबाईंनी या अभूतपूर्व संकटाला धैर्याने तोंड दिले. कोणत्याही परिस्थितीत मुघलांना शरण जायचे नाही, असे ठरवून त्यांनी रायगडावर महत्त्वाचे राजनैतिक निर्णय घेतले. त्यानुसार, राजाराम महाराजांनी रायगडाच्या वेढ्यातून बाहेर पडावे आणि आवश्यकता भासल्यास दूरवर जिंजीला जावे, असे ठरले. तसेच, महाराणी येसूबाई यांनी आपल्या नेतृत्वाखाली रायगड लढवावा, असे धोरणही ठरवण्यात आले. येसूबाईंनी आपल्या मुलाला छत्रपती पदावर न बसवता राजाराम महाराजांना छत्रपती बनवण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा निर्णय हे स्वराज्य प्रेमाचे व पराकोटीच्या स्वार्थत्यागाचे उदाहरण होय. त्यांनी स्वतःच्या व पुत्राच्या प्राणांची पर्वा न करता मराठ्यांच्या छत्रपतीस सुरक्षित ठेवले.


**चला, शोधूया.**

भारताच्या नकाशात जिंजी हे ठिकाण शोधा.

**राजाराम महाराजांचे जिंजीला प्रयाण :** ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम महाराज आपल्या काही सहकाऱ्यांसह रायगडाच्या वेढ्यातून निसटले. त्यांनी दक्षिणेत जिंजीला जाण्याचा निर्णय घेतला. जिंजीचा किल्ला अभेद्य होता. हा किल्ला जिंकून घेणे मुघलांना सोपे नव्हते. प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, रूपाजी भोसले इत्यादी विश्वासू लोकांना बरोबर घेऊन राजाराम महाराज जिंजीला पोहचले.

**मराठ्यांच्या हालचाली :** मुघल सामर्थ्यापुढे रायगड दीर्घकाळ लढवणे कठीण होते. मुघलांनी नोव्हेंबर १६८९ मध्ये रायगड ताब्यात घेतला आणि महाराणी येसूबाई व शाहू यांना कैद केले. जिंजीला जाताना राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षाची जबाबदारी रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यावर सोपवली होती.

मराठ्यांच्या दृष्टीने परिस्थिती आणीबाणीची होती. औरंगजेबाने मराठ्यांच्या सरदारांना वतने व जहागिरी देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले होते. त्याला शह देण्यासाठी राजाराम महाराजांनी तेच तंत्र वापरले. मुघल प्रदेश जिंकल्यास त्या प्रदेशाची जहागीर तो प्रदेश जिंकणाऱ्या सरदारांस दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. छत्रपतींच्या या आश्वासनानंतर अनेक पराक्रमी सरदार पुढे आले. त्यांनी मुघल प्रदेशावर धडाक्याने आक्रमणाला सुरुवात केली. मुघल सेनानींना पराभूत केले. या पराक्रमात संताजी व धनाजी आघाडीवर होते. त्यांचे अनपेक्षित हल्ले व गनिमी कावा या युद्धतंत्रामुळे मुघलांना आपल्या प्रचंड साधनसामग्रीचा व अवजड तोफखान्याचा उपयोग करणे कठीण झाले. फारसे किल्ले, प्रदेश व खजिना ताब्यात नसताना मराठ्यांनी त्यांना सळो की पळो करून सोडले. एकदा तर संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण यांनी बादशहाच्या छावणीवर अचानक हल्ला करून त्याच्या तंबूवरील सोन्याचा कळस कापून आणला होता.



**माहीत आहे का तुम्हांला?**

धनाजीस मुघल सैनिक इतके भीत की, घोडा पाणी पिताना बुजला तर ते त्याला विचारत, 'का रे, तुला पाण्यात धनाजी दिसतो का ?'

**जिंजीला वेढा :** रायगड ताब्यात घेतल्यावर बादशहाने झुल्फिकारखानाला दक्षिणेस जिंजीच्या स्वारीवर पाठवले. त्याने जिंजीला वेढा घातला. मराठ्यांनी जिंजीचा किल्ला जवळजवळ आठ वर्षे निकराने लढवला. संताजी व धनाजी यांनी वेढा घातलेल्या मुघल सेनेवर बाहेरून प्रखर हल्ले चढवले. अखेरीस राजाराम महाराज वेढ्यातून बाहेर पडून महाराष्ट्रात परतले. त्यानंतर झुल्फिकारखानाने जिंजीचा किल्ला जिंकून घेतला.

राजाराम महाराज परत आल्यामुळे मराठ्यांचा जोर अधिकच वाढला. त्यांनी मुघलांच्या ताब्यातील खानदेश, वऱ्हाड, बागलाण या प्रदेशांवर हल्ले चढवले. राजाराम महाराजांनी आपल्या समंजस वृत्तीने आणि मुत्सद्देगिरीने संताजी व धनाजी यांच्यासारखे शेकडो मराठा वीर तयार केले. त्यांच्यात स्वराज्यरक्षणाची प्रेरणा निर्माण करून मोलाची कामगिरी पार पाडली. परंतु हे सर्व घडत असताना २ मार्च १७०० मध्ये राजाराम महाराजांचे अल्पशा आजाराने सिंहगडावर निधन झाले.

राजाराम महाराज विचारी आणि मनमिळाऊ स्वभावाचे होते. मराठी राज्यातील सर्व कर्तबगार माणसांना त्यांनी एकत्र आणले. त्यांची एकजूट केली व त्यांच्यात चैतन्य निर्माण केले. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ११ वर्षे त्यांनी औरंगजेबाला मोठ्या धैर्याने व चिकाटीने टक्कर दिली. अत्यंत कठीण समयी स्वराज्याचे संरक्षण ही राजाराम महाराजांची सर्वांत मोठी कामगिरी होय.

रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी छत्रपती राजाराम यांचे वर्णन करताना 'स्थिरबुद्धी' या

विशेषणाचा उपयोग केला आहे. त्यांनी केलेला हा उल्लेख पूर्णपणे यथार्थ वाटतो.

**करून पहा.**

- तुमच्या परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांची मुलाखत घ्या.

**महाराणी ताराबाई :** छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाला वाटले की आपण संघर्ष जिंकला. परिस्थिती मात्र उलट होती. औरंगजेब लढायांमागून लढाया जिंकत होता. पण त्याला युद्ध मात्र जिंकता येत नव्हते. अत्यंत विपरीत परिस्थितीत स्वराज्याचे नेतृत्व करण्यास राजाराम महाराजांच्या कर्तबगार पत्नी महाराणी ताराबाई पुढे आल्या.



महाराणी ताराबाई

मुघल इतिहासकार खाफीखान याने महाराणी ताराबाई यांचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे, ‘‘ती (ताराबाई) बुद्धिमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता.’’


छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईंनी आपल्या सरदारांच्या साहाय्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याचा संघर्ष नेटाने पुढे चालू ठेवला. औरंगजेबाने सातारा, पन्हाळा ही मराठ्यांची ठिकाणे जिंकली, तर मराठ्यांनी मुघलांच्या मध्यप्रदेश, गुजरात या प्रदेशांत धडक मारली. ताराबाईंनी युद्धाचे क्षेत्र विस्तारले. कृष्णाजी सावंत, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे हे सरदार महाराष्ट्राबाहेर मुघलांविरुद्ध संघर्ष करू लागले. युद्धाचे पारडे बदलत चालल्याची ही खूण होती.

महाराणी ताराबाईंनी सात वर्षे संघर्ष केला. राज्य राखले. सगळा कारभार एकहाती घेऊन सरदारांना स्वराज्य कार्याला जोडून घेतले. सिरोंज, मंदसौर, माळवा येथपर्यंत मराठे सरदार मुघलांविरुद्ध लढू लागले. खाफिखान लिहितो, ‘‘राजारामाची बायको ताराबाई हिने विलक्षण धामधूम उडवली तीत तिच्या सैन्याच्या नेतृत्वाचे आणि मोहिमांच्या

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराणी ताराबाईंनी गनिमी काव्याचा अत्यंत चांगल्या प्रकारे उपयोग केला. औरंगजेबाच्या सैन्यापुढे मराठ्यांची ताकद अत्यंत कमी होती. औरंगजेब किल्ला जिंकण्यासाठी किल्ल्याला वेढा टाकायचा. शक्य होईल तेवढा काळ मराठे किल्ला लढवायचे. पावसाळा जवळ आला की, मराठा किल्लेदार फितूर झाला आहे असे दाखवून औरंगजेबाकडून लाच घेऊन किल्ला त्याला दिला जायचा. किल्लेदार लाचेची रक्कम मराठी खजिन्यात जमा करायचा. औरंगजेब किल्ल्यावर धन, धान्य, दारूगोळा भरून ठेवताच ताराबाई तो किल्ला पुन्हा जिंकून घ्यायच्या. ताराबाईंच्या या युद्धतंत्राचे वर्णन ‘सेफ डिपॉझिट लॉकर सिस्टिम’ असे केले जाते.

व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढत गेली.''



**माहीत आहे का तुम्हांला ?**

ताराबाईंच्या कर्तृत्वाचे वर्णन करताना 'शिवभारत'कार परमानंदाचा मुलगा कवी देवदत्त याने म्हटले आहे,

*ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ।*
*दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचे गेले पाणी ।*
*रामराणी भद्रकाली । रणरंगी क्रुद्ध झाली ।*
*प्रयत्नाची वेळ आली । मुगल हो सांभाळा ।।*

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा महाराणी ताराबाईंनी पुढे चालवला.

मराठ्यांच्या या आक्रमक चढायांमुळे औरंगजेब हताश झाला. सतत पंचवीस वर्षे मुघल-मराठे संघर्ष चालू होता. मराठ्यांचा पाडाव करणे मुघलांना जमले नाही. अशा परिस्थितीत औरंगजेब बादशाहाचा इ.स.१७०७ मध्ये अहमदनगर येथे मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूबरोबरच मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम समाप्त झाला.

मराठ्यांचा हा स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे मुघल सत्ताधीशांनी बाळगलेली साम्राज्याची लालसा आणि मराठ्यांच्या मनातील स्वातंत्र्याची आकांक्षा यांच्यातील हा लढा होता. त्यात मराठ्यांचा विजय झाला. इतकेच नव्हे तर नंतरच्या काळात औरंगजेबाच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यात मराठे अग्रेसर राहिले. दिल्लीच्या तख्तावर नियंत्रण ठेवत त्यांनी जवळपास सर्व हिंदुस्थानचा कारभार पाहिला व रक्षणही केले. त्यामुळे अठरावे शतक हे मराठ्यांचे शतक मानले जाते. या शतकातील मराठ्यांच्या कामगिरीचा इतिहास आपण पुढील पाठांत पाहणार आहोत.

## भोसले घराण्याची वंशावळ

मालोजीराजे
↓
शहाजीराजे (इ.स.१५९४ ते १६६४)
↓
- संभाजी
- छत्रपती शिवाजी महाराज (इ.स.१६३० ते १६८०)
  - छत्रपती संभाजी महाराज (इ.स.१६५७ ते १६८९)
    ↓
    छत्रपती शाहू महाराज (इ.स.१६८२ ते १७४९)
    ↓
    छत्रपती रामराजा (दत्तक इ.स. १७५० ते १७७७)
  - छत्रपती राजाराम महाराज (इ.स.१६७० ते १७००)
    - छत्रपती शिवाजी (ताराबाई पुत्र)
      ↓
      रामराजा (सातारा गादीकडे दत्तक)
    - छत्रपती संभाजी (राजसबाई पुत्र)
- व्यंकोजी

## स्वाध्याय

### १. योग्य पर्याय निवडा.

(१) औरंगजेब यांच्या पराक्रमाने जेरीस आला होता.
(अ) शाहजादा अकबर (ब) छत्रपती संभाजी महाराज (क) छत्रपती राजाराम महाराज

(२) बादशाहाच्या तंबूवरील सोन्याचा कळस कापणारे
(अ) संताजी व धनाजी (ब) संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण (क) खंडो बल्लाळ व रूपाजी भोसले

(३) गोव्याच्या लढाईत पराक्रमाची शर्थ करणारा
(अ) येसाजी कंक (ब) नेमाजी शिंदे (क) प्रल्हाद निळाजी

### २. पाठात शोधून लिहा.

(१) संभाजी महाराजांना जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडून माघारी का फिरावे लागले ?

(२) संभाजी महाराजांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे का ठरवले ?

(३) राजाराम महाराजांनी जिंजीला जाताना स्वराज्याच्या रक्षणाची जबाबदारी कोणावर सोपवली ?

(४) महाराणी ताराबाईंच्या पराक्रमाचे वर्णन देवदत्त या कवीने कोणत्या शब्दांत केले आहे ?

### ३. का ते लिहा.


(१) औरंगजेबाने आपला मोर्चा आदिलशाही व कुतुबशाही राज्यांकडे वळवला.

(२) संभाजी महाराजांनंतर मुघलांशी निकराचा लढा देण्यासाठी मराठे सज्ज झाले.

(३) महाराणी येसूबाईंच्या नेतृत्वाखाली रायगड लढवावा, असे धोरण ठरवण्यात आले.

### उपक्रम

भारताच्या नकाशात गोवा, विजापूर, गोवळकोंडा, जिंजी, अहमदाबाद, अहमदनगर ही ठिकाणे दाखवा.



जिंजीचा किल्ला

# १०. मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार

मराठ्यांनी केलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या आरंभी मुघल सत्ता आक्रमक होती, तर मराठ्यांचे धोरण बचावाचे होते. या स्वातंत्र्यसंग्रामाच्या अखेरीस मात्र परिस्थिती उलट झाली. मराठ्यांनी चढाईचे आणि मुघलांनी बचावाचे धोरण स्वीकारले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांनी मुघल सत्तेला नमवून जवळजवळ भारतभर आपला सत्ताविस्तार केला. त्याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत.

**शाहू महाराजांची सुटका :** औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये दिल्लीच्या गादीसाठी संघर्ष सुरू झाला. शाहजादा आझमशाह हा दक्षिणेत होता. बादशाही तख्त हस्तगत करण्यासाठी तो त्वरेने दिल्लीला निघाला. राजपुत्र शाहू त्याच्या ताब्यात होते. शाहू महाराजांना कैदेतून सोडल्यास महाराणी ताराबाई व शाहू महाराज यांच्यात छत्रपतींच्या गादीसाठी कलह होईल आणि मराठ्यांचे सामर्थ्य खच्ची होईल, असे आझमशाहाला वाटले. म्हणून त्याने शाहू महाराजांची सुटका केली.

**शाहू महाराजांचा राज्याभिषेक :** कैदेतून सुटका झाल्यावर शाहू महाराजांनी महाराष्ट्राकडे कूच केले. त्यांना मराठ्यांचे काही सरदार येऊन मिळाले. परंतु महाराणी ताराबाईंनी शाहू महाराजांचा छत्रपतीपदावरील हक्क मान्य केला नाही. पुणे जिल्ह्यात भीमा नदीच्या काठी खेड येथे शाहू महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या सैन्यांमध्ये लढाई झाली. या लढाईत शाहू महाराजांचा विजय झाला. त्यांनी सातारा जिंकून घेतले.



शाहू महाराज

स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. सातारा ही मराठ्यांच्या राज्याची राजधानी झाली.

काही काळ शाहू महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्यातील विरोध चालू राहिला. इ.स.१७१० मध्ये महाराणी ताराबाईंनी पन्हाळगडावर आपला अल्पवयीन मुलगा शिवाजी (दुसरा) यास छत्रपती म्हणून घोषित केले. तेव्हापासून मराठेशाहीत साताराच्या राज्याखेरीज कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

शाहू महाराजांचे पूर्वायुष्य मुघलांच्या छावणीत गेल्यामुळे त्यांना मुघलांचे राजकारण जवळून पाहायला मिळाले होते. मुघलांच्या व विशेषतः उत्तर भारताच्या राजकारणामधील खाचाखोचा त्यांना समजल्या होत्या. मुघल सत्तेच्या बलस्थानांची आणि कमतरतांचीही त्यांना चांगली माहिती झाली होती. शिवाय, मुघल दरबारातील प्रभावशाली व्यक्तींशी त्यांचा परिचय झाला होता. या सर्व बाबींचा उपयोग त्यांना बदलत्या परिस्थितीत मराठ्यांच्या राजकारणाची दिशा ठरवण्यासाठी झाला.

मराठ्यांच्या राज्याचा नाश करण्याचे पूर्वीचे औरंगजेबाचे धोरण त्याच्या वारसदारांनी आता सोडले होते. त्यामुळे आता मुघल सत्तेशी संघर्ष करण्याऐवजी तिचे रक्षक, म्हणून पुढे येऊन त्याच भूमिकेतून आपल्या सत्तेचा विस्तार करायचा, असे नवे राजकीय धोरण मराठ्यांनी स्वीकारले. नवे देवालय बांधल्याने जे पुण्य मिळते, तेच जुन्या देवळाचा जीर्णोद्धार केल्याने मिळते, हे या धोरणाचे सूत्र होते.

मुघल सत्तेला जशी वायव्येकडून होणाऱ्या इराणी, अफगाणी आक्रमणांची भीती होती, तसाच आसपासच्या पठाण, राजपूत, जाट, रोहिले यांच्यासारख्या स्थानिक सत्ताधीशांचाही धोका होता. शिवाय दरबारात चालणारी स्पर्धा व संघर्ष यांमुळेही मुघल सत्ता आतून पोखरून निघाली होती. यामुळे दिल्ली दरबाराला मराठ्यांच्या साहाय्याची गरज होती.

**बाळाजी विश्वनाथ :** शाहू महाराजांची मुघलांच्या कैदेतून मुक्तता झाल्यावर त्यांनी बाळाजी विश्वनाथ भट याला पेशवा केले. बाळाजी मूळचा कोकणातील श्रीवर्धन गावचा. तो कर्तृत्ववान व अनुभवी होता. शाहू महाराज हेच मराठ्यांच्या राज्याचे खरे वारस आहेत, हे पटवून देऊन अनेक सरदारांना त्याने शाहू महाराजांकडे वळवले.

कान्होजी आंग्रे हा मराठ्यांच्या आरमाराचा प्रमुख होता. त्याने महाराणी ताराबाईंची बाजू घेतली. त्याने शाहू महाराजांच्या मुलखावर हल्ले केले. त्यामुळे त्यांच्यासमोर कठीण परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीमध्ये त्यांनी बाळाजीला कान्होजी आंग्रेविरुद्ध पाठवले. बाळाजीने युद्ध टाळून मुत्सद्देगिरीने कान्होजीस शाहू महाराजांकडे वळवले.

**चौथाई–सरदेशमुखीच्या सनदा :** शाहू महाराजांचे आसन महाराष्ट्रात बळकट केल्यानंतर बाळाजीने आपले लक्ष उत्तरेकडील राजकारणाकडे वळवले. औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूनंतर दिल्ली दरबारात दुही व गोंधळ निर्माण झाला होता. तेथे सय्यिद बंधू अब्दुल्ला (हसन) व हुसैन अली यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्यांच्या मदतीने बाळाजीने इ.स.१७१९ मध्ये मुघल बादशाहाकडून दख्खनच्या मुघल प्रदेशातून काही ठिकाणी चौथाई, तर काही ठिकाणी सरदेशमुखी वसूल करण्याच्या सनदा मिळवल्या. चौथाई म्हणजे महसुली उत्पन्नाचा एक चतुर्थांश भाग, तर सरदेशमुखी म्हणजे एक दशांश भाग होय.


पहिला बाजीराव

**पहिला बाजीराव :** शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बाजीराव (पहिला) याची इ.स.१७२० मध्ये पेशवेपदी नेमणूक केली. पेशवेपदाच्या वीस वर्षांच्या कालावधीत त्याने मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार घडवून आणला.

**निजामाचा पालखेड येथे पराभव :** मुघल बादशाह फर्रुखसियर याने निजाम–उल–मुल्क याची दख्खनचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. इ.स.१७१३ मध्ये निजामाने हैदराबाद येथे आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बादशाहाने मराठ्यांना दक्षिणेच्या मुघल सुभ्यांतून चौथाई–सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार दिले होते. याला निजामाचा विरोध होता. त्याने पुणे परगण्याचा काही भाग जिंकून घेतला. बाजीरावाने निजामाला शह देण्याचे ठरवले. त्याने निजामाचा औरंगाबादजवळ पालखेड येथे पराभव केला. तेव्हा त्याने मराठ्यांचा चौथाई–सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मान्य केला.

मुघल सत्ता कमकुवत झालेली असल्याने उत्तरेला सत्ताविस्तार करण्यास अधिक वाव आहे, हे बाजीरावाने ओळखले होते. शाहू महाराजांनी त्याच्या धोरणाला पाठिंबा दिला.

**माळवा :** आजच्या मध्यप्रदेशातील माळवा हा भाग मुघलांच्या ताब्यात होता. बाजीरावाने आपला भाऊ चिमाजी आप्पा याच्या नेतृत्वाखाली मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व उदाजी पवार यांना माळव्यात पाठवले. तेथे त्यांनी आपली ठाणी मजबूत केली.

**बुंदेलखंड :** बुंदेलखंड म्हणजे आजचा मध्यप्रदेश व उत्तर प्रदेश या प्रांतांतील झाशी, पन्ना, सागर वगैरे शहरांच्या परिसरातील प्रदेश होय.

बुंदेलखंडात छत्रसाल राजाने आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले होते. अलाहाबादचा मुघल सुभेदार महंमदखान बंगश याने बुंदेलखंडावर हल्ला केला. त्याने छत्रसालास पराभूत केले. तेव्हा छत्रसालाने बाजीरावाला मदतीची विनंती केली.

बाजीराव मोठी फौज घेऊन बुंदेलखंडात गेला. त्याने बंगशाला पराभूत केले. छत्रसालाने बाजीरावाचा मोठा सन्मान केला. अशा रीतीने माळवा व बुंदेलखंड येथे मराठ्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

छत्रसालाने मदतीकरिता बाजीरावाला पत्र लिहिले. त्यात त्याने लिहिले, 'जो गत आह गजेंद्रकी वह गत आयी है आज. बाजी जान बुंदेलकी, बाजी राखो लाज.' (मगरीने पाय धरलेल्या गजेंद्रासारखी माझी स्थिती झाली आहे. मी आता मोठ्या संकटात आहे. आता माझी लाज राखणारा तूच आहेस.)

बाजीरावाने बादशाहाकडे माळव्याच्या सुभेदारीची मागणी केली. त्याने ही मागणी अमान्य केली, म्हणून बाजीराव मार्च १७३७ मध्ये दिल्लीवर स्वारी करण्याच्या उद्देशाने दिल्लीच्या सीमेवर जाऊन धडकला.

**भोपाळची लढाई :** बाजीरावाच्या स्वारीमुळे बादशाह अस्वस्थ झाला. त्याने निजामाला दिल्लीच्या रक्षणासाठी बोलावून घेतले. प्रचंड फौजेनिशी निजाम बाजीरावाविरुद्ध चालून गेला. बाजीरावाने भोपाळ येथे त्याचा पराभव केला. निजामाने मराठ्यांना माळव्याच्या सुभेदारीची सनद बादशाहाकडून मिळवून देण्याचे मान्य केले.

**पोर्तुगिजांचा पराभव :** कोकण किनारपट्टीवरील वसई आणि ठाणे हे भाग पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. पोर्तुगीज सत्ताधीश प्रजेवर जुलूम करत. बाजीरावाने आपला भाऊ चिमाजीआप्पा यास त्यांचे पारिपत्य करण्यासाठी पाठवले. त्याने ठाणे व आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. त्यानंतर इ.स.१७३९ मध्ये त्याने वसईच्या किल्ल्याला वेढा घातला. तो किल्ला अतिशय मजबूत होता. पोर्तुगिजांजवळ प्रभावी तोफा होत्या. तरीही चिमाजीआप्पाने चिकाटीने वेढा चालवून पोर्तुगिजांना शरण येण्यास भाग पाडले. त्यामुळे वसईचा किल्ला व पोर्तुगिजांचा बराचसा मुलूख मराठ्यांच्या ताब्यात आला.

**बाजीरावाचा मृत्यू :** इराणचा बादशाह नादिरशाह याने भारतावर स्वारी केली. तेव्हा बाजीराव शाहू महाराजांच्या आज्ञेने मोठी फौज घेऊन उत्तरेला निघाला. तो ब्ऱ्हाणपूरला पोहचला, तोपर्यंत नादिरशाह दिल्लीतून प्रचंड संपत्ती लुटून मायदेशी परत गेला होता. एप्रिल १७४० मध्ये नर्मदाकाठी रावेरखेडी येथे बाजीरावाचा मृत्यू झाला.

बाजीराव हा एक उत्तम सेनानी होता. आपल्या पराक्रमाने त्याने उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्याने मराठ्यांच्या सत्तेला अखिल भारतीय पातळीवरील एक प्रबळ सत्ता म्हणून स्थान मिळवून दिले. त्याच्या काळात शिंदे, होळकर, पवार, गायकवाड ही घराणी पुढे आली.

## स्वाध्याय

**१. म्हणजे काय ?**

(१) चौथाई –

(२) सरदेशमुखी –

**२. एका शब्दात लिहा.**

(१) बाळाजी मूळचा कोकणातील या गावचा होता....

(२) बुंदेलखंडात याचे राज्य होते....

(३) या ठिकाणी बाजीरावाचा मृत्यू झाला....

(४) पोर्तुगिजांचा पराभव यांनी केला....

**३. लिहिते व्हा.**

(१) कान्होजी आंग्रे (२) पालखेडची लढाई

(३) बाळाजी विश्वनाथ (४) पहिला बाजीराव

**४. कारणे लिहा.**

(१) मराठेशाहीत स्वतंत्र दोन राज्ये निर्माण झाली.

(२) आझमशाहाने छत्रपती शाहू महाराजांची कैदेतून सुटका केली.

(३) दिल्ली दरबाराला मराठ्यांच्या साहाय्याची गरज होती.

**उपक्रम**

महाराणी ताराबाई यांचे चरित्र मिळवा व त्यांच्या जीवनातील तुम्हांला आवडलेल्या प्रसंगांचे वर्गात भूमिकाभिनय सादर करा.

# ११. राष्ट्ररक्षक मराठे

शाहू महाराजांनी बाजीरावानंतर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब याला पेशवाईची वस्त्रे दिली. नादिरशाहाच्या आक्रमणानंतर दिल्लीमध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत उत्तरेमध्ये मराठ्यांची सत्ता स्थिर करण्यासाठी त्याने प्रयत्न केले. या काळात अहमदशाह अब्दालीने पानिपतावर मराठ्यांच्या समोर आव्हान निर्माण केले. या सर्व घडामोडींची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**उत्तरेतील परिस्थिती :** अयोध्या प्रांताच्या उत्तर-पश्चिमेस लागून हिमालयाच्या पायथ्याशी असलेला प्रदेश अठराव्या शतकात रोहिलखंड या नावाने संबोधला जात असे. अफगाणिस्तानातून आलेले पठाण या भागात स्थायिक झाले होते. या पठाणांना रोहिले म्हणत. गंगा-यमुना नद्यांच्या दोआबाच्या प्रदेशात त्यांनी धुमाकूळ घातला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अयोध्येच्या नबाबाने मराठ्यांना पाचारण केले. मराठ्यांनी त्यांचा बंदोबस्त केला.

**अफगाणांशी संघर्ष :** अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशाह अब्दाली याला भारतातील संपत्तीचे आकर्षण होते. इ.स.१७५१ मध्ये त्याने पंजाबवर आक्रमण केले. या काळात मुघल प्रदेशात अंदाधुंदी निर्माण झाली होती. त्यामुळे मुघलांना अब्दालीच्या आक्रमणाची भीती होती. या परिस्थितीत आपल्या संरक्षणासाठी मराठ्यांची मदत घेणे त्यांना आवश्यक वाटले. बादशहाला मराठ्यांचे सामर्थ्य आणि प्रामाणिकपणा यांची खात्री पटली होती. दिल्लीच्या रक्षणार्थ मराठ्यांएवढी दुसरी समर्थ सत्ताही नव्हती. त्यामुळे बादशाहाने इ.स.१७५२ च्या एप्रिल महिन्यात मराठ्यांशी एक करार केला. मराठ्यांनी या करारानुसार रोहिले, जाट, राजपूत, अफगाण इत्यादी शत्रूंपासून मुघल सत्तेचे रक्षण करण्याचे मान्य केले. या बदल्यात त्यांना रोख रक्कम मिळणार होती. शिवाय पंजाब, मुलतान, राजपुताना, सिंध, रोहिलखंड या भागातून चौथाई वसूल करण्याचे हक्क त्यांना मिळाले. तसेच, अजमेर आणि आग्रा या प्रांताची सुभेदारी देण्यात आली.

या करारानुसार छत्रपतींच्या वतीने पेशव्यांनी शिंदे-होळकरांच्या फौजा दिल्लीच्या संरक्षणार्थ पाठवल्या. मराठे दिल्लीकडे निघाले. ही बातमी पोहचताच अब्दाली मायदेशी परतला. मराठे मजल-दरमजल करत दिल्लीला पोहचले. मराठ्यांमुळेच अब्दालीचे संकट टळले. म्हणून बादशाहाने मुघलांच्या सुभ्यांमधील चौथाईचा हक्क त्यांना दिला. या सुभ्यांमध्ये काबूल, कंदाहार आणि पेशावरचाही समावेश होता. हे सुभे पूर्वी मुघल साम्राज्याचा भाग होते. आता ते अब्दालीच्या अफगाणिस्तानमध्ये होते. करारानुसार हे सुभे अब्दालीकडून जिंकून घेऊन परत मुघलांच्या राज्याला जोडणे हे मराठ्यांचे कर्तव्य ठरत होते. उलट, किमान पंजाबपर्यंत प्रदेश अफगाण अंमलाखाली आणावा अशी अब्दालीची इच्छा होती. त्यामुळे आज ना उद्या मराठे आणि अब्दाली यांचा संघर्ष होणे अटळ होते.



पेशवा नानासाहेब

नानासाहेब पेशव्यांचा भाऊ रघुनाथराव हा जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांना बरोबर घेऊन उत्तर भारतात अब्दालीशी मुकाबला करण्यासाठी मोहिमेवर गेला.

उत्तरेकडील स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या दृष्टिकोनातून दक्षिणेतील मराठे हे त्यांचे स्पर्धक ठरले. मराठ्यांचा व्यापक दृष्टिकोन लक्षात न घेता मराठ्यांना मदत करण्याऐवजी ते

तटस्थ राहिले. मराठ्यांचे दिल्ली दरबारातील वर्चस्व व हस्तक्षेप त्यांना रुचत नव्हता. मात्र सुरजमल जाट व राणी किशोरी यांनी पानिपतावरील युद्‌धात जखमी झालेल्या मराठ्यांना मदत केली.

त्याचप्रमाणे उत्तरेतील काही कट्टरपंथीय मराठ्यांकडे परधर्मीय म्हणून पाहत होते. त्यांनीही मराठ्यांचा व्यापक दृष्टिकोन समजून न घेता मराठ्यांचे वर्चस्व कमी व्हावे म्हणून अब्दालीला हिंदुस्थानवर आक्रमण करण्याचा आग्रह केला. अब्दाली मराठ्यांचा पराभव करून त्यांना दक्षिणेत नर्मदापार हुसकावून देईल अशी त्यांना अपेक्षा होती.

**अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला :** नजीबखान हा रोहिल्यांचा सरदार होता. उत्तर भारतातील मराठ्यांचे वर्चस्व त्याला सहन होत नव्हते. नजीबखानच्या सांगण्यावरून अब्दालीने भारतावर पुन्हा स्वारी केली. ही त्याची भारतावरची पाचवी स्वारी होती. त्याने दिल्ली जिंकून घेतली. मोठी लूट घेऊन तो अफगाणिस्तानात परत गेला. रघुनाथराव व मल्हारराव होळकर हे पुन्हा उत्तरेत गेले. त्यांनी दिल्ली घेतली. त्यानंतर अब्दालीच्या अधिकाऱ्यांना पिटाळून लावून पंजाब जिंकला. अब्दालीच्या सैनिकांचा पाठलाग करत मराठे इ.स.१७५८ मध्ये अटकेपर्यंत गेले. अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला. अटक हे ठिकाण आजच्या पाकिस्तानमध्ये आहे. मराठ्यांनी अटकेपार पेशावरपर्यंत मोहीम काढली. तथापि त्यांनी आपल्या प्रभुत्वाखाली आणलेल्या या प्रदेशाची व्यवस्था नीट लावली नाही.


**दत्ताजीचा पराक्रम :** पंजाबवरील पकड घट्ट करण्यासाठी व नजीबखानाचे पारिपत्य करण्यासाठी पेशव्याने दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांना उत्तरेत पाठवले. दत्ताजी उत्तरेत गेला. नजीबखानाने दत्ताजीला वाटाघाटीत अडकवून ठेवले आणि अब्दालीला मदतीस येण्याची विनंती केली. हा संदेश मिळताच अब्दाली पुन्हा भारतावर चालून आला. दत्ताजी व अब्दाली यांची यमुनेच्या तीरावर बुराडी घाट येथे गाठ पडली. जोरदार लढाई झाली. दत्ताजीने असामान्य शौर्य गाजवले. परंतु या लढाईत दत्ताजीला वीरमरण आले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

दत्ताजी मोठ्या शौर्याने लढला. पण अखेरीस तो रणांगणावर घायाळ होऊन पडला. नजीबखान रोहिल्याचा सल्लागार कुतुबशाह हत्तीवरून उतरून घायाळ झालेल्या दत्ताजीजवळ आला. त्याने दत्ताजीला विचारले, 'क्यों पटेल जी, हमारे साथ तुम और भी लढेंगे ?' दत्ताजी घायाळ अवस्थेत पडला होता. पण कुतुबशाहाचे शब्द ऐकताच त्याने बाणेदार उत्तर दिले, 'हाँ, बचेंगे तो और भी लढेंगे।'

**सदाशिवरावभाऊ :** अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी नानासाहेबाने आपला चुलत भाऊ सदाशिवरावभाऊ व थोरला मुलगा विश्वासराव यांस उत्तरेला पाठवले. सदाशिवरावभाऊ हा चिमाजीआप्पाचा मुलगा होय. त्याच्याबरोबर प्रचंड फौज व प्रभावी तोफखाना होता. इब्राहीमखान गारदी हा त्याच्या तोफखान्याचा प्रमुख होता. या तोफखान्याच्या जोरावर त्याने इ.स.१७६० मध्ये लातूर जिल्ह्यातील उदगीरच्या लढाईत निजामाचा पराभव केला होता.


सदाशिवरावभाऊ




**पानिपतचा रणसंग्राम :** उत्तरेच्या मोहिमेत सदाशिवरावभाऊने दिल्ली जिंकून घेतली. त्यानंतर मराठ्यांचे सैन्य आणि अब्दालीचे सैन्य पानिपत येथे समोरासमोर आले. १४ जानेवारी १७६१ रोजी मराठ्यांनी अब्दालीवर हल्ला करून लढाईला सुरुवात केली. ही पानिपतची तिसरी लढाई होय. लढाईत विश्वासरावाला गोळी लागून तो ठार झाला. हे सदाशिवरावभाऊला समजताच तो बेभान होऊन शत्रूवर तुटून पडला. युद्धाच्या धुमश्चक्रीत तो दिसेनासा झाला. आपला नेता नाहीसा झालेला पाहून मराठी सैनिकांचा धीर खचला. त्याच वेळी अब्दालीच्या राखीव व ताज्या दमाच्या सैन्याने मराठ्यांवर हल्ला चढवला. मराठ्यांचा पराभव झाला. महाराष्ट्रातील एक सबंध तरुण पिढी गारद झाली. अनेक पराक्रमी सरदार धारातीर्थी पडले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पानिपतच्या युद्धात सुमारे दीड लाख लोक मारले गेले. एका पत्रातील सांकेतिक वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

''दोन मोत्ये गळाली. सत्तावीस मोहोरा हरवल्या ! आणि रूपये, खुर्दा किती गेल्या याची गणतीच नाही.''

परक्या अब्दालीला येथे राज्य करण्याचा नैतिक हक्क नाही, या व्यापक भूमिकेतून मराठे अब्दालीशी लढले. आपण सर्व एतद्देशीय असून अब्दाली परकीय शत्रू आहे, अशा आशयाची पत्रे लिहून सदाशिवरावभाऊने उत्तरेकडील सत्ताधाऱ्यांना मराठ्यांची व्यापक आणि सर्वसमावेशक भूमिका कळवली. परंतु त्याला अनुकूल प्रतिसाद न देता हे सत्ताधारी तटस्थ राहिले. साहजिकच भारताच्या रक्षणाची जबाबदारी एकट्या मराठ्यांवर पडली. भारत हा एक देश असण्याची व त्याचा राजा धर्माने कोणीही असला तरी सर्वांनी त्याला पाठिंबा देण्याची जाणीव इतिहासात पहिल्यांदा मराठ्यांनी दाखवली, असे म्हणता येईल.

**पेशवा माधवराव :** नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा माधवराव हा पेशवेपदी आला. माधवरावाने आपल्या कारकिर्दीत निजाम व हैदरअली यांचा बंदोबस्त केला. त्याने उत्तरेमध्ये मराठ्यांचे प्रभुत्व पुन्हा प्रस्थापित केले.



पेशवा माधवराव

पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला, हे पाहून निजामाने त्यांच्या विरोधात पुन्हा हालचाली सुरू केल्या. त्याने त्यांच्या मुलखावर आक्रमण केले. परंतु माधवरावाने पैठणजवळील राक्षसभुवन येथे त्याला पराभूत केले.

हैदरअली हा म्हैसूरचा सुलतान होता. पानिपतवरील मराठ्यांच्या पराभवाचा फायदा घेऊन त्याने कर्नाटकातील मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ले केले. परंतु मराठ्यांनी श्रीरंगपट्टणजवळील मोती तलाव येथे झालेल्या लढाईत त्याला पराभूत केले. तेव्हा त्याने तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडील प्रदेश मराठ्यांना देण्याचे मान्य केले.

माधवराव पेशव्यांचा मृत्यू इ.स.१७७२ मध्ये झाला. मराठ्यांच्या इतिहासात एक प्रामाणिक, कष्टाळू, जिद्दीचा आणि लोकहितदक्ष असा शासक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. या कर्तृत्ववान पेशव्याच्या मृत्यूमुळे मराठ्यांच्या राज्याची मोठी हानी झाली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पेशवा माधवरावाने शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे विशेष लक्ष दिले. विहिरी खोदून पुण्याचा पाणीपुरवठा वाढवला. नाना फडणविसासारखे कारभारी व रामशास्त्री प्रभुणेसारखे थोर न्यायाधीश त्याच्या काळात तयार झाले. प्रजेला न्याय मिळावा म्हणून न्याय खात्यात सुधारणा केली. तोफा व दारूगोळा बनवण्याचे कारखाने सुरू केले. नाणी पाडण्यासाठी टांकसाळीची व्यवस्था केली.


पेशवा माधवरावांनंतर गादीवर आलेले नारायणराव आणि सवाई माधवराव हे दोन पेशवे अल्पायुषी ठरले. शिवाय त्यांच्या काळात पेशवाईला गृहकलहाने ग्रासले. एकेकाळी अटकेपार झेंडा रोवणारा रघुनाथराव सत्तालालसेपोटी इंग्रजांच्या आश्रयाला गेला. त्यामुळे मराठे व इंग्रज यांच्यात युद्ध झाले.

हैदरअलीचा मृत्यू इ.स.१७८२ मध्ये झाला. त्यानंतर त्याचा मुलगा टिपू हा म्हैसूरचा सुलतान झाला. तो निष्णात योद्‌धा असण्याबरोबरच विद्‌वान आणि कवी होता. आपल्या कर्तबगारीने त्याने राज्याचा प्रभाव वाढवला. त्याने फ्रेंचांशी संधान साधून इंग्रजांच्या वर्चस्वाला हादरे देण्यास सुरुवात केली. इ.स.१७९९ मध्ये इंग्रजांविरुद्‌धच्या एका युद्‌धात तो मारला गेला.

**मराठी सत्तेच्या वर्चस्वाची पुन:स्थापना :** पानिपतच्या पराभवामुळे मराठ्यांच्या उत्तर भारतातील प्रतिष्ठेला जबर धक्का पोहचला होता. उत्तरेत पुन्हा आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी माधवरावाने महादजी शिंदे, तुकोजी होळकर, रामचंद्र कानडे व विसाजीपंत बिनीवाले या सरदारांना तिकडे पाठवले. मराठ्यांच्या फौजांनी जाट, रोहिले व राजपूत यांना पराभूत केले. बादशाह शाहआलम यास आपल्या आश्रयाखाली दिल्लीच्या तख्तावर बसवले. उत्तरेमध्ये मराठ्यांची सत्ता पुन:स्थापित झाली.

पानिपतच्या लढाईत मराठ्यांचे मोठे नुकसान झाले. अब्दालीच्या सैन्याचीही हानी झाली. पानिपतच्या विजयानंतर आर्थिक लाभ फारसा न झाल्याने त्याने किंवा त्याच्या वारसदारांनी भारतावर पुन्हा आक्रमण करण्याची हिंमत केली नाही. उलट, उत्तरेतील अराजकतेला आवर घालण्याचे सामर्थ्य मराठ्यांमध्येच आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी त्या पातशाहीचा सांभाळ करावा अशी इच्छा प्रकट केली. सलोखा करण्यासाठी पुणे दरबारात दूतही पाठवला. पानिपतचा मोठा पराभव पचवून उत्तरेच्या राजकारणात पुन्हा उभे राहण्यात मराठे यशस्वी झाले, ही बाब महत्त्वाची आहे. यामध्ये मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर आणि महादजी शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे.

## पेशवे घराण्याची वंशावळ



## स्वाध्याय

**१. कोण बरे ?**

(१) अफगाणिस्तानातून आलेले ....
(२) हिमालयाच्या पायथ्याशी स्थायिक झालेले ....
(३) नानासाहेब पेशव्यांचा भाऊ ....
(४) मथुरेच्या जाटांचा प्रमुख ....
(५) पैठणजवळ राक्षसभुवन येथे निजामाला पराभूत करणारे ....

**२. थोडक्यात लिहा.**

(१) अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला
(२) अफगाणांशी संघर्ष
(३) पानिपतच्या लढाईचे परिणाम

**३. घटनाक्रम लावा.**

(१) राक्षसभुवनची लढाई
(२) टिपू सुलतानचा मृत्यू
(३) माधवराव पेशव्यांचा मृत्यू
(४) पानिपतची लढाई
(५) बुराडी घाटची लढाई

**४. पुढील चौकटीत पाठात आलेल्या व्यक्तींची नावे शोधा.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | स | ह | ना | जा | न | को | जी |
| हा | ज | द | रा | ना | फ | म | त्ता |
| द | या | च | य | प | सा | थ | द |
| जी | प्पा | ल | ण | आ | रू | हे | प्र |
| बा | ळा | जी | वि | श्व | ना | थ | ब |
| अ | व | ला | मा | ध | व | रा | व |
| दे | स | दा | शि | व | रा | व | भा |
| म | ल्हा | र | रा | व | क | चि | ऊ |

**उपक्रम**

इंटरनेटच्या (आंतरजाल) मदतीने पानिपत लढाईची माहिती मिळवा व वर्गात सादर करा.



सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार

# १२. साम्राज्याची वाटचाल

आतापर्यंत आपण मराठी सत्तेचा उदय व विस्तार पाहिला. स्वराज्यस्थापनेपासून ते साम्राज्यापर्यंतचा प्रवास कसा कसा झाला ते आपण अभ्यासले. मराठ्यांचा उत्तर भारतात जो साम्राज्यविस्तार झाला, त्यासाठी ज्या सरदार घराण्यांनी महत्त्वाचे योगदान दिले त्यांचा थोडक्यात आढावा आपण या पाठात घेणार आहोत.

**इंदौरचे होळकर :** मल्हारराव हे इंदौरच्या होळकरांच्या सत्तेचे संस्थापक. त्यांनी दीर्घकाळ मराठी राज्याची सेवा केली. गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीत ते निष्णात होते. पहिला बाजीराव व नानासाहेब पेशवा यांच्या काळात त्यांनी उत्तरेत पराक्रम गाजवला. माळव्यात आणि राजपुतान्यात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. पानिपतानंतर उत्तरेतील मराठ्यांची प्रतिष्ठा सावरण्यास माधवराव पेशव्यास त्यांची फार मदत झाली.



मल्हारराव होळकर

पुण्यश्लोक अहिल्याबाई या मल्हाररावांचा पुत्र खंडेराव यांच्या पत्नी होत. खंडेरावांचा कुंभेरीच्या युद्धात मृत्यू झाला. पुढे काही काळाने मल्हारराव यांचेही निधन झाले. त्यानंतर इंदौरच्या कारभाराची सूत्रे अहिल्याबाईंच्या हाती आली. त्या थोर, मुत्सद्दी आणि उत्कृष्ट प्रशासक होत्या. त्यांनी नवे कायदे करून शेतसारा, करवसुली अशा गोष्टींची घडी बसवली. पडीक जमिनी लागवडीखाली आणणे, शेतकऱ्यांना विहिरी खोदून देणे, व्यापार-उद्योगाला प्रोत्साहन देणे, तलाव-तळी निर्माण करणे यासाठी त्या झटल्या. भारतात चारी दिशांना असलेल्या महत्त्वाच्या धर्मस्थळांवर त्यांनी मंदिरे, घाट, मठ, धर्मशाळा, पाणपोया यांची उभारणी केली. देशाच्या सांस्कृतिक ऐक्याचा त्यांचा हा प्रयत्न फार महत्त्वाचा होता. त्या स्वतः न्यायनिवाडे करत. त्या दानशूर आणि ग्रंथप्रेमी होत्या. त्यांनी सुमारे अठ्ठावीस वर्षे समर्थपणे राज्याचा कारभार करून उत्तरेत मराठ्यांच्या सत्तेची प्रतिमा उंचावली. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करून प्रजेला सुखी केले. मराठेशाहीच्या उतरत्या काळात यशवंतराव होळकर यांनी राज्य वाचवण्याचा प्रयत्न केला.



अहिल्याबाई होळकर

**नागपूरचे भोसले :** नागपूरकर भोसल्यांच्या घराण्यातील परसोजी भोसले यांना शाहू महाराजांच्या काळात वऱ्हाड व गोंडवन या प्रदेशांची सनद देण्यात आली. नागपूरकर भोसल्यांपैकी रघूजी हे सर्वांत कर्तबगार व पराक्रमी पुरुष होते. त्यांनी दक्षिणेतील तिरुचिरापल्ली व अर्काट यांच्या आसपासचा प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आणला. बंगाल, बिहार व ओडिशा प्रांतांच्या चौथाईच्या वसुलीचे अधिकार शाहू महाराजांनी त्यांना दिले होते. त्यांनी ते प्रदेश मराठ्यांच्या प्रभावाखाली आणले. इ.स.१७५१ मध्ये



रघूजी भोसले

नागपूरकर भोसल्यांनी ओडिशा सुभा अलीवर्दीखानाकडून जिंकून घेतला. पुढे इ.स.१८०३ पर्यंत मराठ्यांचे प्रभुत्व ओडिशावर होते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**मराठा डिच** – कोलकता येथील ब्रिटिशांनी नागपूरकर भोसल्यांची धास्ती घेतली होती. मराठ्यांच्या संभाव्य आक्रमणापासून कोलकता शहराचा बचाव करण्यासाठी त्यांनी शहराभोवती एक खंदक खोदला. तो मराठा डिच या नावाने प्रसिद्ध झाला.

**ग्वालियरचे शिंदे :** थोरल्या बाजीरावाने राणोजी शिंदे याचे कर्तृत्व हेरून त्याला उत्तरेत सरदार म्हणून नेमले. राणोजीच्या मृत्यूनंतर जयाप्पा, दत्ताजी व महादजी या त्याच्या मुलांनीही पराक्रम गाजवून उत्तर भारतात मराठ्यांची सत्ता प्रबळ केली.



महादजी शिंदे

माधवराव पेशव्याने शिंदे घराण्यातील सरदारकी महादजींना दिली. ते पराक्रमी आणि मुत्सद्दी होते. पानिपतच्या पराभवानंतर उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व आणि प्रतिष्ठा निर्माण करण्याची कामगिरी त्यांनी केली. उत्तर भारताच्या सपाट प्रदेशात मराठ्यांची गनिमी काव्याची युद्धपद्धती उपयुक्त ठरणार नाही, हे त्यांनी ओळखले. त्यांनी डिबॉईन फ्रेंच लष्करी तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली आपली फौज प्रशिक्षित केली आणि तोफखाना सुसज्ज केला. या कवायती फौजेच्या बळावर त्यांनी रोहिले, जाट, राजपूत, बुंदेले इत्यादींना नमवले.

पानिपतच्या लढाईमुळे मराठ्यांची शक्ती क्षीण झाली आहे, असे पाहून इंग्रजांनी दिल्लीच्या राजकारणात भाग घेणे सुरू केले. त्यांनी बंगालच्या सुभ्याच्या दिवाणीचे अधिकार स्वतःकडे घेतले. ते दिल्लीच्या बादशाहाला स्वतःच्या ताब्यात घेऊ इच्छित होते. अशा विपरीत परिस्थितीत महादजी शिंदे यांनी इंग्रजांवर मात करून बादशाहाला पुन्हा गादीवर बसवले. या कामगिरीवर खूश होऊन बादशाहाने त्यांना 'वकील-इ-मुत्लक' हे पद देऊ केले. याचा अर्थ त्यांना दिवाणी आणि लष्करी अधिकाराची मुखत्यारी देऊ केली. त्यांनी ते पद बाल पेशवे सवाई माधवराव यांच्या वतीने स्वीकारले. या पदामुळे दिल्लीची पातशाही मराठ्यांच्या पूर्ण नियंत्रणात आली. कोसळणाऱ्या बादशाहीचा डोलारा सावरणे हे सोपे काम नव्हते. महादजींनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठ्या जिद्दीने इ.स.१७८४ ते १७९४ या काळात दिल्लीचा कारभार पाहिला.

पानिपतच्या लढाईस जबाबदार असलेल्या नजीबखानाचे वारसदार अद्याप रोहिलखंडात कारस्थाने करतच होते. नजीबाचा नातू गुलाम कादिर याने लाल किल्ल्याचा ताबा घेऊन पैशासाठी बादशाहाचा आणि बेगमांचा छळ केला. बादशाहाचे डोळे काढले आणि खजिना बळकावला. अशा परिस्थितीत महादजींनी कादिरचा पराभव केला. त्याने बळकावलेली संपत्ती जप्त केली आणि ती बादशाहाला परत केली. बादशाहाची दिल्लीच्या गादीवर पुनःस्थापना केली. अशा रीतीने महादजींनी पानिपतच्या लढाईनंतर मराठ्यांची पत परत मिळवून दिली. दिल्लीच्या बादशाहाला मराठ्यांच्या ताब्यात ठेवून भारताचे राजकारण चालवले.

पेशव्यांच्या गृहकलहाचा एक परिणाम म्हणून रघुनाथराव इंग्रजांच्या आश्रयाला गेला होता. इंग्रजांच्या मदतीने पेशवेपद मिळवण्याचा त्याचा इरादा होता. मराठी मुत्सद्द्यांना हे मान्य नव्हते. त्यामुळे मराठे आणि इंग्रज यांच्यातील संघर्ष अटळ ठरला. मात्र त्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली की हिंदुस्थानवर राज्य कोणी करायचे याचा अंतिम निर्णय

मराठे आणि इंग्रज या दोन महासत्तांमधील संघर्षातूनच होणार होता.

मुंबईहून इंग्रज बोरघाटमार्गे मराठ्यांवर चालून आले. महादजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठी सेना एकवटली. गनिमी कावा पद्धतीचा वापर करून मराठ्यांनी इंग्रजांना धान्यसामग्री मिळू दिली नाही. उभय सैन्याची गाठ वडगाव (सध्याच्या पुणे-मुंबई रस्त्यावर) येथे पडली. या लढाईत इंग्रजांचा पराभव झाला आणि त्यामुळे रघुनाथरावाला मराठ्यांच्या ताब्यात देणे इंग्रजांना भाग पडले.

दिल्लीवर इ.स.१८०३ पर्यंत मराठ्यांचे नियंत्रण होते. इंग्रजांनी भारत जिंकला, तो मराठ्यांशी लढाया करून, हे लक्षात घेतले म्हणजे महादजींच्या कामगिरीचे मोल लक्षात येते. दिल्लीच्या कारभाराची व्यवस्था लावून ते पुण्यात आले. पुण्याजवळ वानवडी येथे त्यांचा मृत्यू झाला. तेथे त्यांच्या स्मरणार्थ छत्री उभारली आहे.



शिंदे छत्री, वानवडी-पुणे

शिंदे, होळकर व भोसले यांच्याप्रमाणे इतरही काही प्रमुख सरदारांनी मराठ्यांच्या राज्याची उल्लेखनीय सेवा केली.

शिवाजी महाराजांनी उभारलेले आरमार कान्होजी व तुळाजी आंग्रे या पितापुत्रांनी प्रबळ बनवले. या प्रबळ आरमाराच्या जोरावर त्यांनी पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी या आरमारी सत्तांना धाकात ठेवले आणि मराठ्यांच्या राज्याच्या किनारपट्टीचे रक्षण केले.

सेनापती खंडेराव दाभाडे व त्याचा पुत्र त्रिंबकराव यांनी गुजरातमध्ये मराठी सत्तेची पायाभरणी केली. खंडेरावाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी उमाबाई हिने अहमदाबादच्या मुघल सरदाराचे पारिपत्य केले. तेथील किल्ला जिंकून घेतला. पुढे गायकवाडांनी गुजरातमधील वडोदरा हे आपल्या सत्तेचे केंद्र केले. मध्यप्रदेशातील धार आणि देवासच्या पवारांनी शिंदे व होळकर यांना उत्तरेत मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार करण्यात मोलाचे साहाय्य केले.

माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्याची घडी विस्कटली होती. ती नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी व्यवस्थित बसवली. महादजी उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व स्थापण्यात गुंतलेले असताना नाना फडणवीस याने दक्षिणेकडील राजकारणाची सूत्रे सांभाळली. या कार्यात पटवर्धन, हरिपंत फडके, रास्ते इत्यादी सरदारांनी त्याला साथ दिली. त्यामुळे मराठ्यांच्या सत्तेचे दक्षिणेत वर्चस्व स्थापन झाले. इंदौरचे होळकर, नागपूरचे भोसले, ग्वालियरचे शिंदे, वडोदऱ्याचे गायकवाड यांनी पराक्रम, नेतृत्व, कर्तबगारी इत्यादी गुणांच्याद्वारे मराठ्यांच्या सत्तेला वैभव प्राप्त करून दिले. ते मराठ्यांच्या सत्तेचे अखेरच्या टप्प्यातले आधारस्तंभ होते.



नाना फडणवीस

उत्तर व दक्षिण भारतात मराठ्यांच्या सत्तेचे प्रभुत्व निर्माण करण्यात मराठा सरदार यशस्वी झाले. महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांच्या मृत्यूनंतर मात्र या सत्तेला उतरती कळा लागली. या काळात रघुनाथरावाचा पुत्र बाजीराव दुसरा हा पेशवा होता. त्याच्याकडे नेतृत्वाचे गुण नव्हते. उलट, अनेक दोषच होते. तो मराठा सरदारांमध्ये ऐक्य निर्माण करू

शकला नाही. मराठा सरदारांमधील दुहीमुळे मराठ्यांची सत्ता आतून पोखरली गेली. अशा अनेक कारणांनी दुसऱ्या बाजीरावाच्या काळात मराठ्यांचा उत्तरेतील व दक्षिणेतील प्रभाव कमी होत गेला. मराठ्यांची जागा इंग्रजांनी घेतली.

इंग्रजांनी इ.स.१८१७ मध्ये पुणे ताब्यात घेऊन तेथे 'युनियन जॅक' हा आपला ध्वज फडकवला. इ.स.१८१८ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील आष्टीच्या लढाईत इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला आणि त्यामुळे मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली. ही घटना भारताच्या इतिहासात एक मोठा बदल घडवणारी ठरली. या घटनेनंतर इंग्रजांनी बहुतांश भारत आपल्या आधिपत्याखाली आणला. भारताचा पाश्चात्त्य जगाबरोबर संबंध वाढला. त्याबरोबर भारतीय समाजव्यवस्थेत अनेक बदल झाले. अनेक जुन्या गोष्टी निष्प्रभ झाल्या वा बाजूला सारल्या गेल्या. एक मोठे स्थित्यंतर झाले. भारताच्या इतिहासातील मध्ययुग संपले. आधुनिक कालखंडाला सुरुवात झाली.

## स्वाध्याय

**१. एका शब्दात लिहा.**

(१) इंदौरच्या राज्यकारभाची सूत्रे सांभाळणाऱ्या –

(२) नागपूरकर भोसले घराण्यातील सर्वांत कर्तबगार व पराक्रमी पुरुष –

(३) दिल्लीच्या गादीवर बादशाहाला पुनःस्थापना करणारे –

(४) दक्षिणेतील राजकारणाची सूत्रे सांभाळणारे –

**२. घटनाक्रम लिहा.**

(१) आष्टीची लढाई (२) मराठ्यांचे ओडिशावर प्रभुत्व (३) इंग्रजांनी पुण्यात युनियन जॅक फडकवला.

**३. लिहिते व्हा.**

(१) अहिल्याबाई होळकर यांनी केलेली कामे

(२) महादजी शिंदेंचा पराक्रम

(३) गुजरातमधील मराठी सत्ता

**४.** मराठी सत्ता संपुष्टात येण्यामागची कारणे–चर्चा करा.

**उपक्रम**

मराठी सत्तेच्या विस्तारासाठी योगदान देणाऱ्या घराण्यांच्या माहितीचा सचित्र संग्रह करा. त्याचे शाळेत प्रदर्शन भरवा.




शनिवारवाडा, पुणे

# १३. महाराष्ट्रातील समाजजीवन

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य हे रयतेचे राज्य होते. रयतेचे कल्याण व्हावे, लोकांवर जुलूम होऊ नये, महाराष्ट्र धर्माचे रक्षण व्हावे असा त्यांचा उदात्त हेतू होता. शिवाजी महाराजांनंतरच्या काळातही मराठी राज्याचा भारतभर विस्तार झाला. मराठ्यांची सत्ता सुमारे १५० वर्षे टिकून राहिली.

मराठी राज्याच्या कारभाराची माहिती आपण मागील पाठांत अभ्यासली. या पाठात आपण त्या काळातील सामाजिक स्थिती व लोकजीवन यांविषयी माहिती घेणार आहोत.

**सामाजिक परिस्थिती :** शेती आणि शेतीवर आधारित उद्योग हे उत्पादनाचे गावपातळीवरील प्रमुख साधन होते. गावच्या पाटलाकडे गावाचे संरक्षण, तर कुलकर्ण्याकडे महसूल सांभाळण्याची जबाबदारी असे. पाटिलकीच्या कामासाठी पाटलास जमीन इनाम दिलेली असे. त्याला या कामासाठी महसुलातील काही हिस्सा मिळत असे. बलुतेदारांना गावकीसाठी केलेल्या कामांचा मोबदला वस्तुरूपाने मिळत असे. खेड्यातील व्यवसायाचे काळी व पांढरी असे दोन प्रमुख भाग होते. काळीत काम करणारे ते शेतकरी आणि पांढरीत काम करणारे पांढरपेशी. गावगाड्यातील सर्व व्यवहार परस्पर समजुतीने करण्यावर भर असायचा. एकत्र कुटुंब पद्धतीवर भर होता.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

गावात लोहार, सुतार, कुंभार, सोनार इत्यादी बारा बलुतेदार असत. हे बलुतेदार गावकीची कामे करत.

**चालीरिती :** या काळात बालविवाहाची पद्धत रूढ होती. बहुपत्नित्वाची प्रथा होती. विधवांनी पुनर्विवाह केल्याची उदाहरणे आहेत. मानवी देहावर अंतिम संस्कार करण्याच्या दहन, दफन आणि विसर्जन पद्धती होत्या. छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी किंवा लढाईसाठी मुहूर्त पाहिला जायचा. स्वप्न, शकुन यांवर लोकांचा विश्वास होता. देव किंवा ग्रह यांचा कोप होऊ नये म्हणून अनुष्ठाने केली जायची. त्यासाठी दानधर्म केला जात असे. ज्योतिषावर लोकांचा विश्वास होता. शास्त्रीय दृष्टीचा अभाव आणि औषधोपचारापेक्षा नवसाला प्राधान्य होते.

**राहणीमान :** बहुसंख्य लोक खेड्यांत राहत होते. खेडी स्वयंपूर्ण असत. केवळ मीठ त्यांना इतर ठिकाणांहून मागवून घ्यावे लागत असे. शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या. शेतकरी ज्वारी, बाजरी, गहू, नाचणी, मका, तांदूळ इत्यादी धान्य पिकवत होते. रोजच्या जेवणात भाकरी, कांदा, चटणी आणि कोरड्यास यांचा समावेश असे. आपल्यातील व्यवहार ते वस्तुविनिमय पद्धतीने करत असत. गावातील घरे साधी, माती-विटांची असत. शहरात एकमजली वा दुमजली वाडे असायचे. श्रीमंतांच्या जेवणात भात, वरण, पोळ्या, भाज्या, कोशिंबिरी, दही-दुधाचे पदार्थ असत. धोतर, कुडते, अंगरखा, मुंडासे असा पुरुषांचा पोशाख तर लुगडी, चोळी असा स्त्रियांचा पोशाख असे.

**सण-समारंभ :** गुढीपाडवा, नागपंचमी, बैलपोळा, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, ईद इत्यादी सण-उत्सव लोक साजरे करत असत. पेशव्यांच्या काळात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा. तो घरगुती स्वरूपात साजरा व्हायचा. पेशवे स्वतः गणेशभक्त असल्याने त्याला महत्त्व आले. प्रतिवर्षी भाद्रपद चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत हा उत्सव चालत असे.

दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने तेव्हापासून शुभकार्याची सुरुवात लोक करायचे. या

दिवशी शस्त्रास्त्रांची पूजा करत. सीमोल्लंघन करत. एकमेकांना आपट्याची पाने देत. दसऱ्यानंतर मराठे मोहिमेवर निघत असत. दिवाळीत बलिप्रतिपदा आणि भाऊबीज विशेषकरून साजरी करत असत. खेड्यापाड्यांत जत्रा भरायच्या. जत्रेच्या वेळी कुस्त्यांचे फड भरत असत. गुढीपाडवा या दिवशी गुढी उभारून हा सण साजरा करायचे. उत्सवाच्या वेळी नाचगाणी, डफावरची गाणी, तमाशा इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम व्हायचे. तमाशा हा करमणूक प्रकार लोकप्रिय होता.



बैलपोळा

**शिक्षण :** या काळातील शिक्षणपद्धतीत पाठशाळा व मदरसा होत्या. लेखन, वाचन, हिशेबाचे शिक्षण घरातून मिळे. मोडी लिपीचा वापर व्यवहारात होत असे.

**दळणवळण–प्रवास :** घाटमार्ग, सडक, नद्यांवरील पूल या मार्गाने वाहतूक चालायची. धान्य, कापड, वाणसामान यांची वाहतूक बैलांच्या पाठीवरून होत असे. नदीतून जाण्यासाठी होड्यांचा वापर व्हायचा. पत्रांची ने-आण सांडणीस्वार व जासूद करायचे.

**खेळ :** या काळात विविध खेळ खेळले जायचे. खेळ करमणूक व मनोरंजनाचे साधन होते. कुस्ती, युद्धकला हे खेळ लोकप्रिय होते. मल्लखांब, दंड, कुस्ती, लाठी, दंडपट्टा, बोथाटी हे खेळ खेळले जात. हुतुतू, खोखो, आट्यापाट्या हे मैदानी खेळ तर सोंगट्या, गंजिफा, बुद्धिबळ हे बैठे खेळ लोकप्रिय होते.



मल्लखांब

**धर्म व आचार–विचार :** हिंदू व मुस्लिम असे दोन प्रमुख धर्म या काळात दिसून येतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण उदारतेचे होते. प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे वागावे, दुसऱ्यावर आपल्या धर्माची सक्ती करू नये, अशीच विचारधारा या काळात होती. पाठशाळा, देवळे, मदरसा आणि मशिदी यांना सरकारकडून देणग्या दिल्या जात असत. दोन्ही धर्मांचे अनुयायी एकमेकांच्या सणांमध्ये सहभागी होत असत. वारकरी, महानुभाव, दत्त, नाथ, रामदासी हे पंथ प्रचलित होते.

**स्त्रियांचे जीवन :** स्त्रियांचे या काळातील जीवन कष्टमय होते. माहेर आणि सासर एवढेच तिचे जग असायचे. त्यांच्या शिक्षणाकडे कोणीच लक्ष देत नसे. अपवादात्मक स्त्रियांनी अक्षरओळख, प्रशासन आणि युद्धकौशल्य यांत प्रगती केली होती. यांत वीरमाता जिजाबाई, येसूबाई, महाराणी ताराबाई, उमाबाई दाभाडे, गोपिकाबाई, पुण्यश्लोक अहिल्याबाई, यांचा समावेश होता. बालविवाह, विषमविवाह, वैधव्य, केशवपन, सती, बहुपत्नित्व या प्रथांनी स्त्रियांचे जीवन जखडून टाकले होते. एकंदरीत त्यांचे जगणे अत्यंत प्रतिकूल असे.

इ.स.१६३० ते १८१० या पावणे दोनशे वर्षांच्या कालखंडाला सामान्यपणे मराठेशाही म्हणतात. या कालखंडातील कला-स्थापत्याचा थोडक्यात आढावा आपण पाहूयात.

**शिल्पकला :** शिवकाळात कसबा गणपती मंदिर जीर्णोद्धार, लाल महाल उभारणी, राजगड व रायगडवरील बांधकामे, जलदुर्ग उभारणी या प्रकारचे स्थापत्य उभारणीचे उल्लेख येतात. हिरोजी इंदुलकर हा त्या काळातील प्रसिद्ध स्थापत्य विशारद होता.

गाव वसवताना शक्यतो काटकोनांतील रस्ते, कडेला दगडी बांधकाम, नदीपात्राच्या कडेला घाट अशी रचना करत. पेशवेकाळात अहमदनगर, विजापूरसारखी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुणे शहरात करण्यात आली होती. पेशव्यांनी भूमिगत नळ, छोटी-छोटी धरणे, बाग-बगीचे, हौद, कारंजी उभारली. पुणे शहराच्या जवळील हडपसर भागातील दिवे घाटातील मस्तानी तलाव स्थापत्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

पुण्यातील शनिवारवाडा, विश्रामबागवाडा, नाशिकचा सरकारवाडा, कोपरगावचा रघुनाथ पेशव्यांचा वाडा, सातारकर छत्रपतींचे वाडे, याशिवाय वाई, मेणवली, टोके, श्रीगोंदे, पंढरपूर येथील जुने वाडे मध्ययुगीन वाडा संस्कृतीची चिन्हे आहेत.

वाड्यांच्या बांधकामात कच्च्या व पक्क्या विटा वापरत. लाकडी खांब, तुळया, पाट, घडीव दगड, कमानी, उत्तम घोटलेला चुना, नळीच्या कौलांचे छप्पर, चिखल, बांबू यांचा वापर बांधकामात करत असत. वाड्यांच्या सजावटीसाठी चित्रकाम, रंगकाम, काष्ठशिल्प, आरसे यांचा वापर करत.

**मंदिरे :** शिवकाळातील मंदिरे यादवकालीन हेमाडपंती पद्धतीची आहेत. कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराचे शिखर, जोतिबाच्या डोंगरावरील मंदिरे, शिखरशिंगणापूरचा शंभू महादेव, वेरूळच्या घृष्णेश्वराचे मंदिर ही शिल्पशास्त्राची उत्तम उदाहरणे होत. प्रतापगडावर भवानी देवीचे व गोव्याला सप्तकोटेश्वराचे मंदिर शिवाजी महाराजांनी बांधले. पेशवेकाळात नाशिकचे काळाराम मंदिर, त्र्यंबकेश्वराचे शिवमंदिर, गोदावरी-प्रवरा या नद्यांच्या संगमावर असणाऱ्या कायगांव व टोके येथील शिवमंदिरे, नेवासे येथील मोहिनीराज मंदिर ही मंदिरे या काळात उभारली गेली.



घृष्णेश्वर मंदिर

**घाट :** नदी किंवा संगमाच्या ठिकाणी घडीव दगडी घाट मराठेशाहीचे एक वैशिष्ट्य आहे. या काळातील सर्वांत प्रेक्षणीय घाट गोदावरी व प्रवरा नदी यांच्या संगमावरील प्रवरा संगम, टोके येथील होय. पक्क्या बांधणीच्या पायऱ्यांच्या ओळीत, ठरावीक अंतरावर एक पायरी पुढे काढलेली असे. त्यामुळे सगळ्या घाटांचेच रूप खुलून जात असे. पाण्याच्या प्रवाहाने घाट निखळू नये म्हणून ठरावीक अंतरावर भक्कम बुरूज बांधत असत.

**चित्रकला :** पेशवाई काळात शनिवारवाड्याच्या भिंतींवरील चित्रे महत्त्वाची आहेत. या काळात राघो, तानाजी, अनुपराव, शिवराम, माणकोजी हे महत्त्वाचे चित्रकार होऊन गेले. सवाई माधवराव पेशव्यांच्या काळात गंगाराम तांबट हा प्रख्यात चित्रकार होता. पेशव्यांनी चित्रकलेला उत्तेजन दिले.

पेशवेकाळात पुणे, सातारा, मेणवली, नाशिक, चांदवड आणि निपाणी या भागांतील वाड्यांमध्ये भिंतींवर चित्रे होती. पांडेश्वर, मोरगाव, पाल, बेनवडी, पुण्याजवळील पाषाण या ठिकाणच्या मंदिरांच्या भिंतींवर चित्रे होती. या काळातील चित्रांचे विषय म्हणजे दशावतार, गणपती, शंकर, रामपंचायतन, विदर्भातील जामोद येथील जैन मंदिरातील जिन चरित्र, पौराणिक गोष्टी हे होत. रामायण, महाभारत, सण, उत्सव यांवर आधारित चित्रे असत. पोथ्यांवरील चित्रे, लघुचित्रे, व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रेही असत.

**शिल्प :** शिवकाळातील शिवाजी महाराजांच्या कर्नाटक स्वारीच्या वेळचे मल्लम्मा देसाई भेटीचे शिल्प, भुलेश्वर मंदिरावरील शिल्पकला, व्यक्तिशिल्पे, प्राण्यांची शिल्पे (उदा., हत्ती, मोर, माकडे), टोके येथील मंदिरातील शिल्पे व बाहेरील भागातील शिल्पकला, पुण्यातील त्रिशुंड गणपती मंदिर, मध्यप्रदेशातील अहिल्याबाई होळकर यांची छत्री, नेवासे येथील मोहिनीराज मंदिरातील शिल्पकला महत्त्वाची आहे.

**धातुमूर्ती :** पेशव्यांनी पुण्यातील पर्वती येथील मंदिरात पार्वती व गणपतीच्या मूर्ती पूजेसाठी तयार करून घेतल्या होत्या. त्याचबरोबर काष्ठशिल्पेसुद्धा तयार होत असत.

**वाङ्मय :** संतवाङ्मय, पौराणिक आख्याने, टीका वाङ्मय, ओवी, अभंग, ग्रंथ, कथाकाव्ये, चरित्रकथा, संतांची चरित्रे, स्फुट काव्यरचना, देव-देवतांच्या संदर्भातील आरत्या, पोवाडे, बखरी, ऐतिहासिक पत्रे हे वाङ्मयाचे महत्त्वाचे भाग होत.


**नाट्यकला :** दक्षिणेत तंजावर येथे मराठी नाटकांना सतराव्या शतकाच्या अखेरीपासून प्रारंभ झाला होता. सरफोजी राजांनी या कलेस प्रोत्साहन दिले. या नाटकात गायन व नर्तन यांना प्राधान्य असे.

आतापर्यंत आपण मध्ययुगातील कालखंडाचा आढावा घेतला. मराठ्यांच्या सत्तेचा उदय आणि विस्तार अभ्यासला. पुढील वर्षी आपण आधुनिक कालखंडाचा अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. तक्ता पूर्ण करा.**




**२.** समाजात कोणकोणत्या अनिष्ट चालीरिती प्रचलित आहेत ? त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवा.

**३.** तुमच्या परिसरात कोणकोणते सण व उत्सव साजरे केले जातात, याविषयी सविस्तर टिपण तयार करा.

**४. खालील मुद्द्यांच्या आधारे शिवकालीन समाजजीवन व सध्याचे समाजजीवन यांची तुलना करा.**

| क्र. | मुद्दे | शिवकालीन समाजजीवन | सध्याचे समाजजीवन |
|---|---|---|---|
| १. | व्यवहार | ........... | ............... |
| २. | घरे | ........... | पक्की बांधलेली सिमेंट, कॉंक्रीटची अनेक मजली घरे |
| ३. | दळणवळण | ........... | बस, रेल्वे, विमान |
| ४. | मनोरंजन | ........... | ........... |
| ५. | लिपी | ........... | ........... |

**उपक्रम**

आपल्या देशातील कर्तृत्ववान स्त्रियांविषयी माहिती मिळवा. त्याचे वर्गात वाचन करा. उदा., पी.व्ही. सिंधू, साक्षी मलिक

# नागरिकशास्त्र


## – अनुक्रमणिका –

### आपले संविधान



| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आपल्या संविधानाची ओळख ................ | ६३ |
| २. | संविधानाची उद्‌देशिका ...................... | ६८ |
| ३. | संविधानाची वैशिष्ट्ये ........................ | ७२ |
| ४. | मूलभूत हक्क भाग-१ ....................... | ७६ |
| ५. | मूलभूत हक्क भाग-२ ....................... | ८० |
| ६. | मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये ......... | ८३ |





# क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | संविधानाची ओळख | – संविधान सभेच्या कार्यपद्धतीत विरोधी मतांचा उचित आदर केला गेल्याचे समजून घेणे.<br>– संविधानाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाचे महत्त्व जाणणे.<br>– न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांच्या आधारे नव्या समाजाची निर्मिती करणे हे संविधानाचे उद्‌दिष्ट होते हे जाणणे.<br>– लोकशाही मूल्यांनुसार आचरण करणे. |
| २. | संविधानाची उद्‌देशिका | – संविधानाच्या उद्‌देशिकेतील मूल्ये मानवतावादी आहेत हे समजून घेणे.<br>– सार्वभौमत्व संकल्पना समजून घेणे.<br>– लोकशाहीत राज्यकारभाराची सत्ता लोकांच्या हाती असते हे जाणून घेणे.<br>– लोकशाहीत निर्णय चर्चा-विचारविनिमयांच्या आधारे सामूहिकरीत्या घेतले जातात हे समजून घेणे. |
| ३. | संविधानाची वैशिष्ट्ये | – संविधानाची वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>– लोकशाही शासनव्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>– संघराज्य व्यवस्थेत दोन पातळ्यांवर शासनसंस्था काम करतात हे माहीत करून घेणे. |
| ४. | मूलभूत हक्क | – संविधानात नमूद केलेल्या हक्कांना न्यायालयाचे विशेष संरक्षण असते हे जाणून घेणे.<br>– मूलभूत हक्क सर्व पातळ्यांवरील शासनसंस्थांना बंधनकारक असतात हे सांगता येणे.<br>– कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात ही जाणीव विकसित होणे.<br>– भारतातील धार्मिक विविधतेचा आदर करण्याची वृत्ती विकसित करणे.<br>– सर्व अल्पसंख्याकांना आपली भाषा, लिपी, साहित्य जतन करता येते हे जाणून घेणे.<br>– कोणत्याही व्यक्तीला विनाकारण बेकायदेशीर रीतीने अटक करून स्थानबद्ध करता येत नाही याविषयी माहिती करून घेणे. |
| ५. | मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये | – मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित झालेल्या कायद्यांची सूची करता येणे.<br>– मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयीन सरंक्षण नाही, परंतु ती शासनावर बंधनकारक आहेत हे समजून घेणे.<br>– राष्ट्रीय चिन्हांविषयी आदर बाळगण्याची भावना विकसित होणे.<br>– पर्यावरणाच्या रक्षणासाठी योग्य कृती करण्यात पुढाकार घेणे.<br>– स्त्रियांच्या प्रतिष्ठेचा आदर करण्याची वृत्ती जोपासणे.<br>– अंधश्रद्‌धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यास प्रवृत्त करणे.<br>– भारतीयत्वाची जाण विकसित होणे. |

# १. आपल्या संविधानाची ओळख

### चला, थोडी उजळणी करूया !

यामागील इयत्तांच्या नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमध्ये आपण नियमांच्या आवश्यकतेविषयीचे बरेच मुद्दे समजून घेतले. कुटुंब, शाळा, आपले गाव किंवा शहर यांचे व्यवहार सुरळीतपणे चालावेत म्हणून आपण संकेत व नियम पाळतो. कुटुंबात नियम नसतात, परंतु प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी कसे वागावे याविषयी काही संकेत असतात. शाळेत प्रवेशासंबंधी, गणवेश आणि अभ्यास यांविषयी नियम असतात. विविध स्पर्धांचेही नियम असतात. आपल्या गावाचा आणि शहराचा कारभारही नियमांनुसार चालतो. याचप्रमाणे आपल्या देशाचा कारभारही नियमांनुसारच चालतो. कुटुंब, शाळा, गाव अथवा शहरांसंबंधी असणारे नियम मर्यादित स्वरूपाचे असतात, परंतु देशाच्या कारभारासंबंधीचे नियम किंवा तरतुदी मात्र व्यापक असतात.

समीर आणि वंदनाला पडलेले प्रश्न तुम्हांला विचारावेसे वाटतात का ?

- देशाचा कारभार ज्या नियमांनुसार किंवा तरतुदींनुसार चालतो, ते नियम कुठे असतात ?
- ते नियम कोण तयार करते ? त्यांचे पालन बंधनकारक असते का ?

खालील मजकुरात तुम्हांला त्याची उत्तरे सापडतात का बघा.

### संविधान : अर्थ

देशाच्या कारभारासंबंधीच्या तरतुदी एकत्रितपणे व सुसूत्रपणे ज्या ग्रंथात नमूद केलेल्या असतात त्याला 'संविधान' असे म्हणतात. याचाच अर्थ संविधान म्हणजे देशाच्या राज्यकारभारासंबंधीच्या तरतुदींचा लिखित दस्तऐवज होय. जनतेकडून निवडून आलेल्या प्रतिनिधींमधून शासन किंवा सरकार स्थापन केले जाते. संविधानातील तरतुदींनुसारच राज्यकारभार करण्याचे शासनावर बंधन असते. संविधानातील तरतुदी किंवा त्यात नमूद केलेला कायदा मूलभूत असतो. संविधानास विसंगत ठरतील असे कायदे शासनाला करता येत नाहीत. असे केल्यास ते कायदे न्यायमंडळ रद्द ठरवू शकते.

### संविधानातील तरतुदी :

संविधानातील तरतुदी अनेकविध बाबींविषयी असतात. उदा., नागरिकत्व, नागरिकांचे हक्क, नागरिक आणि शासनसंस्था यांच्यातील संबंध, शासनाने करायच्या कायद्यांचे विषय, निवडणुका, शासनावरील मर्यादा व राज्याचे अधिकारक्षेत्र इत्यादी.

संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्त्व बहुतेक सर्वच देशांनी स्वीकारले आहे. असे असले तरी प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरूप वेगवेगळे असते. इतिहास, समाजरचना, संस्कृती, परंपरा इत्यादी बाबतींत देशादेशांमध्ये भिन्नता असते किंवा वेगळेपण असते. त्याचप्रमाणे राष्ट्रांच्या गरजा व उद्दिष्टेही भिन्न असू शकतात. त्यास अनुरूप असे संविधान निर्माण करण्याचा प्रयत्न ते ते राष्ट्र करते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिका, इंग्लंड या देशांचा राज्यकारभार संविधानानुसार चालतो, परंतु दोन्ही संविधानांमध्ये फरक आहे. उदा., अमेरिकेचे संविधान इ.स.१७८९ मध्ये अमलात आले. ते लिखित असून त्यात केवळ ७ कलमांचा समावेश आहे. परंतु २२५ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असूनही त्याच संविधानानुसार आजही अमेरिकेचा राज्यकारभार चालवला जातो.

इंग्लंड या देशाला अनेक शतकांचा इतिहास आहे. राज्यकारभाराविषयीचे नियम या देशात संकेत, रूढी, परंपरेच्या स्वरूपांत आढळतात. तरीपण त्यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. १२१५ साली झालेल्या मॅग्नाकार्टा करारापासून इंग्लंडचे संविधान विकसित होत गेले. काही लिखित नियमांचा समावेश असला तरी इंग्लंडचे संविधान प्रामुख्याने अलिखित आहे.



**चला, शोधू या !**

तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका देशाच्या संविधानाविषयी खालील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात माहिती मिळवा :

देशाचे नाव, संविधान निर्मितीचे वर्ष, संविधानाची दोन वैशिष्ट्ये.

**संविधानाची आवश्यकता :** संविधानात नमूद केलेल्या तरतुदींनुसार किंवा नियमांनुसार राज्यकारभार करण्याचे अनेक फायदे असतात.

- शासनाला नियमांच्या चौकटीत राहूनच राज्यकारभार करावा लागतो. त्यामुळे त्यांना मिळालेल्या अधिकाराचा किंवा सत्तेचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी असते.
- संविधानात नागरिकांचे हक्क व त्यांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख असतो. शासनाला ते हक्क हिरावून घेता येत नाहीत म्हणून नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित राहते.
- संविधानातील तरतुदींनुसार राज्यकारभार करणे म्हणजे कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासारखे आहे. कारण त्यात सत्तेच्या गैरवापराला किंवा मनमानी कारभाराला वाव नसतो.
- संविधानानुसार राज्यकारभार होत असल्याचे पाहून सामान्य माणसांचा शासनावरील विश्वास वाढतो. त्यातून ते सहभागाला उत्सुक होतात. सामान्य माणसांच्या वाढत्या सहभागामुळे लोकशाही अधिक मजबूत होते.
- संविधान त्या त्या देशासमोर काही राजकीय आदर्श ठेवते. त्या दिशेने वाटचाल करण्याचे बंधनही त्या राष्ट्रावर असते. त्यातून जागतिक शांतता व सुरक्षितता, मानवी हक्कांचे संवर्धन होण्यास पोषक वातावरण निर्माण होते.
- नागरिकांच्या कर्तव्याचा उल्लेख संविधानात असल्याने नागरिकांची जबाबदारीही निश्चित होते.

### राज्यकारभार म्हणजे काय ?

देशाच्या राज्यकारभारात कोणत्या बाबी सामावलेल्या असतात ?


देशाच्या सीमारेषांचे संरक्षण करणे, परकीय आक्रमणापासून जनतेचे रक्षण करणे इथपासून ते दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, शिक्षण व आरोग्य सेवा, उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन, दुर्बल घटकांचे संरक्षण, महिला, बालके व आदिवासींच्या प्रगतीसाठी उपाययोजना इत्यादी अनेक विषयांबाबत शासनाला कायदे करावे लागतात. कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे समाजात योग्य ते बदल घडवून आणावे लागतात. थोडक्यात सांगायचे झाल्यास आधुनिक काळातील शासनाला अवकाश संशोधनापासून ते सार्वजनिक स्वच्छतेपर्यंतच्या सर्व बाबींसंबंधी निर्णय घ्यावे लागतात. यालाच राज्यकारभार असे म्हणता येईल.

संविधानाचा अर्थ व त्याची आवश्यकता समजून घेतल्यानंतर आता आपण भारताच्या संविधानाची निर्मिती कशी झाली हे जाणून घेऊ.

**संविधान निर्मितीची पार्श्वभूमी :** भारताच्या संविधान निर्मितीला इ.स.१९४६ पासूनच सुरुवात झाली. स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यानुसार चालणार नाही तर तो भारतीयांनी स्वतः तयार केलेल्या कायद्यानुसार चालेल असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता. त्यानुसार भारताचे संविधान तयार करण्यासाठी

एक समिती स्थापन करण्यात आली. ती समिती 'संविधान सभा' म्हणून ओळखली जाते.

**संविधान सभा :** आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. तत्पूर्वी भारतावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रज सरकारने राज्यकारभाराच्या सोईसाठी मुंबई प्रांत, बंगाल प्रांत व मद्रास प्रांत यांसारखे विभाग पाडले होते. या प्रांतांमधील कारभार तेथील लोकप्रतिनिधींमार्फत चालवला जात होता. त्याचबरोबर देशातील काही भागांचा कारभार तेथील स्थानिक राजे पाहत होते. अशा भागांना संस्थाने म्हणत व त्यांचे प्रमुख संस्थानिक म्हणून ओळखले जात. संविधान सभेत प्रांत आणि संस्थानांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता.


डॉ.राजेंद्रप्रसाद

संविधान सभेत एकूण २९९ सदस्य होते. डॉ.राजेंद्रप्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांचा विविध देशांच्या संविधानाचा गाढा अभ्यास होता. त्यांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्यात आला. त्यावर कलमवार चर्चा झाली. अनेक दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्याचे, त्याविषयी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे, तसेच संविधान सभेच्या सूचनांनुसार मूळ मसुद्यात फेरबदल करण्याचे, प्रत्येक तरतूद निर्दोष करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारताच्या संविधान निर्मितीतील या योगदानामुळे त्यांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' म्हणतात.

संपूर्ण संविधान लिहून पूर्ण झाल्यानंतर संविधान सभेने त्यास मान्यता दिली व त्याचा स्वीकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी केला. म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० पासून संविधानातील तरतुदींनुसार

**किती अभिमानास्पद बाब आहे ही !**

- संविधान सभेत चर्चा व विचारविनिमयाच्या आधारे निर्णय घेण्यात आले. विरोधी मतांचा आदर व त्यांच्या योग्य सूचनांचा स्वीकार हे तेथील कामकाजाचे वैशिष्ट्य होते.
- संविधान लिहून पूर्ण करण्यासाठी २ वर्षे, ११ महिने आणि १७ दिवस इतका कालावधी लागला.
- मूळ संविधानात २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे यांचा समावेश होता.




**माहीत आहे का तुम्हांला ?**

संविधान सभेत डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू, जे.बी. कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता असे अनेक मान्यवर सदस्य होते. बी.एन.राव या कायदेतज्ज्ञाची संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती.

देशाचा राज्यकारभार चालवण्यास सुरुवात झाली. या दिवसापासून भारताचे प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.



पं.जवाहरलाल नेहरू



सरदार वल्लभभाई पटेल



मौलाना आझाद



सरोजिनी नायडू



**करून पहा.**

तुमच्या वर्गाचा कारभार नियमांनुसार चालावा असे तुम्हांला वाटते ना ? त्यात कोणत्या नियमांचा तुम्ही समावेश कराल ? तर मग वर्गासाठी एक नियमावली तयार करा.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान जलव्यवस्थापन, परराष्ट्र संबंध, राष्ट्रीय सुरक्षा, पत्रकारिता, अर्थकारण, सामाजिक न्याय अशा विविध क्षेत्रांत होते.



भारतीय संविधानाचा मसुदा संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांना सादर करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## स्वाध्याय

**१. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) संविधानातील तरतुदी

(२) संविधान दिन

**२. चर्चा करा.**

(१) संविधान समितीची स्थापना केली गेली.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

(३) देशाच्या राज्यकारभारात समाविष्ट असणाऱ्या बाबी.

**३. योग्य पर्याय निवडा.**

(१) कोणत्या देशाचे संविधान पूर्णतः लिखित नाही ?

(अ) अमेरिका (ब) भारत

(क) इंग्लंड (ड) यांपैकी नाही.

(२) संविधान सभेचे अध्यक्ष कोण होते ?

(अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(ब) डॉ.राजेंद्रप्रसाद

(क) दुर्गाबाई देशमुख

(ड) बी.एन.राव

(३) खालीलपैकी कोण संविधान सभेचे सदस्य नव्हते ?

(अ) महात्मा गांधी

(ब) मौलाना आझाद

(क) राजकुमारी अमृत कौर

(ड) हंसाबेन मेहता

(४) मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(अ) डॉ. राजेंद्रप्रसाद

(ब) सरदार वल्लभभाई पटेल

(क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(ड) जे.बी.कृपलानी

**४. तुमचे मत लिहा.**

(१) शासनाला कोणकोणत्या विषयांवर कायदे करावे लागतात ?

(२) २६ जानेवारी हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून का साजरा करतो ?

(३) संविधानातील तरतुदींनुसार राज्यकारभार करण्याचे फायदे.

**उपक्रम**

(१) संविधान सभेसाठी विविध समित्यांची स्थापना झाली. त्यांच्याविषयी माहिती मिळवा व समित्यांच्या नावांचा तक्ता तयार करा आणि नावांसह चित्रांचा संग्रह करा.

(२) 'संविधान दिन' शाळेत कसा साजरा झाला त्याचा अहवाल तयार करा.

(३) संविधान सभेतील सदस्यांच्या फोटोंचा संग्रह करा.

# २. संविधानाची उद्देशिका

**मागील पाठात आपण काय शिकलो बरे !**

- संविधान म्हणजे राज्यकारभाराचे नियम स्पष्ट करणारा एक महत्त्वाचा दस्तऐवज असतो.
- संविधान सभेने भारताच्या संविधानाची निर्मिती केली.
- संविधानामुळे आपल्या लोकप्रतिनिधींना कायद्यानुसारच राज्याचे व्यवहार करावे लागतात.

संविधान हा आपल्या देशाचा मूलभूत आणि सर्वश्रेष्ठ कायदा आहे. कोणताही कायदा करण्यामागे काही निश्चित उद्दिष्टे किंवा हेतू असतात. ती उद्दिष्टे किंवा हेतू स्पष्ट केल्यानंतर सविस्तरपणे कायद्यातील अन्य तरतुदी केल्या जातात. त्यांची एकत्रितपणे थोडक्यात व सुसंगत रीतीने केलेली मांडणी म्हणजे प्रस्तावना होय. या प्रस्तावनेला उद्देशिका असे म्हणतात. उद्देशिकेलाच भारतीय संविधानाची 'प्रास्ताविका' किंवा 'सरनामा' असेही म्हटले जाते. उद्देशिका ही आपल्या संविधानाची उद्दिष्टे स्पष्ट करते.



**करून पहा.**

संविधानाची उद्देशिका वाचा. त्यातील शब्दांची सूची तयार करा. हे शब्द तुम्ही इतरत्र कोठे वाचता ?

आपण सर्व भारताचे नागरिक आहोत. आपणा सर्वांना एक देश म्हणून काय मिळवायचे आहे हे उद्देशिका सांगते. यातील मूल्ये, विचार आणि हेतू उदात्त आहेत. ते कसे प्राप्त करायचे याविषयीच्या तरतुदी संपूर्ण संविधानातून स्पष्ट केल्या आहेत.

संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी होते. भारताचे एक 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य' निर्माण करण्याच्या भारतीयांच्या निर्धाराविषयी त्यात सांगितले आहे. त्यातील प्रत्येक संज्ञेचा अर्थ आपण समजून घेऊ.

**(१) सार्वभौम राज्य :** भारतावर बराच काळ ब्रिटिशांची राजवट होती. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ही राजवट संपली. आपला देश स्वतंत्र झाला. भारताला सार्वभौमत्व प्राप्त झाले. आपण आपल्या देशात योग्य वाटतील असे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहोत. एखादे राज्य परकीय नियंत्रणाखाली नसणे असा सार्वभौम या शब्दाचा अर्थ आहे.

आपल्या संपूर्ण स्वातंत्र्यलढ्याचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट सार्वभौमत्व प्राप्त करणे हे होते. सार्वभौमत्व म्हणजे राज्यकारभार करण्याचा सर्वश्रेष्ठ अधिकार होय. लोकशाहीत सार्वभौमत्व हे जनतेच्या हाती असते. जनता आपले प्रतिनिधी निवडून देऊन त्यांना त्यांचे सार्वभौम अधिकार वापरण्याची परवानगी देते. आपल्या देशाच्या अंतर्गत कोणते कायदे करावेत हे ठरवण्याचा अधिकार जनतेला व जनतेने निवडून दिलेल्या शासनसंस्थेला असतो.

**(२) समाजवादी राज्य :** समाजवादी राज्य म्हणजे असे राज्य जिथे गरीब-श्रीमंत यांच्यात मोठी दरी नसते. देशाच्या संपत्तीवर सर्वांचा हक्क असतो. संपत्तीचे केंद्रीकरण काही लोकांच्याच हाती होणार नाही याची काळजी घेतली जाते.

**(३) धर्मनिरपेक्ष राज्य :** उद्देशिकेने धर्मनिरपेक्षता हे आपले उद्दिष्ट असल्याचे सांगितले आहे. धर्मनिरपेक्ष राज्यात सर्व धर्मांना समान मानले जाते.

कोणत्याही एकाच धर्माला राज्याचा धर्म मानला जात नाही. नागरिकांना आपापल्या धर्माचे पालन करण्याची मुभा असते. नागरिकांमध्ये धर्माच्या आधारावर भेदभाव करता येत नाही.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

धर्मनिरपेक्षतेच्या मार्गाने आपण आपल्या समाजाची बहुधार्मिकता जपण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला संविधानाने जे अनेक हक्क दिले आहेत, त्यांचा आपल्याला अमर्याद किंवा हवा तसा वापर करता येत नाही. धार्मिक स्वातंत्र्याचेही तसेच आहे. आपण जेव्हा सण, उत्सव साजरे करतो, तेव्हा आपल्याला सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण यांचा विचार करणेही आवश्यक असते.

**(४) लोकशाही राज्य :** लोकशाहीत राज्यकारभाराची सत्ता लोकांच्या हाती असते. त्यांच्या इच्छेनुसार सरकार निर्णय घेते आणि धोरणे आखते. शासनाला सर्वांच्या कल्याणासाठी महत्त्वाचे आर्थिक, सामाजिक असे निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय रोजच्या रोज सर्व लोकांना एकत्र येऊन घेणे शक्य नसते. म्हणून ठरावीक काळानंतर निवडणुका होतात. या निवडणुकांमध्ये मतदार मत देऊन आपले प्रतिनिधी निवडतात. निवडून आलेले प्रतिनिधी संविधानाने निर्माण केलेल्या संसद, कार्यकारी मंडळ अशा संस्थांमध्ये जातात. संविधानानेच नमूद केलेल्या किंवा सांगितलेल्या प्रक्रियेने संपूर्ण जनतेसाठी निर्णय घेतात.

**(५) गणराज्य :** आपल्या देशात लोकशाहीबरोबर गणराज्य पद्धती आहे. गणराज्यात सर्व सार्वजनिक पदे लोकांकडून निवडून दिली जातात. कोणतेही सार्वजनिक पद वंशपरंपरेने येत नाही.

राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, महापौर, सरपंच यांसारखी पदे सार्वजनिक असतात. त्या पदांवर विशिष्ट वयाची अट पूर्ण करणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला निवडणूक लढवून जाता येते. राजसत्ताक पद्धतीत ही पदे वंशपरंपरेने एकाच कुटुंबातील व्यक्तींकडे जातात.

**चर्चा करा.**

'माझे कुटुंब' यावर दीपाने काय लिहिले आहे हे वाचा.

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नाहीत. माझे आई-बाबा घरातले सगळे काम एकत्रितपणे करतात. त्यात आमचाही वाटा असतो. परस्परांशी बोलताना आम्ही शक्यतो न भांडता बोलतो. भांडलो तरी लवकरच ते मिटवून परस्परांचे म्हणणे ऐकून घेतो. आजी-आजोबांनाही कोणताही बदल करायचा असेल तर विचारले जाते. अनुजाला शेतीच्या अभ्यासात संशोधन करायचे आहे. तिचा निर्णय सर्वांना आवडला.

दीपाच्या घरात लोकशाही पद्धत आहे, असे तुम्हांला वाटते का ? लोकशाहीची कोणती वैशिष्ट्ये या परिच्छेदात आढळतात ?

उद्देशिकेने सर्व भारतीय नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य व समता या तीन मूल्यांची व त्यानुसार व्यवहार करण्याची, कायदे करून ती मूल्ये प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याची हमी दिली आहे. या मूल्यांचा अर्थ आपण समजून घेऊ.

**(१) न्याय :** अन्याय दूर करून सर्वांना आपल्या प्रगतीची संधी मिळवून देणे म्हणजे न्याय होय. सर्व लोकांचे कल्याण होईल या दृष्टीने उपाययोजना करणे म्हणजे न्याय प्रस्थापित करणे होय. उद्देशिकेमध्ये न्यायाचे तीन प्रकार सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

**(अ) सामाजिक न्याय :** व्यक्तींमध्ये जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, जन्मस्थान अथवा लिंग यांवर आधारित कोणताही भेदभाव करू नये. सर्वांचा दर्जा माणूस म्हणून सारखाच असतो.

**(ब) आर्थिक न्याय :** भूक, उपासमार, कुपोषण या बाबी गरिबीमुळे किंवा दारिद्र्यामुळे निर्माण होतात. गरिबी दूर करायची असेल तर प्रत्येकाला आपले व कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी

उपजीविकेचे साधन मिळवण्याचा हक्क आहे. आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला हा अधिकार कोणत्याही भेदभावाशिवाय दिला आहे.

**(क) राजकीय न्याय :** राज्यकारभारात भाग घेण्याचा सर्वांना समान हक्क असावा म्हणून आपण प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली आहे. त्यानुसार वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व नागरिकांना मत देण्याचा अधिकार आहे.

**(२) स्वातंत्र्य :** स्वातंत्र्य म्हणजे आपल्यावर जाचक, अयोग्य निर्बंध नसणे, आपल्यातील क्षमतांचा विकास करण्यास पोषक वातावरण असणे होय. लोकशाहीत नागरिकांना स्वातंत्र्य असते, स्वातंत्र्य असेल तरच लोकशाही प्रगल्भ होते.

विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे व्यक्तींचे मूलभूत स्वातंत्र्य आहे. प्रत्येकाला आपले मत व विचार व्यक्त करता येतात. विचारांच्या देवाणघेवाणीने आपल्यातील सहकार्य आणि एकोपा वाढतो व त्याचबरोबर एखाद्या समस्येच्या अनेक बाजूही आपल्याला समजतात.

श्रद्धा, समजुती व उपासनेच्या स्वातंत्र्यातून प्रामुख्याने धार्मिक स्वातंत्र्य व्यक्त होते. आपल्या धर्माच्या किंवा आपल्या पसंतीच्या धर्माच्या शिकवणुकीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकाला आहे. आपले सण-उत्सव साजरे करण्याचे, श्रद्धास्थाने बाळगण्याचे व उपासनेचे स्वातंत्र्य यात अभिप्रेत आहे.

**(३) समता :** उद्देशिकेने भारतीय नागरिकांना दर्जा आणि संधी याबाबतीत समतेची हमी दिली आहे.

जात, धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादींवर आधारित भेदभाव न करता माणूस म्हणून सर्वांचा दर्जा समान असेल, असा याचा अर्थ आहे. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद न करणे म्हणजे समान दर्जाची हमी देणे होय. उद्देशिकेने 'संधीची समानता' महत्त्वाची मानली आहे. आपल्या विकासाच्या संधी सर्वांना प्राप्त होतील, त्या उपलब्ध करून देताना कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

**चर्चा करा.**

स्वातंत्र्यासंबंधी काही विधाने खाली दिली आहेत. त्यावर चर्चा करा.

- ☐ सण-उत्सव सार्वजनिकरीत्या साजरे करताना काही नियम पाळावे लागतात. त्यामुळे आपल्या स्वातंत्र्यावर बंधन येत नाही.
- ☐ स्वातंत्र्य म्हणजे मनाला येईल तसे वागणे नाही तर जबाबदारीने वागणे होय.

संविधानाच्या उद्देशिकेत एका अगदी वेगळ्या आदर्शाचा किंवा तत्त्वाचा उल्लेख केला आहे. तो आदर्श किंवा ते तत्त्व म्हणजे बंधुभावाची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आणि व्यक्तीची प्रतिष्ठा जपण्याची हमी होय.

**बंधुता :** संविधानकारांना असे वाटत होते, की केवळ न्यायाची, स्वातंत्र्याची आणि समतेची हमी देऊन भारतीय समाजात समता निर्माण होणार नाही. त्यासाठी कितीही कायदे केले तरी जोपर्यंत भारतीयांमध्ये बंधुता असणार नाही, तोपर्यंत या कायद्यांचा उपयोग होणार नाही. म्हणूनच बंधुभावाची निर्मिती हे उद्दिष्ट उद्देशिकेत समाविष्ट केले आहे. बंधुता असणे म्हणजे आपल्या देशातील सर्व नागरिकांविषयी आणि परस्परांविषयी आत्मीयतेची भावना असणे. बंधुभाव परस्परांबद्दल सहानुभूतीची भावना निर्माण करतो. एकमेकांच्या समस्यांबाबत लोक संवेदनशीलतेने विचार करतात.

बंधुभाव आणि व्यक्तिप्रतिष्ठा यांचा निकटचा संबंध आहे. व्यक्तिप्रतिष्ठा म्हणजे प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून सन्मान असतो. तो जात, धर्म, वंश, लिंग, भाषा इत्यादी बाबींवर ठरत नाही. आपल्याला ज्याप्रमाणे इतरांनी आदराने आणि सन्मानाने वागवावे असे वाटते, तसाच आदर आणि सन्मान आपण अन्य व्यक्तींचा केला पाहिजे.

जेव्हा प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा आदर करून तिच्या स्वातंत्र्य व हक्काचा सन्मान करेल, तेव्हा आपोआप व्यक्तिप्रतिष्ठा निर्माण होईल. अशा वातावरणात बंधुभावही सहजरीत्या वाढीस लागेल. न्याय व समतेवर आधारलेल्या नव्या समाजाच्या निर्मितीचे कामही अधिक सोपे होईल. भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेतून याचे मार्गदर्शन प्राप्त होते.

भारताच्या जनतेने हे संविधान स्वतःस अर्पण केले आहे या उल्लेखाने उद्देशिकेचा शेवट होतो.



## स्वाध्याय

**१. शोधा आणि लिहा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| धु | ध | र्म | नि | र | पे | क्ष |
| स | स | र | आ | ना | भा | लो |
| र | बं | धु | भा | व | क | क्ष |
| ना | भा | व | धु | शा | क्ष | नि |
| मा | मा | लो | ही | य | ए | र |

(१) देशातील सर्व नागरिकांविषयी आणि परस्परांविषयी आत्मीयतेची भावना असणे.
(२) राज्यकारभाराची सत्ता लोकांच्या हाती असणे.
(३) उद्देशिकेलाच म्हटले जाते.
(४) सर्व धर्मांना समान मानणे.

**२. लिहिते होऊया.**

(१) धर्मनिरपेक्ष राज्यात कोणत्या तरतुदी असतात ?
(२) प्रौढ मतदान पद्धती म्हणजे काय ?
(३) आर्थिक न्यायामुळे नागरिकांना कोणते हक्क मिळतात ?
(४) समाजात व्यक्तिप्रतिष्ठा कशी निर्माण होईल ?

**३.** आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग आपण कशाप्रकारे केला पाहिजे, तुमचे मत लिहा/सांगा.

**४. संकल्पना स्पष्ट करा.**

(१) समाजवादी राज्य –
(२) समता –
(३) सार्वभौम राज्य –
(४) संधीची समानता –

**५.** भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत कोणकोणत्या महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख केला आहे ?

**उपक्रम**

(१) शिक्षकांच्या मदतीने मतदानपत्रिका आणि मतदानयंत्र (EVM) समजावून घेण्यासाठी तहसील कार्यालयास भेट द्या.
(२) तुमच्या परिसरातील वर्तमानपत्रांच्या नावांची यादी करा.

# ३. संविधानाची वैशिष्ट्ये

मागील दोन पाठांत आपण भारताच्या संविधानाची निर्मिती कशी झाली याचा आणि संविधानाच्या उद्देशिकेचा अभ्यास केला. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही, गणराज्य या संज्ञा समजून घेतल्या. उद्देशिकेत नमूद केलेली ही उद्दिष्टे आपल्या संविधानाची वैशिष्ट्येही आहेत. याव्यतिरिक्त संविधानाची आणखी कोणती वैशिष्ट्ये आहेत हे आपण या पाठात समजून घेणार आहोत.


**संघराज्य :** संघराज्य व्यवस्था हे आपल्या संविधानाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मोठा भूप्रदेश आणि खूप लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये राज्य करण्याची संघराज्य ही एक पद्धती आहे. मोठा भूप्रदेश असल्यास एकाच ठिकाणाहून राज्यकारभार करणे अवघड असते, दूरवरच्या प्रदेशांकडे दुर्लक्ष होते. तेथील लोकांना राज्यकारभारात सहभाग घेण्याची संधी मिळत नाही. म्हणून संघराज्यात दोन स्तरांवर शासनसंस्था असतात. संपूर्ण देशाचे संरक्षण करणे, परराष्ट्रांशी व्यवहार करणे, शांतता प्रस्थापित करणे इत्यादी कामे मध्यवर्ती शासन पार पाडते. त्याला 'केंद्रशासन' किंवा 'संघशासन' असेही म्हणतात. संघशासन संपूर्ण देशाचा राज्यकारभार करते.

आपण ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशाचा कारभार पाहणाऱ्या शासनाला 'राज्यशासन' असे म्हणतात. राज्यशासन हे एका मर्यादित प्रदेशाचा राज्यकारभार पाहते. उदा., महाराष्ट्र राज्यशासन.

दोन पातळ्यांवर वेगवेगळ्या विषयांवर कायदे करून परस्पर सहकार्याने राज्यकारभार करण्याच्या या पद्धतीला 'संघराज्य' म्हणतात.

**अधिकार विभागणी :** संघशासन व राज्यशासन यांच्यात संविधानाने अधिकार वाटून दिले आहेत. त्यानुसार कोणत्या विषयाचे अधिकार कोणाकडे आहेत, ते पाहू. आपल्या संविधानाने तीन सूची तयार केल्या व त्यांत विविध विषय नमूद केले आहेत.

पहिल्या सूचीला 'संघसूची' म्हणतात. त्यात ९७ विषय असून या विषयांवर संघशासन कायदा करते. राज्यशासनासाठी 'राज्यसूची' असून त्यात ६६ विषय आहेत. या विषयांवर राज्यशासन कायदे करते. या दोन सूचींव्यतिरिक्त तिसरी एक 'समवर्ती सूची' असून त्यात ४७ विषय आहेत. दोन्ही शासनांना या सूचीतील विषयांवर कायदे करता येतात. या तीन सूचींमधील विषयांव्यतिरिक्त एखादा विषय नव्याने निर्माण झाल्यास त्यावर कायदा करण्याचा अधिकार संघशासनाला असतो. हा अधिकार 'शेषाधिकार' म्हणून ओळखला जातो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतीय संघराज्यातील अधिकारांचे वाटप किंवा विभागणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. संघशासन व राज्यशासन यांना परस्परांशी सहकार्य करून देशाचा विकास साधता येणे यामुळे शक्य होते. राज्यकारभारात नागरिकांच्या सहभागाला या पद्धतीत प्रोत्साहन मिळते.

**कोणते विषय कोणाकडे आहेत –**

**(१) संघशासनाकडील विषय :** संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, युद्ध व शांतता, चलन व्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी.

**(२) राज्यशासनाकडील विषय :** शेती, कायदा व सुव्यवस्था, स्थानिक शासन, आरोग्य, तुरुंग प्रशासन इत्यादी.

**(३) दोन्ही शासनांसाठी असणारे विषय :** रोजगार, पर्यावरण, आर्थिक व सामाजिक नियोजन, व्यक्तिगत कायदा, शिक्षण इत्यादी.

**केंद्रशासित प्रदेश/संघशासित प्रदेश :** भारतात एक संघशासन, २९ राज्यशासन किंवा घटकराज्ये

आणि ७ संघशासित प्रदेश आहेत. संघशासित प्रदेशांवर संघशासनाचे नियंत्रण असते. नवी दिल्ली, दमण-दीव, पुदुच्चेरी, चंदीगढ, दादरा-नगर हवेली, अंदमान-निकोबार, लक्षद्वीप हे संघशासित प्रदेश आहेत.

**करून पहा.**

ईशान्येकडील राज्यांची सूची तयार करा. तेथील राज्यांच्या राजधानीची शहरे कोणती ?

**संसदीय शासनपद्धती :** भारताच्या संविधानाने संसदीय शासनपद्धतीविषयी तरतूद केली आहे. संसदीय शासनपद्धती म्हणजे राज्यकारभाराची अशी एक पद्धत की जिथे संसदेला म्हणजेच कायदेमंडळाला निर्णय घेण्याचे सर्वश्रेष्ठ अधिकार असतात. भारताच्या संसदेत राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश असतो. प्रत्यक्ष राजकारभार करणारे मंत्रिमंडळ लोकसभेतून निर्माण होते व ते आपल्या कामगिरीसाठी लोकसभेला जबाबदार असते. संसदीय शासनपद्धतीत संसदेत होणाऱ्या चर्चा, विचार-विनिमयांना महत्त्व असते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**




चलनी नोट

तुम्ही चलनी नोटा पाहिल्यात ना ? त्यावर 'केंद्रीय सरकार द्वारा प्रत्याभूत' असे लिहिलेले असते.

पोलिसांच्या खांद्यावरील बिल्ला तुम्ही पाहिला असल्यास त्यावर लिहिलेले दिसते, 'महाराष्ट्र पोलीस'.

'भारतीय रेल' आणि 'महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ' असेही तुम्ही वाचले असेल.

याचा अर्थ आपल्या देशात दोन पातळींवर सरकारे आहेत. एक भारत सरकार आणि दुसरे राज्यसरकार उदा., महाराष्ट्र सरकार, कर्नाटक सरकार इत्यादी.

महाराष्ट्र पोलीस बोधचिन्ह

भारतीय रेल बोधचिन्ह

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बोधचिन्ह

**स्वतंत्र न्यायव्यवस्था :** भारताच्या संविधानाने स्वतंत्र न्यायव्यवस्थेची निर्मिती केली आहे. वादग्रस्त प्रश्नांची जेव्हा आपापसात सोडवणूक होऊ शकत नाही तेव्हा ते न्यायालयाला सादर केले जातात. न्यायालय दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन, त्यात अन्याय झालेला असल्यास तो दूर करून निवाडा करते. हे काम निरपेक्षतेने होणे आवश्यक असते.

न्यायालयावर कोणताही दबाव येऊ नये म्हणून संविधानाने न्यायमंडळ अधिकाधिक स्वतंत्र ठेवण्यासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. उदा., न्यायाधीशांची नेमणूक शासनातर्फे होत नाही तर राष्ट्रपतींकडून होते. न्यायाधीशांना सहजपणे पदावरून दूर करता येत नाही.

**एकेरी नागरिकत्व :** भारताच्या संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना एकच नागरिकत्व बहाल केले आहे. ते म्हणजे 'भारतीय' नागरिकत्व होय.

**संविधानातील बदलाची पद्धती :** संविधानात नमूद केलेल्या तरतुदींमध्ये परिस्थितीनुसार बदल किंवा दुरुस्ती करावी लागते. परंतु संविधानात वारंवार दुरुस्ती केल्यास अस्थैर्य निर्माण होऊ शकते. म्हणून कोणताही बदल करताना तो पूर्ण विचारांती व्हावा यासाठी भारताच्या संविधानातच संविधानातील



बदलाची संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट केली आहे. संविधानात कोणताही बदल करायचा झाल्यास तो याच प्रक्रियेने करावा लागतो. संविधानातील बदलाची ही प्रक्रिया अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती फार कठीणही नाही आणि अति सोपीही नाही. महत्त्वाच्या दुरुस्तीसाठी विचारविनिमयाला यात पुरेसा वाव देण्यात आला आहे. सर्वसाधारण दुरुस्ती सहजपणे होईल इतकी लवचीकताही या प्रक्रियेत आहे.

**शोधा !**

आत्तापर्यंत भारतीय संविधानात किती वेळा दुरुस्ती झाली आहे ?

**निवडणूक आयोग :** निवडणूक आयोगाविषयी वर्तमानपत्रातील मजकूर तुम्ही नेहमी वाचत असाल. भारताने लोकशाही शासनव्यवस्था स्वीकारलेली असल्याने जनतेला ठरावीक मुदतीनंतर आपले प्रतिनिधी पुन्हा नव्याने निवडून द्यायचे असतात. त्यासाठी निवडणुका घ्याव्या लागतात. या निवडणुका खुल्या आणि न्याय्य वातावरणात होणे आवश्यक असते. तेव्हाच नागरिकांना कोणत्याही दबावाशिवाय



**सांगा पाहू !**

सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त कोण ?
निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय ?
मतदारसंघ म्हणजे काय ?

आपल्याला योग्य वाटेल अशा उमेदवाराला निवडून देता येते. शासनाने निवडणुका घेतल्यास असे खुले आणि न्याय्य वातावरण मिळेल याची खात्री नसते. म्हणून आपल्या संविधानाने निवडणुका घेण्याची जबाबदारी एका स्वतंत्र यंत्रणेवर सोपवली आहे. ती यंत्रणा म्हणजे 'निवडणूक आयोग' होय. भारतातल्या सर्व महत्त्वाच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते.

भारतीय संविधानाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. या पाठात आपण त्यांपैकी काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचाच अभ्यास केला आहे. मूलभूत हक्कांविषयीच्या विस्तृत तरतुदी हे आपल्या संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्याचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. संघराज्य शासनपद्धतीनुरूप अधिकारांची विभागणी कशाप्रकारे केली आहे याची सूची खालील तक्त्यात तयार करा.**

| संघराज्य शासन | राज्यशासन | दोन्ही शासनांकडे असणारे विषय |
|---|---|---|
| (१) ______ | (१) ______ | (१) ______ |
| (२) ______ | (२) ______ | (२) ______ |
| (३) ______ | (३) ______ | (३) ______ |

**२. योग्य शब्द लिहा.**

(१) संपूर्ण देशाचा राज्यकारभार करणारी यंत्रणा –
(२) निवडणुका घेणारी यंत्रणा –
(३) दोन सूचींव्यतिरिक्त असलेली सूची –

**३. लिहिते व्हा.**

(१) संघराज्यात दोन स्तरांवर शासनसंस्था असतात.
(२) शेषाधिकार म्हणजे काय?
(३) संविधानाने न्यायमंडळ स्वतंत्र ठेवले आहे.

**४. स्वतंत्र न्यायव्यवस्थेचे फायदे व तोटे या विषयावर वर्गात गटचर्चेचे आयोजन करा.**

**५. इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्र (EVM) वापरल्यामुळे कोणते फायदे होतात, याची माहिती मिळवा.**

**उपक्रम**

वर्गात निवडणूक आयोगाची स्थापना करा. त्या निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली वर्गाची निवडणूक घ्या.

# ४. मूलभूत हक्क भाग-१




**चला, शोधूया.**

* बालकांचे हक्क तुम्हांला माहीत असतील. त्यांचे महत्त्वाचे दोन हक्क तुम्ही सांगू शकाल का ?
* महिलांचे हक्क, आदिवासींचे हक्क, शेतकऱ्यांचे हक्क अशा संज्ञाही आपल्याला माहीत आहेत. या हक्कांच्या संदर्भात आपणा सर्वांनाच काही प्रश्न पडले आहेत.
* हक्कांचा उपयोग काय असतो ? ते कोणी द्यायचे असतात ?
* हक्क काढून घेता येतात का ?
* तसे झाल्यास त्याविरुद्ध कोठे जाऊन दाद मागायची ?

वर्तमानपत्रात अथवा अन्यत्र तुम्ही अशा स्वरूपाचे फलक पाहिले असतील. एखाद्या मोर्च्यात कशाची तरी मागणी केलेली असते व तो त्यांचा हक्क असल्याचे सांगितले जाते.

आपल्याला जन्मतःच हक्क प्राप्त होतात. जन्मलेल्या प्रत्येक बालकाला जगण्याचा हक्क असतो. त्याला उत्तम आरोग्य मिळावे म्हणून संपूर्ण समाज आणि शासन प्रयत्न करते. अन्याय, शोषण, भेदभाव, वंचितता यांपासून जर सर्व व्यक्तींना संरक्षण मिळाले तरच व्यक्ती आपल्यातील गुणांचा आणि कौशल्यांचा विकास करू शकतील. स्वतःच्या आणि संपूर्ण लोकसमूहाच्या विकासासाठी पोषक परिस्थितीची मागणी करणे, त्यासाठी आग्रह धरणे म्हणजे हक्क मागणे होय.

संविधानाने अशी पोषक परिस्थिती निर्माण करण्यासाठी भारतातील सर्व नागरिकांना समान हक्क

दिले आहेत. हे हक्क मूलभूत आहेत. ते संविधानात नमूद केलेले असल्याने त्यांना कायद्याचा दर्जा आहे. या हक्कांचे पालन सर्वांना बंधनकारक आहे.

**कल्पना करा आणि लिहा.**

कुत्रा, मांजर, गाय, म्हैस, शेळी यांसारखे प्राणी तुम्ही पाळत असाल. तुम्ही त्यांची खूप काळजी घेता, त्यांच्यावर खूप प्रेम करता.

या प्राण्यांना बोलता आले असते, तर त्यांनी तुमच्याकडून कोणते हक्क मागितले असते ?

**संविधानात नमूद केलेले आपले हक्क :** संविधानात भारतीय नागरिकांच्या हक्कांची नोंद आहे. हे हक्क कोणते आहेत ते पाहूया.


**समानतेचा हक्क :** समानतेच्या हक्कानुसार राज्याला भारतीय नागरिकांमध्ये उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष असा भेद करून कोणालाच वेगळी वागणूक देता येत नाही. कायदा सर्वांसाठी सारखाच असतो. अनेक कायदे असे असतात, की जे आपल्याला संरक्षण देतात. उदा., विनाचौकशी अटक करण्यापासून आपल्याला संरक्षण असते. असे संरक्षण देतानाही शासनाला भेदभाव करता येत नाही.



**चला, चर्चा करूया.**

सर्वांना कायद्यापुढे सारखेच मानणे व सर्वांना कायद्याचे सारखेच संरक्षण देणे याचे फायदे कोणते ?

समानतेच्या हक्कात आणखी कोणत्या बाबी येतात ? सरकारी नोकऱ्या देताना शासनाला जात, धर्म, लिंग, जन्मस्थान यांवर आधारित भेदभाव करता येत नाही. आपल्या देशातील अस्पृश्यता पाळण्याच्या अमानवी प्रथेला कायद्याने नष्ट करण्यात आले आहे. अस्पृश्यतेचे पालन हा दखलपात्र गुन्हा मानला जातो. भारतीय समाजात समता निर्माण करण्यासाठी या प्रथेचे निर्मूलन केले आहे. लोकांमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेद दाखवणाऱ्या पदव्या देण्यास संविधानाने बंदी घातली आहे. उदा., राजा, महाराजा, रावबहादूर इत्यादी.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

विषमता जोपासणाऱ्या, समाजात फूट पाडणाऱ्या आणि नागरिकांमध्ये भेद करणाऱ्या पदव्या राज्याला देता येत नाहीत, परंतु समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत गौरवास्पद कामगिरी करणाऱ्यांना मात्र शासन पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण यांसारख्या पदव्या देते. भारतरत्न ही आपल्या देशातील सर्वोच्च नागरी पदवी किंवा सन्मान आहे.

संरक्षण दलातील कामगिरीसाठी परमवीर चक्र, अशोक चक्र, शौर्य चक्र अशी सन्मानाची पदके दिली जातात.

अशा पदव्यांमुळे अन्य नागरिकांना नसलेले असे कोणतेही खास अधिकार किंवा विशेषाधिकार त्या व्यक्तींना मिळत नाहीत, परंतु त्यांच्या कामगिरीचा गौरव अशा पदव्या देऊन केला जातो.

**स्वातंत्र्याचा हक्क :** संविधानाने दिलेला हा एक अत्यंत महत्त्वाचा हक्क असून त्यात व्यक्तीच्या दृष्टीने आवश्यक अशा सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची हमी दिली आहे.

नागरिक म्हणून आपल्याला -

- भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे.
- शांततापूर्वक एकत्र येण्याचे आणि सभा घेण्याचे स्वातंत्र्य आहे.
- संस्था व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- भारताच्या प्रदेशात कोठेही फिरण्याचे स्वातंत्र्य आहे.
- भारताच्या प्रदेशात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- आपल्या आवडीचा उद्योग, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आहे.

**करून पहा.**

‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ ने केलेल्या काही कृती इथे दिल्या आहेत. वर उल्लेखलेल्या स्वातंत्र्याच्या कोणत्या प्रकाराशी तुम्ही त्या जोडाल ?

‘अ’ ने आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी ‘आदिवासी सहकार्य मंच’ स्थापन केला.

‘ब’ ने आपल्या वडिलांचे बेकरी उत्पादन गोव्यातून महाराष्ट्रात आणण्याचे ठरवले.

‘क’ व्यक्तीला शासनाच्या नव्या करविषयक धोरणात उणिवा जाणवल्या. त्याविषयी त्या व्यक्तीने एक लेख लिहून वृत्तपत्राकडे दिला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिलेले आहेत, परंतु त्यांचा बेजबाबदारपणे वापर करता येत नाही. अशा वागण्यामुळे इतरांचे नुकसान होणार नाही याचे भान आपण ठेवले पाहिजे. आपल्याला बोलण्याचा हक्क आहे, परंतु चिथावणी देणारे लिखाण किंवा भाषण करता येत नाही.

संविधानातील स्वातंत्र्याच्या हक्काने केवळ हिंडण्या-फिरण्याचे किंवा बोलण्याचेच नाही तर आपण सुरक्षित राहावे यासाठी आपल्याला संरक्षण उपलब्ध करून दिले आहे. कायद्याचे हे संरक्षण सर्वांना समान रीतीने दिलेले आहे. ते कोणालाही नाकारले जात नाही. उदा., आपणा सर्वांना जगण्याचा हक्क आहे. वरकरणी हा हक्क सोपा वाटतो परंतु त्यात खूप अर्थ दडलेला आहे. जगण्याची हमी मिळणे, जगण्यासाठी पोषक परिस्थिती असणे असा याचा अर्थ आहे. कोणत्याही व्यक्तीचे जीवित कोणालाही हिरावून घेता येत नाही. कारणाशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करून स्थानबद्ध करता येत नाही. स्वातंत्र्याच्या हक्कात आता शिक्षणाच्या हक्काचाही समावेश करण्यात आला आहे. ६ ते १४ या वयोगटातील सर्व मुलामुलींना शिक्षण घेण्याचा मूलभूत हक्क आहे. या हक्कामुळे शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही.

**विचार करा.**

जीवित हिरावून न घेण्याच्या हक्काला आणखी काही पूरक हक्क आहेत. उदा., एकाच गुन्ह्यासाठी दोन वेळा शिक्षा होत नाही. कोणत्याही व्यक्तीला शिक्षा देण्यापूर्वी तिच्यावर असणारे आरोप सिद्ध व्हावे लागतात. हे काम न्यायालय करते. आरोपाशी संबंधित पुरावे गोळा करण्याचे व खटला उभा करण्याचे काम पोलीस करतात. ‘मी गुन्हा केला आहे’, असे म्हणणाऱ्या व्यक्तीलाही ताबडतोब शिक्षा होत नाही. त्याही व्यक्तीवरील आरोप कायद्याने सिद्ध व्हावे लागतात. या सर्व न्यायालयीन प्रक्रियेला वेळ लागतो, परंतु कोणत्याही निष्पाप किंवा गुन्हा न केलेल्या व्यक्तीला शिक्षा होऊ नये यासाठी हे आवश्यक असते.

**शोषणाविरुद्धचा हक्क :** शोषण थांबण्यासाठी शोषणाला बळी न पडण्याचा, आपले शोषण किंवा पिळवणूक होऊ न देण्याचा हक्क म्हणजे शोषणाविरुद्धचा हक्क होय.

संविधानाने एकीकडे शोषणाविरुद्धच्या हक्कातून पिळवणुकीच्या सर्व प्रकारांवर बंदी घातली आहे, तर त्याच वेळी दुसरीकडे बालकांचे शोषण थांबवण्यासाठी विशेष तरतूद केली आहे. त्यानुसार १४ वर्षांखालील बालकांना धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मज्जाव केला आहे. कारखाने, खाणी यांसारख्या ठिकाणी बालकांची नेमणूक करून त्यांच्याकडून काम करून घेता येत नाही.

वेठबिगारी किंवा सक्तीने एखाद्या व्यक्तीकडून तिची इच्छा नसताना काम करून घेणे, काही व्यक्तींना एखाद्या गुलामासारखे वागवणे, त्यांना कामाचा योग्य मोबदला न देणे, त्यांच्याकडून अतिशय कष्ट करून घेणे, त्यांची उपासमार करणे किंवा त्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती करणे हे शोषणाचे प्रकार आहेत. शोषण साधारणतः महिला, बालके, दुर्बल समाजघटक आणि सत्ताहीन लोकांचे होते. कोणत्याही प्रकारचे शोषण असो, त्याविरुद्ध उभे राहण्याचा हा हक्क आहे.

**चला, चर्चा करूया.**

- येथे बालकामगार काम करत नाहीत.
- इथे कामगारांना रोजच्या रोज पगार दिला जातो.

अशा पाट्या अनेक दुकानांमध्ये आणि हॉटेलमध्ये तुम्ही पाहता. त्यांचा आणि संविधानातील या हक्कांचा काय संबंध असेल बरे ?

**चला, चर्चा करूया.**

शोषण होऊ नये व प्रत्येक व्यक्तीला आपले स्वातंत्र्य उपभोगता यावे म्हणून शासनाने अनेक कायदे केले आहेत. काही कायद्यांचा येथे उल्लेख केला आहे. असे आणखी कोणते कायदे आहेत ते शोधा व त्यांची चर्चा करा.

- किमान वेतन कायदा - कारखान्यातील कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा यांसंबंधीच्या तरतुदी.
- महिलांना घरगुती हिंसेपासून संरक्षण देणारा कायदा - ..............................

भारताच्या संविधानातील समानतेच्या, स्वातंत्र्याच्या आणि शोषणाविरुद्धच्या हक्कांचा आपण येथे अभ्यास केला. पुढील पाठात आपण आणखी काही मूलभूत हक्कांचा अभ्यास करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मूलभूत हक्क म्हणजे काय ?

(२) विविध क्षेत्रांत गौरवास्पद कामगिरी करणाऱ्यांना शासनामार्फत कोणकोणती पदके/पदव्या दिल्या जातात ?

(३) चौदा वर्षांखालील बालकांना धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मज्जाव का केला आहे ?

(४) संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना समान हक्क का दिले आहेत ?

**२.** 'स्वातंत्र्याचा हक्क' या विषयावर चित्रपट्टी तयार करा.

**३. खालील वाक्ये दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) कोणत्याही व्यक्तीला हक्क जन्मतःच प्राप्त होत नाहीत.

(२) सरकारी नोकऱ्या देताना सरकार धर्म, लिंग, जन्मस्थान यांवर आधारित भेदभाव करून तुम्हांला नोकरीपासून दूर ठेवू शकते.

**४.** पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.

स्वातंत्र्याचा हक्क

| भाषण स्वातंत्र्य | | | संचार स्वातंत्र्य | | व्यवसाय स्वातंत्र्य |
|---|---|---|---|---|---|

**उपक्रम**

(१) माहितीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार अशा काही महत्त्वाच्या अधिकारांविषयी वर्तमानपत्रांतून आलेल्या बातम्यांचा संग्रह करा.

(२) तुमच्या परिसरातील इमारतींचे बांधकाम चालू असताना जर लहान बालके काम करताना आढळली, तर त्यांच्याशी व त्यांच्या पालकांशी बोलून त्यांच्या समस्या जाणून घ्या व त्या समस्यांचे वर्गात सादरीकरण करा.

# ५. मूलभूत हक्क भाग–२

मागील पाठात आपण भारतीय संविधानाने दिलेल्या काही मूलभूत हक्कांचा अभ्यास केला. स्वातंत्र्य, समानता यांबरोबरच शोषणाविरुद्धचा हक्क आपण अभ्यासला. या पाठात आपण धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क समजून घेणार आहोत. तसेच मूलभूत हक्कांना असलेल्या न्यायालयीन संरक्षणाचीही आपल्याला माहिती करून घ्यायची आहे.

**धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क :** भारत हे एक जगातील महत्त्वाचे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे, हे आपल्याला माहीत आहे. मागील इयत्तांमध्येही हे आपण अभ्यासले आहे, परंतु त्यासंबंधी संविधानात काय लिहिले आहे हे जाणून घेण्याची तुम्हांला उत्सुकता असेल ना ? तर ते उल्लेख धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कात आहेत. त्यानुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला कोणत्याही धर्माची उपासना करण्याचे आणि धार्मिक कारणांसाठी संस्था स्थापन करण्याचे हक्क आहेत.

धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क आणखी व्यापक करण्यासाठी संविधानाने धार्मिक बाबतीत दोन बाबींना परवानगी दिली नाही. (१) ज्या कराचा उपयोग विशिष्ट धर्माला प्रोत्साहन देण्यासाठी केला जाईल असे कर शासनाला लादता येत नाहीत. थोडक्यात, धार्मिक कर लादण्यास संविधान प्रतिबंध करते. (२) शासनाची आर्थिक मदत घेणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण सक्तीचे करता येत नाही.

**सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क :** सण, उत्सव, आहार आणि जीवनपद्धती यांबाबत आपल्या देशात खूप विविधता आहे, हे आपण पाहतो. तुम्ही लग्नसमारंभ पाहिले असतील, तर तुम्हांला त्यांतील वेगळेपण जाणवले असेल. या सर्व बाबी त्या त्या लोकसमूहाच्या संस्कृतीचा भाग असतात. आपल्या संविधानाने विविध लोकसमूहांना आपापला सांस्कृतिक वेगळेपणा जतन करण्याचा हक्क दिला आहे. त्यानुसार आपली भाषा, लिपी, साहित्य यांचे जतन तर करता येतेच, पण त्याचबरोबर त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्नही करता येतात. भाषेच्या विकासासाठी संस्था स्थापन करता येतात.

**शोधा आणि चर्चा करा.**

- संविधानाने किती भाषांना मान्यता दिली आहे ?
- मराठी भाषेच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने कोणत्या संस्था निर्माण केल्या आहेत ?



**चला, चर्चा करूया.**

महाराष्ट्रात सरकारचे व न्यायालयाचे सर्व कामकाज मराठीतून केले जावे असे तुम्हांला वाटते का ? त्यासाठी काय करावे लागेल ?

**संविधानात्मक उपाययोजनांचा हक्क :** हक्कांचा भंग झाल्यास न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क हासुद्धा एक मूलभूत हक्क आहे. त्याला संविधानात्मक उपाययोजनांचा हक्क असे म्हणतात. याचा अर्थ असा, की हक्कभंगाविरुद्ध न्यायालयाकडे दाद मागण्याविषयीची तरतूद संविधानानेच केली आहे. त्यानुसार न्यायालयालाही हक्कांचे संरक्षण करणे बंधनकारक ठरते.

संविधानाने दिलेल्या हक्कांवर काही वेळेस अतिक्रमण होऊ शकते आणि आपल्याला हक्कांचा वापर करता येत नाही. यालाच आपण आपल्या हक्कांचा भंग झाला असे म्हणतो. हक्कभंगासंबंधीची आपली तक्रार न्यायालय विचारात घेते. त्याची शहानिशा करते. खरोखरीच हक्कभंग झाला आहे किंवा संबंधित व्यक्तीवर अन्याय झाला आहे असे न्यायालयाला वाटल्यास न्यायालय योग्य तो निर्णय देते.

**हक्कभंगाचे काही प्रकार :**

- कारण नसताना एखाद्या व्यक्तीला अटक करणे.
- योग्य कारणाशिवाय एखाद्या व्यक्तीला शहर/गाव सोडण्यास प्रतिबंध करणे.
- तुरुंगातील कैद्यांना अन्नपाणी आणि औषधोपचार नाकारणे.

**हक्कभंग दूर करण्यासाठी न्यायालयाचे आदेश :**

नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयाला विविध आदेश देण्याचे अधिकार आहेत.

(१) **देहोपस्थिती/बंदी प्रत्यक्षीकरण** (Habeas Corpus) **:** बेकायदेशीर अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण.

(२) **परमादेश** (Mandamus) **:** लोकहितासाठी शासनाला एखादी कृती करण्यासाठी दिला जाणारा न्यायालयाचा आदेश.

(३) **मनाई हुकूम/प्रतिषेध** (Prohibition) **:** कनिष्ठ न्यायालयाने आपल्या अधिकार क्षेत्राच्या पलीकडे न जाण्याविषयीचा आदेश.

(४) **अधिकारपृच्छा** (Quo Warranto) **:** कोणत्या अधिकाराने ही कृती केली, असा सरकारी अधिकाऱ्याकडे जाब मागणारा न्यायालयाचा आदेश.

(५) **उत्प्रेक्षण** (Certiorari) **:** कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निर्णय रद्द करून वरिष्ठ न्यायालयात खटला दाखल करण्यासाठीचा आदेश.

**सरकारी अधिकाऱ्याची ही प्रतिक्रिया योग्य की अयोग्य?**

निराधारांसाठी असणाऱ्या एका योजनेचा आपल्याला लाभ मिळावा म्हणून सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणाऱ्या महिलेला, 'तू निराधार दिसत नाहीस', असे म्हणून लाभ नाकारणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याची ही कृती योग्य की अयोग्य ?

वरील प्रसंगात महिलेचा हक्कभंग झाला आहे असे तुम्हांला वाटते का ? तिला दाद मागायची असेल तर तिने कोठे जावे ?



न्यायालयाचे कामकाज

मूलभूत हक्कांना अशा प्रकारे न्यायालयाचे संरक्षण असल्याने नागरिकांना आपल्या हक्कांचा वापर योग्य प्रकारे करता येतो. ते अधिक जागरूक, जबाबदार व सक्रिय नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडू शकतात. मूलभूत हक्कांचा विचार करताना आपल्याला कर्तव्यांचेही भान ठेवावे लागते. त्याचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. लिहिते व्हा.**

(१) धार्मिक कर लादण्यास संविधान प्रतिबंध करते.

(२) संविधानात्मक उपाययोजनांचा हक्क म्हणजे काय?

**२. योग्य शब्द लिहा.**

(१) बेकायदेशीर अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण –

(२) कोणत्या अधिकाराने ही कृती केली, असा सरकारी अधिकाऱ्याकडे जाब मागणारा न्यायालयाचा आदेश –

(३) लोकहितासाठी शासनाला एखादी कृती करण्यासाठी दिला जाणारा न्यायालयाचा आदेश –

(४) कनिष्ठ न्यायालयाने आपल्या अधिकार क्षेत्राच्या पलीकडे न जाण्याविषयीचा आदेश –

**३. आपण हे करू शकतो, याचे कारण पुढे नमूद करा.**

(१) सर्व भारतीय नागरिकांना सगळे सण आनंदाने साजरे करता येतात. कारण ......

(२) मला मराठी भाषेतून शिक्षण घेता येते. कारण ........

**४. रिकाम्या जागी कोणता शब्द लिहावा बरे !**

(१) हक्कभंगासंबंधीची आपली तक्रार ........ विचारात घेते.

(२) शासनाची आर्थिक मदत घेणाऱ्या शाळांमध्ये ........ शिक्षण सक्तीचे करता येत नाही.

**उपक्रम**

तुमच्या शाळेत न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी यांच्या मुलाखतींचे आयोजन करा.

# ६. मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये

मागील पाठात संविधानाने दिलेल्या हक्कांचा आपण अभ्यास केला. त्यातून भारतीय नागरिकांना कोणते हक्क असतात हे समजले. एवढेच नव्हे तर हक्कांना न्यायालयाचे संरक्षण असते हेही आपण शिकलो. मूलभूत हक्कांचे आपल्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातील महत्त्वही लक्षात आले. या पार्श्वभूमीवर आपण मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे काय हे समजून घेऊ.

मूलभूत हक्क शासनाच्या अधिकारावर निर्बंध घालतात. खालील सूची वाचा म्हणजे शासनावर कोणते निर्बंध असतात हे लक्षात येईल. उदा.,

- शासनाने नागरिकांमध्ये जात, धर्म, वंश, भाषा व लिंग यांवर आधारित भेद करू नये.
- कोणालाही कायद्यापुढील समानता व कायद्याचे समान संरक्षण नाकारू नये.
- कोणत्याही व्यक्तीचे जीवित हिरावून घेऊ नये.
- धार्मिक कर लादू नयेत.

शासनाने काय करावे याविषयीच्या काही सूचना संविधानाने स्पष्ट केल्या आहेत. या सूचनांचा हेतू म्हणजे संविधानाच्या उद्देशिकेत जी उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत ती प्राप्त करण्यासाठीचे मार्गदर्शन होय. म्हणूनच या सूचनांना 'मार्गदर्शक तत्त्वे' असे म्हटले जाते.

### मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश का केला?

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा या देशात सुव्यवस्था निर्माण करण्याचे, सुरळीत राज्यकारभार करण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर होते. दारिद्र्य, मागासलेपणा, निरक्षरता दूर करून देशाची घडी नीट बसवायची होती. राष्ट्रबांधणीचे कार्य करायचे होते. त्यासाठी नवनवीन धोरणे आखणे, त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. लोकांच्या कल्याणाचे उद्दिष्ट साध्य करायचे होते. थोडक्यात, भारताचे एका नव्या विकसित व प्रागतिक देशात रूपांतर करायचे होते. त्यासाठी केंद्रशासन व राज्यशासनाने कोणत्या विषयांना प्राधान्य द्यावे, लोककल्याणासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात हे संविधानाने मार्गदर्शक तत्त्वांद्वारे स्पष्ट केले आहे. राज्यांच्या धोरणाचे ते आधार बनवले. प्रत्येक मार्गदर्शक तत्त्वात राज्याच्या धोरणासाठी एक विषय आहे. त्या विषयाच्या अनुषंगाने नवीन धोरण आखावे अशी अपेक्षा संविधानकारांनी व्यक्त केली आहे. ही सर्व धोरणे एकदम व एकाच वेळी राबवायची झाल्यास त्यासाठी खूप आर्थिक पाठबळ लागेल, हे संविधानकारांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी मार्गदर्शक तत्त्वे शासनावर मूलभूत हक्कांप्रमाणे बंधनकारक केली नाहीत. राज्यांनी हळूहळू पण ठामपणे त्यांची अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### काही महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे :

- शासनाने उपजीविकेचे साधन सर्वांना उपलब्ध करून द्यावे. स्त्री व पुरुष असा भेद त्याबाबत करू नये.
- स्त्री व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन द्यावे.
- लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना कराव्यात.
- पर्यावरणाचे रक्षण करावे.
- राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणांचे म्हणजेच स्मारके, वास्तू यांचे संरक्षण करावे.
- समाजातील दुर्बल घटकांना विशेष संरक्षण देऊन त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
- वृद्धापकाळ, अपंगत्व, बेकारी यांपासून नागरिकांचे संरक्षण करावे.
- भारतातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा करावा.



**सांगा पाहू !**

वेतनाच्या संदर्भात ‘समान कामासाठी समान वेतन’ असे मार्गदर्शक तत्त्व आहे. यातून संविधानातील कोणती उद्‌दिष्टे साध्य होतील असे तुम्हांला वाटते ? स्त्री-पुरुषांनी सारखेच काम करून पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी वेतन देण्याचे प्रकार का आढळतात ?



**करून पहा.**

वरील मार्गदर्शक तत्त्वांव्यतिरिक्त अन्य मार्गदर्शक तत्त्वे शासनाने लोककल्याणासाठी काय करावे हे स्पष्ट करतात. खाली काही विषय दिले आहेत. त्या संदर्भात कोणते मार्गदर्शक तत्त्व आहे हे शिक्षकांच्या मदतीने शोधा.

उदा., परराष्ट्र धोरण : जागतिक शांतता व सलोख्यास प्राधान्य.

(अ) मुलींचे शिक्षण : ........................

(ब) निकोप व आनंदी वातावरणात बालकांचे संगोपन : ..............................

(क) शेती सुधारणा : ........................

मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत हक्क या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मूलभूत हक्कांमुळे नागरिकांना अत्यावश्यक असे स्वातंत्र्य मिळते, तर मार्गदर्शक तत्त्वे लोकशाही रुजावी म्हणून पोषक वातावरण निर्माण करतात. अर्थात एखादे मार्गदर्शक तत्त्व शासनाने राबवले नाही तर त्या विरोधात आपल्याला न्यायालयात जाता येत नाही, परंतु विविध मार्गांनी शासनावर दबाव आणून धोरण आखण्याचा आग्रह आपण धरू शकतो.

शासनाने विद्यार्थ्यांसाठी आणखी काय केले पाहिजे असे तुम्हांला वाटते ? तुमच्या मागण्यांची एक सूची तयार करा. तुम्ही केलेल्या मागण्या रास्त आहेत हे कसे पटवून द्याल ?

शासनाच्या या सुविधांमुळे कोणत्या सुधारणा होतील असे तुम्हांस वाटते ?

(अ) सार्वजनिक स्वच्छतागृहे

(ब) स्वच्छ पाणीपुरवठा

(क) बालकांचे लसीकरण

## मूलभूत कर्तव्ये

लोकशाहीत नागरिकांवर दुहेरी जबाबदारी असते. एकीकडे त्यांना संविधानाने दिलेल्या हक्कांबाबत जागरूक राहावे लागते. हक्कांवर अयोग्य मर्यादा येणार नाहीत याबाबत दक्ष असावे लागते, तर दुसरीकडे काही कर्तव्ये आणि जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात. सर्व भारतीयांचे कल्याण व्हावे म्हणून संविधानाने मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांतून अनेक तरतुदी केल्या आहेत, परंतु नागरिक त्यांची मूलभूत कर्तव्ये जोपर्यंत पार पाडत नाहीत, तोपर्यंत शासनाने केलेल्या सुधारणांचे लाभ सर्वांना मिळत नाहीत. उदा., ‘स्वच्छ भारत’ अभियानाखाली शासनाने स्वच्छतेचे अनेक उपक्रम राबवले, परंतु सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करण्याच्या सवयी लोकांनी बदलल्या पाहिजेत. भारतीय नागरिकांना आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव व्हावी म्हणून संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये पुढीलप्रमाणे :

- प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
- स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

- देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
- आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
- सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
- नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
- वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
- सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
- देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
- ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

**सूची तयार करा.**

- घरात तुम्ही कोणते हक्क मागता आणि कोणती कर्तव्ये पार पाडता ?
- शाळेत तुम्ही कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडता ? तेथील कोणती जबाबदारी तुम्हांला नकोशी वाटते ?


वास्तूवर नाव टाकणारा मुलगा


लिंबू, मिरची लटकवलेले


बसची तोडफोड


रस्त्यावर कचरा टाकणारी महिला

**या चित्रांमध्ये कोणत्या कर्तव्यांचे पालन होत नाही असे तुम्हांला वाटते ?**




आपण हळूहळू सुरुवात तर करूया... काही निश्चय करूया.

- मुला-मुलींना शाळेत जाण्यासाठी सांगूया.
- शाळेतील सुविधांचा जबाबदारीने वापर करूया.
- आपल्या देशाविषयी अभिमान बाळगूया.
- सर्व धर्मांच्या सण-उत्सवांत सहभागी होऊया. पर्यावरण दूषित न करता ते सण साजरे करूया.
- सार्वजनिक सुविधांचा योग्य वापर व काळजी घेऊया.
- हाती घेतलेली सर्व कामे प्रामाणिकपणे आणि उत्तम रीतीने करूया.

वरील संवादांतून आपल्याला कोणत्या कर्तव्यांचा बोध होतो ? हक्क आणि कर्तव्ये यांचा काही संबंध असतो का ? कर्तव्यांचे पालन केल्याने काय होते असे तुम्हांला वाटते ?

**तुम्हांला काय वाटते?**

६ ते १४ वर्षे वयोगटांतील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे. या वयोगटांतील सर्व मुले-मुली शाळेत असणे आवश्यक आहे. तरीही अनेक कारणांनी मुले-मुली शाळेत जाऊ शकत नाहीत. आई-वडिलांना आर्थिक मदत करण्यासाठी त्यांना काम करावे लागते. अशा मुलांना शाळेत आणण्याचा आग्रह धरणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे आहे असे तुम्हांला वाटते का ?

भारतीय संविधानाच्या उद्दिष्टांची आणि वैशिष्ट्यांची ओळख आपल्याला या पाठ्यपुस्तकातील सुरुवातीच्या प्रकरणांमध्ये झाली. भारतीय नागरिकांचे हक्क, त्या हक्कांना असणारे संरक्षण यांचाही विचार आपण केला. आपली मूलभूत कर्तव्ये कोणती आहेत, हे आपल्याला समजले. पुढील वर्षी आपण आपल्या देशातील राज्यकारभार कसा चालवला जातो, याचा अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. शासनावर कोणते निर्बंध असतात, याचा खालील चौकटीत तक्ता तयार करा.**

- ..............................................
- ..............................................
- ..............................................

**२. खालील विधाने वाचा व होय/नाही असे उत्तर लिहा.**

(१) वर्तमानपत्रात दिलेल्या नोकरीच्या जाहिरातीत महिला, पुरुष या सर्वांसाठी जागा असतात....

(२) एकाच कारखान्यात एकच काम करणाऱ्या स्त्री-पुरुषाला वेगवेगळे वेतन मिळते ..........

(३) शासनाद्‌वारे आरोग्य सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या जातात .........

(४) राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या वास्तू, स्मारके यांचे संरक्षण करावे ........

**३. का ते सांगा.**

(१) ऐतिहासिक वास्तू, इमारती, स्मारके यांचे संरक्षण करणे.

(२) वृद्धांसाठी पेन्शन योजना राबवली जाते.

(३) ६ ते १४ वयोगटांतील बालकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

**४. योग्य की अयोग्य का ते सांगा. अयोग्य विधान दुरुस्त करा.**

(१) राष्ट्रध्वज जमिनीवर पडू न देणे.

(२) राष्ट्रगीत चालू असताना सावधान स्थितीत उभे राहणे.

(३) आपल्या ऐतिहासिक वास्तूवर आपले नाव लिहिणे/कोरणे.

(४) सारख्याच कामासाठी पुरुषांपेक्षा स्त्रियांना वेतन कमी देणे.

(५) सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे.

**५. लिहिते होऊया.**

(१) संविधानातील काही मार्गदर्शक तत्त्वे पाठ्यपुस्तकात दिली आहेत. ती कोणती ?

(२) भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायद्याची तरतूद का केली असेल ?

(३) मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत हक्क या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे का म्हटले जाते ?

**६. पर्यावरणाचे जतन व संरक्षण नागरिक कशा प्रकारे करू शकतात, हे उदाहरणासह लिहा.**

**उपक्रम**

(१) शिक्षण हा आपला हक्क आहे, पण त्या संदर्भातील आपली कर्तव्ये कोणती, यावर गटचर्चा करा.

(२) राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या वास्तू, स्मारके यांचे जतन करण्यासाठी राज्याने उपाययोजना कराव्यात, असे मार्गदर्शक तत्त्व आहे. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी राज्याने काय केले आहे, ते शोधा व सूची तयार करा.

(३) बालकांच्या आरोग्यासाठी शासन कोणत्या योजना राबवते, याविषयी माहिती मिळवा.

# कालपट - ८ वे शतक ते १९ वे शतक - प्रमुख घटनांचा आढावा

घटनाक्रम खालून वर वाचत जाणे.

### ८ वे शतक
- मुहम्मद बिन कासिमची सिंधवर स्वारी.
- राजपूत, गाहडवाल, परमार घराणे
- गुर्जर-प्रतिहार सत्ता
- पाल घराणे
- राष्ट्रकूट घराणे
- पांड्य घराणे

### ९ वे शतक
- शिलाहार घराणे
- चोळ घराणे

### १० वे शतक
- राजा जयपाल-सबक्तगीन संघर्ष

### ११ वे शतक
- गझनीच्या महमूदाची भारतावर स्वारी
- तुर्कांची भारतावर आक्रमणे
- होयसळ घराणे

### १२ वे शतक
- मुहम्मद घोरीचे भारतावर आक्रमण व पृथ्वीराज चौहान यांची कारकीर्द संपुष्टात
- यादव घराणे

### १३ वे शतक
- वारकरी पंथ
- महानुभाव पंथ
- खल्जी घराण्याची राजवट
- बल्बन, सुलतान रझिया, अल्तमश यांची कारकीर्द, कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा सुलतान

### १४ वे शतक
- बहमनी राज्याची स्थापना
- विजयनगर राज्याची स्थापना
- दिल्लीवर तुघलक सत्ता. दिल्ली येथून राजधानी देवगिरी व परत दिल्लीला. तैमूरलंगची भारतावर स्वारी


### १५ वे शतक
- आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरीदशाही, इमादशाही यांची राजवट

### १६ वे शतक
- सम्राट अकबराचा महाराणा प्रताप, चांदबिबी, राणी दुर्गावती यांच्याशी संघर्ष
- मुघल राजवट सुरू. बाबर, हुमायून यांची कारकीर्द.
- दिल्लीवरील सुलतानशाहीची राजवट संपुष्टात

### १७ वे शतक
- महाराणी ताराबाई यांची कारकीर्द
- छत्रपती राजाराम महाराज
- छत्रपती संभाजी महाराज
- छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक
- स्वराज्यस्थापना
- छत्रपती शिवाजी महाराजांची कारकीर्द
- महाराष्ट्रात दुष्काळ
- मुघल-शीख संघर्ष
- औरंगजेब
- शहाजहान
- जहांगीर

### १८ वे शतक
- दुसरा बाजीराव पेशवे यांची कारकीर्द
- स्वराज्य ते साम्राज्य
- सवाई माधवराव
- नारायणराव
- थोरले माधवराव
- पानिपत लढाई
- नानासाहेब पेशवे
- मराठ्यांकडून पोर्तुगीजांचा पराभव
- पहिला बाजीराव पेशवे यांची कारकीर्द
- छत्रपती शाहू महाराजांची कारकीर्द

### १९ वे शतक
- इंग्रजांकडून मराठ्यांचा पराभव






महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
इतिहास व नागरिकशास्त्र इ. ७ वी (मराठी माध्यम)
₹ ४०.००